
# श्रीरायगड



ॲड. आनंद रा. देशपांडे

# श्री रायगड...

ॐ

## ॲड. आनंद रा. देशपांडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# श्री रायगड

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : ॲड. आनंद देशपांडे यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

- **श्री रायगड...**

**ॲड. आनंद रा. देशपांडे.**

९१/अ, मुरारजी पेठ, सुपरमार्केटजवळ,

सोलापूर-४१३ ००१.

दूरध्वनी - ०२१७-२६२१३४९

दूरभाष - ९८२३२९१६४३

ई-मेल - anandvanbhuvan@gmail.com

- **सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित.**

- प्रथमावृत्ती:- ऑक्टोबर २०२०
- मुखपृष्ठ सुलेखन:- प्रा. दिपक देशपांडे.
- मुखपृष्ठ व मलपृष्ठ:-  श्री. भास्कर सगर
- आतील चित्रे व प्रकाश चित्रे:-
    - स्व. गो. नी. दांडेकर (अप्पा)
    - ॲड. आनंद रा. देशपांडे.
    - सोशल मीडियावरून साभार.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# ई प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**प्रकाशन : १७ ऑक्टोबर २०२० (घटस्थापना)**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे - आवश्यकआहे.

**<u>अर्पणपत्रिका</u>**

**श्री. राजेंद्र टिपरे ( राजू )**

**आणि**

**डॉ . रवींद्र लोहोकरे, ( रवी )**

**या माझ्या दोन रायगडवेडया**

**जिवलगांस ..**

**सप्रेम सादर**

# <u>ऋणनिर्देश</u>

**शिवशाहीर श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे**

**श्री मनोहर जोशी (शामराव जोशी)**

**ॲड. रामचंद्र नागेश देशपांडे**

डॉ. वीणा देव

सौ. मृणाल कुलकर्णी

श्री. विवेक घळसासी

श्री. उदयराव जोगळेकर

श्री. दिग्पाल लांजेकर

श्री. श्रीनिवास वीरकर

श्री. चंदन विचारे

श्री. रघुवीर देशमुख

श्री. अनंत देशमुख

श्री. भास्कर सगर

## अनुक्रमणिका ....


चित दरवाजापाशी ........ मनोगत

१ ) तो आहे .....

२ ) सृजनाचे सोहळे

३ ) श्रीरायगड : काही स्मरणें.....

४ ) मार्तंड जे तापहीन ...

५ ) रायगडावरील धुकेजलेला पाऊस

६ ) धुक्यात हरवली वाट

७ ) कोजागिरी रायगडावरची !

८ ) गढमे गढ रायगढ....

९ ) आता सुखाने मरेन

१० ) वृक्षायन

११ ) लाकूडतोड्याची गोष्ट

१२ ) कसं यांचं जगणं?

१३ ) उषःकाल... रायगडावरचा.....

१४ ) हमे पागल ही रहने दो

१५ ) उदास

१६ ) गरज दीपस्तंभाची

१७ ) राग न धरावा लेकुराचा

१८ ) मेरा साया साथ होगा

१९ ) सदा सर्वदा देव सन्निध आहे ....

२० ) पुनःप्रत्यय

२१ ) जाणता राजा - रायगड

२२ ) सांज ये गोकुळी ......

२३ ) वाळल्या फुलांत व्यर्थ, गंध शोधितो जुना !

२४ ) दुर्ग प्रकाशचित्रे

२५ ) दिव्याखाली अंधार....

२६ ) साकडं ....

२७ ) चुकलिया माये ......

## मनोगत

**चित दरवाजापाशी ........**

दुर्गदुर्गेश्वर रायगड हा जगातला सगळ्यात मोठा लोहचुंबक आहे, असं कुणीतरी नाही मीच म्हटलय. एकदा का एखादा माणूस त्याला चिकटला की मग तो शेवटपर्यंत काही रायगडापासून वेगळा होऊ शकत नाही. पण हे चुंबकत्व रायगडाला आपसूक, अनायास मिळालेलं नाही. त्यासाठी त्यानं खूप सोसलय, खूप काही पाहिलयं, खूप काही मिळवलय, खूप काही गमावलय.

छत्रपति श्री. शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक हा रायगडानं पाहिलेला सर्वात आनंदाचा दिवस आणि श्री. शिवाजीमहाराजांच महानिर्वाण ही रायगडानं सोसलेली सर्वात दुःखदायी घटना.

इसवीसन १६५६ ते इसवीसन १८१८ हा रायगडाचा मध्ययुगीन कालखंडातल्या शिवकालीन युगातला सक्रिय कालखंड. इ. स.१६५६च्या जानेवारी महिन्यात जावळी जिंकल्यानंतर महाराजांनी रायगडाला वेढा घातला आणि साधारण एप्रिलच्या सुमारास रायगड जिंकून घेतला, त्याच

वेळी निर्णय झाला, तख्तासी जागा हाच गड करावा ! तेव्हापासून मे १८१८ मध्ये इंग्रजांनी गड जिंकून घेईपर्यंत अनंत गोष्टी रायगडाच्या साक्षीने घडून आल्या. त्यातलं बर काय, वाईट काय निवडायचा अधिकार रायगडाला, ना तेव्हा होता, ना आत्ता आहे. तो या सगळ्या गोष्टींचा मूक साक्षीदार होता. एखाद्या स्थितप्रज्ञाच्या धैर्याने, तो या सगळ्या गोष्टी सहन करीत राहिला. उसासा सोडावा तर वादळ यायची शक्यता आणि कण्हावं तरी धरणीकंप व्हायची भिती. इंग्रजांनी गडाची राखरांगोळी करेपर्यंत तो कसाबसा नांदता तरी होता. पण त्यानंतरची पाऊणशे वर्षे त्याने एकट्याने सोसली. ऊन, वारा, पाऊस, वादळं, सारं काही सोसलं त्यानं एकटयानं. सोबतीला होत्या फक्त शिवकालाच्या आठवणी. कसल्याही परिस्थितीत तो ताठ उभा राहिला कारण त्याच्या काळजात एक पृथ्वीमोलाची ठेव विधात्यानं जपून ठेवलीय, ती म्हणजे स्वयंमेव श्रीशिवप्रभूंची रक्षा. त्यामुळे तो जगाच्या अंतापर्यंत असाच ताठ मानेने उभा राहणार. निसर्गानं त्याला अत्यंत देखणं रूप बहाल केलं आणि श्रीशिवप्रभूंनी त्याच्यावर तट बुरुजांचे, इमारतींचे, जडावाचे दागिने घातले. त्याला इतिहास बहाल केला आणि

त्याला अमरत्व प्राप्त होण्यासाठी, ते स्वतः अंतःकाली त्याच्या कुशीत अनंतात विलीन झाले .

इ. सन १९८८ मी पहिल्यांदा रायगडला गेलो, तेव्हापासून आत्तापर्यंत गेल्या बत्तीस वर्षात मी जवळ जवळ चौसष्ठ वेळा रायगडला गेलो. म्हणजे सरासरी वर्षातून दोनदा. अपवादात्मक एखादी वारी सोडली तर प्रत्येक वेळेला कमीत कमी दोन आणि जास्तीत जास्त आठवडाभर गडावर निवांत राहिलो. कधी एकटा कधी गोतावळा घेऊन. कधी कधी वाटायचं की आपले अनुभवपण इतरांना सांगावेत, पण धाडस व्हायचं नाही. एकोणीसशे नव्वद सालानंतर थोडं थोडं लिहायला सुरुवात केली.

भटकंतीमधल्या अनुभवांवर पहिलं पुस्तक आलं - कातळमनीचा ठाव, दुसरं- काही जनातलं-काही मनातलं, तिसरं - आनंदाचे डोही, परवा ऑगस्टमध्ये आलं. यातलं तिसरं पुस्तक ई-बुक होतं. ते अनेकांपर्यंत पोहोचविण्यात मोठा वाटा होता ई-साहित्य प्रतिष्ठानचा. ते पुस्तक प्रकाशित झालं आणि अनेक वाचकांचे फोन येऊ लागले. त्यातले सर्वाधिक फोन रायगडावरच्या लिहीलेल्या लेखांसंबंधी होते.

मग मनात ही कल्पना आली की फक्त रायगडावरचे लेख एकत्र करून एक पुस्तक केलं तर ? आणि त्यातून या पुस्तकाची तयारी केली.

काही गोष्टींची प्रामाणिक कबुली देणे हे मी माझे कर्तव्य समजतो. माझा पिंडच स्व. गो. नी. दांडेकर ( अप्पा ) यांच्या साहित्यावर पोसला गेलेला असल्याने, माझ्या लिखाणावर स्व. अप्पांचा प्रभाव आहेच. भटकंती आणि अनुभव माझे असले तरी ते शब्दबद्ध करण्याचे सामर्थ्य मला अप्पांमुळे मिळाले. अलीकडे सोशल मिडियामुळे, खूप गडप्रेमी खूप छान छान छायाचित्रे पोस्ट करत असतात. खूपवेळा एखादा फोटो पाहूनही लिहायची प्रेरणा मिळते. अशा सर्व गडवेडया छायाचित्रकारांचा मी ऋणी आहे. त्या त्या क्षणी त्यांना जे जे गवसतं ते नित्यनूतन असलं तरी त्या प्रसंगाची जातकुळी एकच असते. तसाच प्रसंग आम्हीही आमच्या भटकंतीत अनुभवलेला असतो. त्यामुळे पुनःप्रत्ययाच्या आनंदातूनसुद्धा काही वेळा लेखनाची स्फूर्ती मिळते. मला आवडलेली अशी छायाचित्रे मी सोशल मिडियावरून घेतली असे स्पष्ट नमूद करुन मी पुस्तकात समाविष्ट केली आहेत. त्या सर्व ज्ञात अज्ञात छायाचित्रकारांचे मनापासून आभार.

अत्यंत कमी वेळात, परिश्रमपूर्वक हे पुस्तक तयार करणाऱ्या माझ्या मित्रांचे, म्हणजेच चित्रकार श्री. भास्कर सगर आणि संगणक तज्ज्ञ श्री. विद्याधर रेणावीकर या दोघांचे मनापासून आभार. ई-साहित्यने हे पुस्तक प्रकाशित करुन मला पुन्हा एकदा संधी दिली त्याबद्दल त्यांचेही मनापासून आभार.

मी जरी इतिहासाचा विद्यार्थी असलो तरी माझं लिखाण भावनेला धरून असतं. अनावश्यक तपशील आणि पुराव्यांचे अवडंबर मला रसभंग करणारे वाटते म्हणून मी ते टाळतो. आपणही याच भूमिकेतून ते वाचावे.

प्रस्तावनेच्या सुरुवातीला मी नमूद केल्याप्रमाणे रायगड हा खरोखर एक लोहचुंबक आहे, तसेच एक शेवटचे विधान करतो, महाराष्ट्रात आणि पर्यायाने भारतातसुद्धा जन्माला येणाऱ्या प्रत्येक माणसाला आयुष्यात एकदा तरी रायगडावर जाऊन, श्रीशिवछत्रपतीना अभिवादन केल्याशिवाय गती नाही, मोक्ष नाही.  ते प्रत्येक महाराष्ट्रिकाचे, भारतीयांचे आद्य कर्तव्य आहे.

रायगडाने आजवर अनेकांना अनेक बाबतीत प्रेरणा दिली आहे, आत्मविश्वास दिला आहे. हे पुस्तक वाचून आपणांस

एक वेळ तरी रायगडास जाऊन यावेसे वाटले आणि आपण जाऊन आलात तर माझा या लिखाणामागचा उद्देश सफल झाला असं मी म्हणेन.

बहुत काय लिहीणे ! राजते लेखनावधी.

ॲड. आनंद रा. देशपांडे, सोलापूर.

# १. तो आहे .....

संध्याकाळ थोडी आळसटल्यासारखीच जाते. हिरकणीवरून परत येताना सारखं वाटत रहात, आज रात्री ठोकणार बहुतेक ! नुसतच गार वार सुटलेल असत. पार तिकडं क्षितीजाच्या टोकावर एक काळी रेघ दिसत असते, आपण त्याच्यावरूनच अंदाज बांधतो, आज रात्री कोसळणार पाऊस! रात्री उशिरापर्यंत सूटच्या पायऱ्यांवर बसून राहिलं की पश्चिमेला विजा चमकताना दिसतात. पाऊस काही येत नाही. मग कंटाळून मी झोपायला जातो. पहाटे केव्हातरी वरच्या सिमेंटच्या पत्र्याचा ताशा वाजायला लागतो. अर्धवट उघडया खिडकीच्या फटीतून वाऱ्याची कर्कश्श शीळ घुमायला लागते.

मी झोपेतनच म्हणतो, "आले वाटतं, साहेब." मग चांगलं तास दोनतास आभाळ गर्जत रहातं. राणीवशापाठीमागून वाहाणाऱ्या ओढयाचा खळाळ कानावर ऐकू येऊ लागतो. तरीही अजून उजाडलेल नसतं म्हणून मग तसाच घुसमटून मी पडून रहातो. थोडया वेळाने ताशाची आवर्तन कमी होतात. पूर्वेचा उजाळ वाढतो, पण गच्च धुकं भरलेलं असतं.

सूटचा दरवाजा उघडला की गार वार आणि धुकं भसकन आत घुसतं. तशीच शाल लपेटून चहासाठी कँटीनकडं निघतो. मधल्या ओढयावरच्या पुलाची लाकडं भिजून चिंब झालेली असतात. ओढ्याचा आवेग कमी झालेला असतो. वळवाच्या पावसानं हिरवट झालेल्या गवताच्या कोंबांनी पावसाचे थेंब तोलून धरलेले असतात. चांगले दोन ग्लास गरम गरम चहा रिचवला की मग बरोबरचा भिडू म्हणतो, "काय फिरून यायचं का ?" मी काय निमित्ताला टेकलेलाच. मग एखादी काठी घेऊन बाहेर पडायचं. तशा गच्च धुक्यातून मेणादरवाजा गाठायचा, पावसाचं पाणी अजून पायऱ्यांवरून वाहात असतं. कोपरे उडालेल्या पायऱ्यांच्या खाचातून, पाण्याच्या बारीक बारीक धारा लागलेल्या असतात. एकदा राजवाडयात शिरलं की स्वर्गात आल्याचा भास होतो. भरून आलेल्या पांढरट धुक्यातून दिसणारे काळे कुळकुळीत चौथरे, धूसर दिसणाऱ्या भिंती, बारीक पावसाचे थेंब अंगावर घेत त्यातून वाट काढत चालावं. वाट पायाखालची असल्यानं काळजी नसते. वळणं वळणं घेत, चौथऱ्यांचे चढउतार करत, आपण राजसभेत येतो. धुक्यानं गच्च भरलेल्या एका मोठ्ठ्या चौकोनी खोक्यात आपण उभे आहोत

असा भास होतो. उजव्या हाताचा नगारखाना आणि डाव्या हाताचं सिंहासन नुसतं जाणवत रहातं. डावीकडं वळून नमस्कार करून मी नगारखान्याच्या बाहेर येतो. समोरचं काही दिसत नाही. अदमासानं होळीच्या माळाची वाट पकडून चालत रहातो. डाव्या हाताचा खडक संपला की गार वाऱ्याचा झोत एकदम अंगावर येतो. एक शिरशिरी उठते. पावसानं झालेला सृष्टीतला बदल निरखीत पुतळ्यातले महाराज स्वस्थ बसून असतात.

होळीच्या माळावरचं पावसाचं पाणी, एका बाजूनं गंगासागरात तर दुसऱ्या बाजूनं हत्तीतलावात धावत असतं. तशा धुक्यातसुध्दा, एका रेघेत असलेल्या बाजारपेठेच्या काळसर भिंती दोन्ही बाजूला जाणवत रहातात. चटाचटा पावलं उचलून बाजारपेठं मागं टाकली की ब्राह्मणवाडयाच्या घळीतून एक छोटा ओहोळ वाहात असतो, तो ओलांडून वर खडकावर आलं की पुन्हा एकदा वाऱ्याचा झोत जाणवून जातो. जगदीश्वराची मागची भिंत दिसायला लागते. मी हात वर करून सवयीनुसार गणपतीच्या पायाला हात लावून कपाळाला लावतो. आत आलो की जाणवतं, राजवाडा जर स्वर्ग असेल तर हे अपर कैलास आहे.

इथे तो कधीकाळीचा माझ्या राजांनी पूजलेला, जगदीश्वर ठाण मांडून बसलेला आहे. आतबाहेर गच्च भरलेल्या धुक्यामुळे धन्याची दृष्टिभेट न होऊन, थोडी मान वाकडी करून आत वाकून पाहणारा, पावसाने निथळणारा नंदी बघून आत जावं. छताच्या गळणाऱ्या चिऱ्यातून आत टपकणारे पाण्याचे थेंब खाली साचलेल्या पाण्यात टप, टप, टिपिक, टिपिक वाजत असतात. सर्दावलेला मारूतीराया, थेंबाथेंबाने निथळत असतो.

गाभाऱ्यातल्या ओलसर निसरड्या दगडावर पाऊल पडलं की शिळक अंगात जाते. कोरडी जागाच शिल्लक नसते, त्यामुळे दर्शन घेऊन बाहेर येतो. नगारखान्यापासून ते थेट समोरच्या राजगड, तोरण्यापर्यंतच्या आसमंतात फक्त एका शिवसमाधीचं अस्तित्व जाणवत राहात. कालचा पूजेचा हार, पावसाने भिजून, एका बाजूला सरकलेला असतो. गच्च भिजलेल्या त्या समाधीवरच्या अर्धप्रतिमेकडं पहावं अन् मग इथे शब्द संपतात.

इथून पुढे भावनांचा प्रदेश ! बरोबरचा भिडू पार गोंधळून गेलेला असतो. कँटीनमधून बाहेर पडल्यापासून, मी एका चकार शब्दाने त्याच्याशी बोललेलो नसतो. तोही या

वातावरणात रमलेला, माझ्याबरोबर स्वतःला ओढीत रहातो. मनाला वाटेल तितका वेळ, शिवसमाधीसमोर हात जोडून उभा रहात, मी खूप गप्पा मारतो, गाऱ्हाणी सांगतो, तावातावाने मुद्दे मांडतो, त्यांच्याशी मनापासून भांडतो, पण सगळं मनातल्या मनात !! मग शांत होतो. डोळ्यात आलेलं पाणी पुसतो, घशातला आवंढा गिळतो. मनात येतं या विश्वरूपासमोर मी कोण आहे ? एक कीटक !

पण काहीही असो, आमच्यात एक नातं आहे, त्याशिवाय का असा मी सारखा भेटीसाठी धावत येतो ? मला मनापासून मोकळं व्हायला याच्याशिवाय दुसरं स्थान नाही, कारण इथे माझ्याकडून कसलीच अपेक्षा नाही. इथे असतं फक्त त्यांचं अस्तित्व आणि असतो एक भरवसा, काळजी करू नको, मी आहे !! मागं वळून पहातो तो, जगदीश्वर धुक्यात हरवलेला, फक्त नंदी अस्पष्ट दिसत असतो, त्याच्यावरून आपण खात्री बाळगायची की तो आहे आणि खरच तो असतो.

## २. सृजनाचे सोहळे

चढता उन्हाळा, ऊन मी म्हणत असतं, चार पायऱ्या चढून गेलं तरी धाप लागते, तहानेनं घसा कोरडा पडलेला असतो.... बघावं तिकडे उन्हाच्या झळा, वाफारे आणि आपले सुस्कारे. कसबसं गडाच्या चढणीला लागावं तर काळेकभिन्न तापलेले खडक, वाळून कोळ झालेली गवतं, तटाचे बुरुजाचे दगड, जणू अंगावर येताहेत असा भास होतो. गडावर पोहोचल्यावर पाहावं तर सगळं भगभगीत, आटलेले पाणवठे, सावलीला रवंथ करीत असलेली गुरं. सगळा गड जणू उग्र तपश्चर्येला बसलेल्या हठयोग्यासारखा दिसतो. स्वतःही तापतो आणि आपल्याला भाजून काढतो. अन् मग मृगाची चाहूल लागते.

मे'च्या अखेरीस चांगले विजांचे फटकारे सडकवीत एक दोन वळीव बरसून गेलेले असतात. आकाशात ढगांची धावपळ सुरू होते. वेगवेगळ्या आकारांचे ढग, शाळा सुटून बाहेर पडलेल्या पोरासारखे पळत सुटतात. देवाघरच्या रंगपंचमीला सुरुवात होते. एकेका रंगाने ढग रंगू लागतात. अशा वेळेला कुठेतरी बुरुजावर, देवळाच्या दीपमाळेपाशी,

तलावाच्या भिंतीवर बसून असावं.  लांबवर, आसपासच्या डोंगरांवर पाऊस उतरताना दिसू लागतो.

पहिली जाणीव होते नाकाला. वाहत्या वाऱ्याबरोबर येणारा मातीचा गंध सांगतो, पाऊस आला. वावटळी उठू लागतात. भिरभिरी आकाशावेरी पोहोचतात, गडावरून खाली पहावं तर मोकळवणात जागोजागी असे धुळीचे खांब उभे राहतात. उन्हाने  तडकलेल्या फळांतून, फुलांतून बाहेर पडलेल्या रानगवताच्या, रानफुलांच्या बिया उगीच इकडे तिकडे हिंडत असतात, एकमेकांची विचारपूस करत त्यांचीपण धावपळ होते,चला गं आवरा पटपट, आपापल्या जागा धरा, ए थोडी तिकडे सरक..... असा सगळा कालवा आणि मग पावसाचा पहिला शिडकावा.

तीन-तीन महिने उन्हाने तापलेले खडक तपश्चर्या भंग पावलेल्या ऋषींसारखे तडकतात, शाप दिल्यासारखे धोंडे फेकून मारतात. दोन महिने चांगली संततधार चालू असते. गडाच्या पायऱ्या शेवाळतात. दगडांच्या फटी फटीतून गवताचे ठोंब वाकून बघू लागतात. गुडघा गुडघा गवतात वाटा हरवून जातात. धबधबे खळाळू लागतात. पहिल्या पाण्याच्या लाटेबरोबर कोसळलेले धोंडे, वाटेवर वानरांची

टोळी बसावी तसे इतस्ततः पसरलेले असतात. गडाचा गळा मग नाजूक तेरड्याने भरून जातो. चांगली जांभळी गुलाबी रंगांची पोतच्या पोत गडाच्या गळ्यात, दंडात, मनगटात, कमरेला, दृष्ट लागू नये म्हणून निसर्ग घालून टाकतो. अंगाखांद्यावरून हिरवे भरजरी शेले विणले जातात, वाऱ्याच्या झुळुकीबरोबर हे शेले हेलकावत असतात. झाडांच्या खोडांवर, पडक्या वाड्यांच्या जोत्यावर शेवाळी उगवतात. कसल्या कसल्या रानवेली मग दरवाज्यावर, बुरुजांवर, तटांवर चढून टकामका आकाशाकडे बघू लागतात.

अशा वेळी आपण रायगडाच्या पायथ्याशी असावं, त्याच्या तीनही टोकांवरून प्रचंड मोठे जलप्रपात खालच्या दरीत कोसळत असतात. ढगांचे गालीचे इकडून तिकडून उडत असतात. वाऱ्याच्या सोसाट्याने गवताच्या जटा पिंजारल्या जातात. अशा वेळी तो दिसतो, स्वर्गातून पृथ्वीवर उतरलेल्या गंगेला आपल्या जटेत धारण करणाऱ्या शिवगंगाधरासारखा !

गणपती गौरी नुकत्याच होऊन गेलेल्या असतात. नवरात्रीचे घट बसतात. गडोगडी पसरलेल्या देवीच्या देवळांमधून कुणी

भाविक पत्रावळीवर घट मांडतो. तिथलीच तेरडा सोनकीची माळ वर अडकवतो. बरोबर आणलेला एखादा खण, चिरडी देवीला नेसवतो, मळवट भरून आईला हात जोडून म्हणतो, “या रहाळावर, तुझी किरपा राहू दे गं माय....”

दसऱ्याला आजूबाजूच्या खेड्यांतले बापये पोरांस्नी घेऊन गडावर येतात. एका हातात निवदाचं ताट आणि दुसऱ्या हातात पोराचं बोट धरून बाप गडावर येतो. गडावरचा मारुती, गणपती, महादेव, भवानी सगळ्यांच्या समोर निविदाचं बोणं ठेवून जमिनीला नाक घाशीत पोराला थोरल्या राजांच्या वाड्याकडे घेऊन येतो. अशावेळी आपण राजगडावर असावं, सदरेच्या वरच्या ढालकाठीच्या चौंडक्याला टेकून पद्मावती माचीकडे बघत बसावं. फेटे, पागोटी, टोप्या, घोंगडी घेतलेले बापये सदरेसमोर येऊन न चुकता मुजरा घालतात. आपण त्या दृष्यात हरवलेले, नकळत डोळ्यात आलेलं पाणी पुसून टाकावं, जवळच्या माणसाला आपली ही अवस्था कळू नये म्हणून कुठेतरी बघायचं म्हणून बालेकिल्ल्यावर तरंगत स्तब्ध झालेल्या ससाण्याकडं नजर फिरवावी. दिवाळी उलटते आणि मग धुक्याचे लोटच्या लोट गडाला घेरून टाकतात. अगदी

हातावरचं काही दिसत नाही. चार- पाच महिने इतिहासाच्या साक्षीने चाललेला हा सृजनाचा सोहळा धुक्यात गडप होतो. आपणही मग जड पावलांनी गड उतरू लागावं, अर्थातच पुन्हा यायचं नक्की करूनच.



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

## ३. श्रीरायगड : काही स्मरणें.....

सरता पावसाळा होता. अजून पावसाची झड काही ऊणावली नव्हती. प्रतापगडावरचा ललितापंचमीचा ऊत्सव आटपला आणि गाडी तशीच पुढे रायगडला दामटली. पाच वाजायचा सुमार होता, पाचाडला पोहोचलो.

तेव्हा देशमुखांचे हॉटेलचे नूतनीकरण अजून झाले नव्हते, झोपडीवजा हॉटेल होते. मी, राजेंद्र टिपरे आणि सोलापूरची काही मित्रमंडळी होती. आभाळ भरून आलं होतं. गरमगरम कांदाभजी, चहा असा बेत सुरु होता आणि पावसाला सुरुवात झाली. हा असा बोराएवढा थेंब कोसळू लागला. बघता बघता हॉटेलच्या शेजारच्या ओढयाच पाणी वाढलं. हॉटेलमधे घोटाभर पाणी आलं. वरुन पाण्यातनं वहात आलेले विरुळे, नानेट्या टेबलाखाली घोटाळू लागल्या. आम्ही सगळे पाय वर घेऊन मांडया घालून बसलो.

तासभर पावसाचा धिंगाणा चालू होता. हा हॉटेलशेजारून वाहणारा ओढा कोंझरच्या पुढे एका कडयावरून खाली कोसळतो, तिथे एक छान धबधबा तयार होतो, ते ठिकाण माहिती असल्याने सगळी मंडळी गाडीत घातली आणि

धबधबा दाखवून आणला. पुन्हा एक चहाचं आवर्तन झालं, पाऊस ऊणावला होता. सॅक पाठीला लावल्या आणि हॉटेल सोडून रस्त्याला लागलो. समोर जे काही दिसलं त्यानं वाचाच बसली.

शंभर एक म्हशींचा कळप शेण टाकत गेल्यावर रस्त्यावर जसे शेणाचे असंख्य ढीग पडलेले दिसतील तसे बिळात पाणी शिरल्यानं रस्त्यावर सापांची वेटोळी पडली होती. एवढे असंख्य साप पहिल्यांदा पाहिले. सर्वानुमते मुक्काम पाचाडलाच करायचा ठराव तातडीने मंजूर झाला. रघुवीरच्या ओळखीने सार्वजनिक बांधकामखात्याच्या गेस्टहाऊसमधे रात्र काढली. सकाळी लवकर उठून चितदरवाजा गाठला. कालचा पाऊस जोरातच झाला होता. गडाचे तीनही धबधबे अजून छान सुरु होते.

खूबलढा बुरुजापाशी आलो आणि काय आश्चर्य, ठराविक वर्षांनंतर (बहुधा सात) फुलणारी कारवी, यावर्षी फुलली होती. वाटेच्या कडेने कारवीचा, तेरडयाचा आणि सोनकीचा जणू बांध घातला होता. महादरवाज्यापाशी आल्यावर तर तटावरून कोसळणारे धबधबे, खालचं पिंपळाच झाडं आणि दरवाजा ते टकमक पसरलेलं गवत, त्यावरची तेरडा

सोनकीची नक्षी असं काही अद्भूत दिसतं होतं, आमचे सोलापूरकर पार खूळाऊन गेले. गडावर गेल्यावर सॅक धर्मशाळेत टाकल्या आणि खुळ्यासारखे होळीच्या माळावर धावलो.

अख्खा गड हळद लागल्यासारखा पिवळाधमक दिसत होता. चांगला दोन दिवस मुक्काम ठोकला. परतताना पुन्हा सगळं ते दृश्य डोळयात साठवून घेतलं. एक गोष्ट मनाशी नक्की केली. इतर कोणत्याही वेळेला रायगडला जाणं झालं तरी पावसाळ्यात एक चक्कर नक्की मारायची.

दोन वर्षापूर्वी बत्तिसशिराळ्याच्या घाटातून मलकापूरला चाललो होतो. कोकरूड फाटयापासूनच पाऊस सुरु होता. घाट सुरू झाला आणि पुन्हा रस्त्यावर तशीच सापांची वेटोळी पडलेली दिसली. न राहवून पुन्हा एकदा रायगड आठवला. म्हणलं वेळ आहे हाताशी तर तुम्हालाही सांगावी आठवण. गेला नसाल कधी तर एकदा जाऊन या पावसाळ्यात रायगडला.

## ४. मार्तंड जे तापहीन ...

चैत्र शुद्ध चतुर्दशी, शिवपुण्यतिथीचा आदला दिवस. वसंताकडे जेवणं उरकून शिबंदीच्या घरट्यासमोरच्या खडकावर मी आणि राजू(राजेंद्रटिपरे) गप्पा मारत बसलो होतो. जगदीश्वराच्या देवळात, शिवसमाधीपाशी वर्दळ जाणवत होती.

थोडया वेळाने मंदिराच्या प्रांगणात इचलकरंजीकरबुवांचं किर्तन सुरु झालं. टाळ मृदूंगाचे आवाज वातावरणात भरून राहिले. तसेच किर्तन ऐकत वसंताच्या झोपडीबाहेरच्या अंगणात झोपून गेलो. पहाटे परत किर्तनाच्याच आवाजाने जाग आली. मारूतीजन्माचं किर्तन झालं. शिवपुण्यतिथीचा कार्यक्रम, सभा, मिरवणूक आटोपून आलेली तीन-चार हजार माणसं गड उतरून निघूनसुध्दा गेली. आमचा एक शिरस्ता ठरलेला होता. पुण्यतिथीच्या पौर्णिमेला गडावरून उतरायचं नाही. दुपारपर्यंत गड रिकामा झालेला असे. गडावर आमच्याव्यतिरिक्त कुणी नसायचं.

लख्ख पौर्णिमा, असा चांदीच्या ताटाएवढा चंद्र उगवायचा. त्या चंद्राच्या प्रकाशात मग रात्रभर भटकायचं. कधी

होळीच्या माळावर, कधी नगारखान्यात, कधी बाजारपेठेत, कधी टकमकवर असे गप्पांचे फड रंगत असत. त्यादिवशी असेच संध्याकाळच्या सुमाराला हिरकणीवर सूर्यास्त बघून येताना बाबूरावकडे एमटीडीसीच्या कँटीनला थांबलो.

बाहेर व्हरांडयात बसून चहा घेतला. अंधार पडायला लागला तसे जगदीश्वराकडे निघालो. मुक्काम देवळात करायचा होता. गप्पा मारत मारत राजवाडा, राजसभा ओलांडून नगारखान्यासमोर आलो, पूर्वेला एक निराळीच आभा जाणवत होती. लवकरच चंद्रोदय होणार असे संकेत होते. राजूच्या डोक्यात तो उगवता चंद्र जगदीश्वराच्या शिखराआडून फोटोत कैद करायचा विचार आला नी आम्ही जरा वेग वाढवला. होळीच्या माळावर शुकशुकाट होता. वाऱ्याचाच काय तो आवाज.

काल रात्री या ठिकाणी दोनेक हजार माणसं होती हे कुणाला सांगूनही खरं वाटलं नसतं. झपझप पावलं उचलीत बाजारपेठ गाठली. तोपर्यंत पूर्वेला चाहूल लागायला लागली. बाजारपेठ ओलांडून आम्ही ब्राम्हणवाड्याशेजारच्या घळीत शिरणार तोच राजूला फ्रेम सापडली, त्याने हातानेच मला थांबायची खूण केली. स्टँडवर कॅमेरा ॲडजस्ट करून

आम्ही पापणीसुद्धा न लववता जगदीश्वराच्या कळसाकडे पाहू लागलो. कळसामागून उजाळ वाढू लागला. कळस, कडेचे स्तंभ, देवळाची मागची भिंत, अलीकडच बोरीच झाडं असं सगळं ओळीत काजळाने आखलेल्या रेघेसारखं दिसायला लागलं. अन् .... अन् एका क्षणी गपकन तो पांढरा शुभ्र,  शीतल तेजाचा गोळा त्या कळसामागून वर आला. आकार उगवतीच्या सूर्याएवढाच मोठा होता. मला चटकन माऊलींची ओवी आठवली,

मार्तंड जे तापहीन ...

तो असा दिसतच होता, पण होता तापहीन, शीतळ.

राजूच्या कॅमेराचा क्षणा क्षणाला आवाज येत होता. एका अलौकिक क्षणाचे आम्ही दोघेचं साक्षीदार होतो. पंचवीसेक पौर्णिमा तरी मी रायगडावर काढल्या आहेत. पण त्या रात्री तो जसा तेजःपुंज दिसला, तसा तो मला परत कधीही दिसला नाही. लख्खं चांदिणं गडभर पसरलं होतं. वसंताकडे जाऊन जेवणं केली आणि निवांत समाधीसमोर नगारखान्याच्या पायऱ्यांवर बसून यथेच्छं गप्पा मारत बसलो. समोरचा भवानी टोकापर्यंतचा परिसर पंचामृतात

न्हाल्यासारखां पांढरटं दिसत होता. पहाटे पहाटे कधीतरी देवळात जाऊन झोपलो.



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

## ५. रायगडावरील धुकेजलेला पाऊस

शिर्काईला ऊजवं घालून आम्ही तिघे, मी, रवी आणि राजू होळीच्या माळावर आलो. संध्याकाळचे सात वाजले असावेत. पावसाळ्यात रायगडावर येण्याची आमची ही पहिलीच वेळ. सभोवार दाट धुकं पसरलेलं होतं. इतकं दाट की पुढे केलेल्या आपल्या हाताचा पंजा हे आपल्याला दिसू शकत नव्हता. दिशा काहीच समजत नव्हती. जायचं होतं जगदीश्वराच्या देवळाकडे. आधीच अंधार, त्यात एवढं दाट धुकं. आम्ही अंदाजानेच डाव्या हाताला एक एक पाऊल सरकत सरकत चाललो होतो, कशाला तरी धडकलो. चाचपून पाहिलं तर बाजारपेठेची भिंत.  तसेच अंदाजाने बाजारपेठेत घुसलो. अजून बाजारपेठ ओलांडून, ब्राह्मणवाडे ओलांडून जगदीश्वर गाठायचे म्हणजे जवळ जवळ फर्लांगभर अंतर कापायच होतं. तसे आम्ही या वाटेला सवयीचे, पण या धुकटात काही म्हणता काही समजत नव्हतं. सॅकमधून बॅटरी काढून लावली तर बॅटरीचा प्रकाश एका फुटावरून आमच्यावर रिफ्लेक्ट होत होता. ती बंद करून पुन्हा सॅकमधे ठेवली. तसेच एकेक पाऊल पुढे टाकू लागलो.

तेवढ्यात तडतड करत पावसाची एक सर आम्हाला भिजवून गेली. कानफटात मारल्यासारखा एकेक थेंब अंगावर वाजत होता. कसेबसे जगदीश्वराच्या देवळापाशी आलो. पंधरा मिनिटांचे अंतर कापायला तब्बल दीड तास लागला होता. तेथूनच वसंताला  हाका मारायला सुरुवात केली. जगदीश्वराच्या उजव्या हाताच्या टेपाडावर  धनगरांची चार पाच छोटी-छोटी घरं होती घरं कसली, झोपड्याच ! आवाजाच्या अंदाजाने वसंता आला. आम्हाला पाहून म्हणाला, "तुम्ही ? आता या येळंला ? धुकाट कसलं माजलंया !  रस्ता बिस्ता चुकला असता तर ? चला !"

त्याच्यामागोमाग झोपडीत आलो. आतल्या उबेने अंग सुखावलं. चहा, जेवण, गप्पा सुरू असतानाच बाहेर पावसाला सुरुवात झाली. बाहेर पडणाऱ्या पावसाचा आवाज, आत झोपडीत आमच्या मागे बांधलेली गुरं, वर माळ्यावर बसलेले वसंताचे वडील, समोर टांगलेला पाळणा, त्यात रडत असलेली वसंताची दीड महिन्याची मुलगी, आमच्या डाव्या हाताला एक भलं दांडगं कुत्रं, उजव्या हाताला एक मांजर, समोरच्या डालग्यात झाकलेल्या कोंबड्या व त्यांची पिल्लं यांचं कुचकुचणं, चुलीसमोर बसून

भाकऱ्या थापणारी वसंताची आई, भरीस भर म्हणून झोपडीत कोंडलेला धूर अशा शाही थाटात जेवणं पार पडली. वसंता म्हणाला," आता पडा हिथंच. देऊळ गळतंया, पार घोटाभर पानी हुबं हाय !" " इथं कुठं ?" माझा प्रश्न. "पडा की वर माळ्यावर." मी एकदा माळ्याकडे पाहिलं. जेमतेम सात फूट उंचीची झोपडी. त्यात खालून चार फुटांवर माळा बांधलेला. त्याखाली गुरं बांधलेली. माळ्यापासून वरचं आढं जेमतेम अडीच-तीन फुटांवर वर आडवे बांबू टाकून त्यावर साळीचा पेंढा अंथरला होता. थंडीनं सारं अंग ठसठसतं होतं. सॅक खाली ठेवून, वर जाऊन तिघेही आडवे झालो.

माझ्या डोळ्यासमोर सकाळपासूनचा प्रवास तरळत होता. काय काय अनुभवलं या प्रवासात ? जूनमधली ऐन पावसाळ्यात, रायगडची ही पहिलीच खेप.

गाडीने कात्रज घाट ओलांडला, तेव्हा हळूहळू उजडायला लागलं होतं. या दिवसात सूर्य दर्शन होणं शक्यच नव्हतं. पण जसजसा उजेड वाढू लागला, तसतशी डाव्या उजव्या हाताची डोंगर शिखरं धुक्याच्या दुलईतून डोकं वर काढत होती. उजव्या हाताला दिसणारा सिंहगड एक क्षणभर दर्शन

देऊन पुन्हा धुक्याआड गेला. पावसामुळे डोंगरावर साठलेलं पाणी ठिकठिकाणी रस्त्याच्या कडेच्या नालीतून वाहत होते. भोरफाट्याला गाडी आत वळायच्या आधी, दुरून डाव्या हाताला पुरंदरचं शिखर नजरेसमोरून तरळून गेलं. भाटघर धरण पूर्ण भरल्यामुळे त्याच्या दरवाजांमधून सोडलेलं मातकट रंगाचं पाणी मन मानेल तसं वाहात होतं.

भोरला पाच-दहा मिनिटं थांबून गाडी पुन्हा वरंध्याच्या दिशेने निघाली. पुन्हा रोहिडा, पांडवगड, रायरेश्वर पठार अशी ठरलेली स्टेशनं घेत, नजर रस्त्यालगत वाहणाऱ्या नदीच्या पात्रावर खिळली. उन्हाळ्यामध्ये केवळ एक धार या स्वरूपात वाहणारी नदी आता दुथडी भरून वेगात खळाळत होती. गाडी वरंध्याच्या घाटात शिरली आणि सृष्टीसौदर्यातले एकेक चमत्कार घडून येऊ लागले. गाडी क्षणात धुक्यात गुरफटून जात होती. डाव्या-उजव्या बाजूला फक्त दाट धुकं. ड्रायव्हर सवयीचा होता म्हणून ठीक. वळणावळणांवर खळाळत खाली झेपावणारे धबधबे.

गाडी वाघजाईच्या देवळापाशी थांबली. रस्त्यालगत प्रचंड खोल दरी पसरलेली होती. समोरच्या डोंगरदाटीत असलेल्या घळीत दोन प्रचंड मोठे प्रपात खाली कोसळत

होते, अंतर बरेच असल्याने त्यांचा आवाज ऐकू येत नव्हता. अन्य धबधबेही शांतपणे खालच्या हिरव्या गालिच्यावर आपलं पांढरे शुभ्र पाणी ओतीत त्या गर्दपणात गडप होत होते. गाडीच्या आवाजाने धावून आलेली माकडं थंडीमुळे व पावसामुळे गारठून किचकिचत होती.

गाडी निघून वरंधा घाट उतरु लागली. खऱ्या अर्थाने आता कोकणात प्रवेश होत होता. जागोजागी पसरलेल्या डोंगर उतारावरच्या भाताच्या खाचरातून पाणी वाहात होतं. डोक्यावर इरली घेतलेले कोकण्ये या पाण्याला वाट काढून देत होते. छत्र्या-दप्तर घेतलेली शाळेची पोरं गोंधळ घालीत एसटीत चढत होती, कंडक्टर त्यांच्यावर खेकसत होता. असा सगळा चिरपरिचित गोंधळ कानावर घेत ड्रायव्हर गाडी झपाट्याने महाडकडे नेत होता.

महाड आलं आणि गाडीतून उतरता उतरता एक मोठी सर आम्हाला भिजवून गेली. इथे एक नवीनच संकट दत्त म्हणून उभं राहीलं. महाडच्या एस. टी. डेपोचा संप नेमका आज सकाळपासूनच सुरू झाला होता. या संपाचा पुरेपूर फायदा घेत एका रिक्षावाल्याने आम्हाला कोंझरपर्यंत सोडवायला दीडशे रुपये घेतले.  कोंझर ते रायगडचा चित दरवाजा हे

सात किलोमीटर अंतर पायी चालून जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. ही पदयात्रा एका अर्थानं आमच्या पथ्यावरच पडली. हवा बरी होती. पाऊसही थांबला होता. धुकही विरळ होतं. जागोजागी पावलं थबकत होती.

धबधब्यांचे असंख्य प्रकार डोळ्यांना सुखवीत होते. रस्ता स्वच्छ धुतल्यासारखा काळा कुळकुळीत दिसत होता. त्याच्या कडेने फोफावलेली कारवीची झुडपं, ठिकठिकाणी फुललेला जांभळट तेरडा, कड्यावर उगवलेले गवत, वाऱ्याच्या झोतांबरोबर खालीवर होत होतं. एखादा मोठा गालीचा दोन्ही बाजूंना धरुन हलवल्यावर दिसेल तर तसं जागोजागी दिसत होतं. चिमणीएवढ्या आकाराचे काळे कुळकुळीत पक्षी शीळ घालीत या झाडांवरून त्या झाडांवर उडत होते. आम्ही चित दरवाजापाशी येऊन पोहोचलो. समोर दिसणारं दृष्य खरोखरच अवर्णनीय होतं. टकमक, हिरकणी आणि त्यांच्यामधलं श्रीगोंदे टोक अशी गडाची टोके. त्यांच्या माथ्यावर ढगांचे थर तरळत होते. तीनही टोकांपासून कोसळणारे प्रपात, त्या दृश्यात आणखीनच सौंदर्य ओतीत होते. शूचिर्भूत होऊन तपस्येला बसलेल्या शिवगंगाधरासारखा रायगड समाधीस्थ भासत होता. एका

क्षणात धुकं दाटून आलं आणि समोरच्या दृश्यावर पडदा पडला. गायीच्या हंबरण्यानं मी भानावर आलो. रात्री पावसात प्रवासाचं रुप आठवत असताना, केव्हा झोप लागली ते कळालंच नाही. उठून झोपडीच्या बाहेर आलो.

लख्ख उजाडले होतं. समोर समाधीचे शिखर आणि जगदीश्वराचे शिखर त्या उजेडात स्पष्ट दिसत होतं. मी तिकडे पाहून हात जोडले. तो नमस्कार त्या शिवाला होता, शिवप्रभूंना होता आणि निसर्गाचे अद्भूत चमत्कार दाखविण्याची किमया करणाऱ्या रायगडाला ही होता.



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

# ६. धुक्यात हरवली वाट

"चला-चला, सगळे लवकर खाली उतरा" ब्रेकवर करकचून पाय दाबत एस. टी. चा ड्रायव्हर जोरात ओरडला. घाटाच्या वळणांचा अंदाज असल्याने मी दरवाजापाशीच उभा होतो. खाडकन्  दरवाजा उघडून मी सगळे विद्यार्थी भराभरा खाली उतरवले. तोपर्यंत एक मोठासा दगड उचलून मी एस. टी. च्या मागच्या चाकाच्या टायरपुढे ठेवून उटी लावली. एव्हाना, विद्यार्थी खाली उतरून गाडीभोवती गोळा झाले होते.

मी पुढच्या बाजूस जाऊन पाहिले तर एस. टी. दरीच्या बाजूला असलेल्या रेलिंगला जाऊन चिकटली होती.  उटी लावल्यामुळे ड्रायव्हरने सावकाश ब्रेक सोडला. गाडी गियरमध्येच ठेवून, तो पटकन खाली उतरला आणि पुढच्या चाकाखाली दगड ठेवून तो शेजारच्या कट्ट्यावर डोके धरून बसला. त्याच सगळं अंग घामानं थबथबलं होतं.

थोड्या वेळाने सावरल्यावर मी त्याला म्हणालो," मी मुलांना घेऊन घाट उतरून खाली जातो. तुम्ही सावकाश एस. टी. खाली घेऊन या." तो मानेनेच "हो" म्हणाला. वेळ बऱ्यावर

होती म्हणून वाचलो. नाहीतर एस. टी. रेलिंगसकट खाली दरीत कोसळली असती.

१९९६ सालचा, आक्टोबर महिना होता. सोलापूरच्या प्रबोधिनीचे साठ विद्यार्थी घेऊन, रायगडला इतिहास संस्करण शिबिरासाठी निघालो होतो. जाताना वाटेत वरंध्याचा घाट उतरताना, घाटात वरील प्रसंग घडून आला होता. विद्यार्थ्यांना घाटात मोकळे सोडल्यावर सगळेजण निवांत चालत, घाटातून दिसणारे, सृष्टीसौंदर्य पाहत घाट उतरत होतो. त्यावेळी कल्पनाही नव्हती की निसर्ग असाच एक चमत्कार गडावर गेल्यावर आम्हाला दाखवणार आहे. संध्याकाळी मावळतीच्या वेळेत गड गाठला. पोरं हां हां म्हणता गड चढून गेली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळेला, गडाच्या टकमक टोकावर मुलांना घेऊन प्रतापराव गुजरांची कथा सांगत होतो. पावसाळा नुकताच संपलेला असल्याने सर्वत्र हिरवेगार गवत पसरलेले होते. दसऱ्याच्या सुमारास उमललेली सोनकीची फुलं अजूनही कुठं-कुठं अडचणीच्या जागी शिल्लक असलेली दिसत होती.

टकमक टोकावर मी उभा होतो. मुलं माझ्याकडे तोंड करून बसलेली असल्यानं त्यांची गडाकडे पाठ होती. थोड्या वेळात कललेला सूर्य, समोरच्या क्षितिजावर मावळणार होता. अचानक राजवाड्याच्या मागच्या बाजूने काळं-काळं दाट धुकं सगळ्या गडाला आपल्या कवेत घेत चाल करून येताना दिसलं. पाहता पाहता राजवाड्याची भिंत, मनोरे, गंगासागर तलाव, सगळं त्या धुक्यात गडप झालं. माझ्या छातीत धस्स् झालं. कुणी तरी एखादी जाड जाड काळी घोंगडी अंथरावी तसं धुकं पसरतं चाललं होतं. माझ्या मनात हज्जार प्रश्न उभे राहिले.

आता या धुक्याने आपल्याला असंच मुलांसकट गुरफटून घेतलं तर ? त्या काळ्या धुक्यात असणाऱ्या पाण्याच्या अंशामुळे, एखादी वीज आम्हाला माध्यम करून टकमकच्या कड्यावर कोसळली तर ?  सूर्यास्त होऊन गेल्यावरही ही धुक्याची चादर अशीच गडाला लपेटून राहिली तर ?

या साठ-सत्तर मुलांना त्या टकमकाच्या भयंकर कड्यावरून तशा अंधारात मी निवासाच्या ठिकाणी घेऊन जाणार कसा? एक ना दोन, हजार शंका. डोक्यात शंकांचं थैमान चाललं होतं आणि दुसरीकडे तोंडाचा पट्टा चालूच होता. "प्रतापराव

आपल्या सहा स्वारानिशी, खानाच्या चाळीस हजार फौजेत घुसले होते."  मी न थांबता वर्णन करीत होतो.

मनातली काळजी चेहऱ्यावर दिसू नये याचा आटोकाट प्रयत्न चालू होता. तेवढ्यात, ती काळीकुट्ट धुक्याची चादर आम्हाला कवेत घेऊन बसली. आम्ही सगळेच धुक्यात गडप झालो. समोर दोन फुटांवर बसलेला मुलगाही  मला दिसत नव्हता. मुलांना फक्त माझा आवाज ऐकू येत होता. कुठंतरी वाचलं होतं की संध्याकाळी पसरलेलं धुकं, कधी कधी सकाळपर्यंत हलत नाही म्हणे.  कधी कधी असं गडाला वेढून राहिलेलं धुकं दोन-दोन, चार-चार दिवस हलत नाही असहीं कुठेतरी वाचलं होतं.

मी मनातल्या मनात महाराजांचा धावा करीत होतो. एवढं काळं संकट, दूर करून या मुलांना घेऊन निदान बाजारपेठेपर्यंत तरी सुरक्षित पोहोचवा असे आर्जव करीत होतो. पाच मिनिटं गेली, दहा मिनिटं गेली, पंधरा मिनिटं गेली.

इकडं प्रतापरावांची लढाई शेवटच्या टप्प्यात आली होती. एक एक वीर पडत होता. मला त्या सात जणांचं आणि आम्हा साठ जणांचं  भविष्य एकच दिसायला लागलं. पण

मनात महाराजावरची एक अविचल श्रद्धा होती. एक अतूट विश्वास होता. नजर राजवाड्याकडे खिळली होती आणि तब्बल अर्ध्या तासानंतर राजवाड्याच्या बाजूकडून प्रकाश दिसू लागला. वारा कुठल्या बाजूने सुटला कोणास ठाऊक, पण वाऱ्यानं ते सारं धुक्याचं कवच हलवायला सुरुवात केली.

हळूहळू राजवाडा, मनोरे, गंगासागर असं सगळं या धुक्यातून बाहेर यायला लागलं. मी मनोमनी महाराजांना त्रिवार मुजरा केला. मनावरचा ताण एकदम कमी झाला. या गदारोळात इकडे डाव्या हाताला काय घडतंय, इकडे माझं लक्षच नव्हतं. वाऱ्यानं हलवलेलं सगळं धुकं, डाव्या हाताच्या खोल दरीत, काळ नदीच्या खोऱ्यात भरलं जात होतं. हळूहळू गडावरून दिसणारी नदी, त्याकाठचं छत्रीनिजामपूर हे सारं त्या धुक्यात गडप झालं. उत्तरेकडे असणारी डोंगरशिखरं आणि गडाचं टकमक टोक  यांच्यामध्ये जणू धुक्याचा समुद्र पसरला. एखादा ढगांचा गालिचा, पायतळी अंथरावा तशी गत झाली.

तेवढ्यात धुक्याची ती खोळ बाजूला सरल्याने सुर्यानं आपलं दर्शन दिलं. पश्चिमेकडून पडणार ऊन, उत्तर-पूर्वेकडे

पसरलेला तो ढगांचा गालिचा, यांच्यामध्ये उभे असलेले आम्ही साठ-सत्तर जण, आमच्या सावल्या त्या गालिच्यावर पसरल्या. मुलं अत्यानंदाने टाळ्या पिटीत नाचू लागली. त्यांच्या उड्या मारत असलेल्या सावल्या, त्या ढगांवर दिसू लागल्या. त्याचवेळी त्या ढगांवर इंद्रधनुष्य तरळू लागलं. वाऱ्यानं ढकललेलं ते धुकं दरीतूनही वर उसळू लागलं. उत्तरेकडील कड्यावर आदळून त्याचे ढग तयार होऊ लागले. भल्या मोठ्या परातीत कणिक मळून, त्यांचे भले मोठे गोळे तयार करावेत तद्वत आमच्या डोळ्यादेखत वारा त्या धुक्याचे ढग तयार करीत होता. हळूहळू दरीत घुसलेल्या वाऱ्याने, ते तयार केलेले ढग, वर उचलायला सुरुवात केली. उत्तरेकडील डोंगरशिखरांवर वर उचलून ती ढगांची रासच्या रास वारा दूर घेऊन गेला.

पुन्हा एखादी धुक्याची चादर अंथरली जायच्या आत, त्या सर्व जणांना घेऊन मी तडा तडा बाजारपेठेत आलो. आणि तडक समाधीकडे निघालो. सगळ्यांना सोबत घेऊन समाधीसमोर नतमस्तक झालो. डोळ्यांच्या कडात आनंदाचे अश्रू गोळा झाले होते. माझ्या हाकेला ओ देत महाराजांनी आम्हाला सर्वांना, त्या संकटातून सुखरूप परत आणल्याचा

तो आनंद होता. निसर्गानेही आज आमच्या ओंजळीत भरभरून माप टाकले होते. आजपर्यंत कधीच न अनुभवलेला धुक्याचा खेळ निसर्गाने आमच्यासाठी खेळून दाखवला होता. त्या निसर्गाला आणि निसर्गाच्या त्या खेळात आम्हाला सामील करून, त्यातून सुखरूप बाहेर आणणाऱ्या श्री. शिवप्रभूंना मानाचा त्रिवार मुजरा...!!



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

## ७. कोजागिरी रायगडावरची !

अश्विन शुद्ध पौर्णिमा, नेहमीच्या भाषेत सांगायचं म्हटलं तर कोजागिरी पौर्णिमा. बऱ्याच दिवसांपासून कोजागिरीला रायगडाला जायचं मनात घाटत होतं. प्रत्यक्ष योग त्यादिवशी जुळून आला. सकाळी सकाळी रवीचा फोन आला, "तासाभरात येतो, आवरुन तयार राहा. रायगडाला जाऊन येऊ. अनायसे कोजागिरी आहे." माझ्या आनंदाला जणू भरती आली. दहा वाजता कात्रज सोडून घाटात गाडी घातली आणि डोळ्यांचे पारणे फिटले. रस्त्याच्या कडेने डाव्या- उजव्या हाताला गर्द पिवळ्या रंगाची तिळाची फुले जणू गालिच्यासारखी पसरलेली होती. एवढा मोठा नऊ-दहा किलोमीटरचा घाट फुलांनी झाकून गेला होता. रायगडाला येईपर्यंत थोड्याफार फरकाने, हाच प्रकार सर्वच दिसत होता. हिरवेगार गवत आणि त्यावर दाटीवाटीने फुललेली पिवळी जर्द फुले, जणू एखादी बुट्टेदार पैठणीच नेसून निसर्गदेवता वावरत असावी असा सर्वत्र भास होत होता.

चार वाजता गडावर पोहोचलो. वसंताकडे सामान ठेवलं. थोडी पोटपूजा करून कॅमेरा घेऊन भटकायला बाहेर पडलो. वसंताच्या घरापासून म्हणजे श्री. जगदीश्वराच्या देवळापासून हिरकणी टोक बरंच लांब आहे. सुर्यास्ताला अजून बराच अवकाश होता. रात्री वसंताला दूध घेऊन समाधीपाशी यायला सांगितलं आणि निघालो.  साऱ्या गडावर सोनकीची छोटी छोटी पिवळीधम्मक फुलं उमलली होती, जणू गडाला हळद लागली होती. बाजारपेठ ओलांडून होळीच्या माळावर आलो. तसेच पुढे येऊन गंगासागराला वळसा घालून पालखी दरवाज्याच्या कडेने हिरकणीकडे निघालो. एमटीडीसीचे गेस्ट हाऊस ओलांडले. आता सुरू झाला उतार. अगदी जपून पावले टाकीत हिरकणीवर पोहोचलो. रवीला काही सूर्यास्ताचे फोटो घ्यायचे होते. ते आटपून परत एमटीडीसी पर्यंत येईपर्यंत चांगलाच अंधारलं होतं. मघाशी हिरकणीवर बसल्याबसल्या विषय निघाला होता. हिरकणी हा कडा उतरून गेली तीही कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री. त्याच रात्री तिने सर्व स्त्री समाजाला आत्मशक्तीचं, स्त्रीशक्तीचं एक अलौकिक देणं आपल्या कृतीतून घडवून दाखवलं.  एमटीडीसीच्या कॅन्टीनमध्ये चहा

घेऊन मेणादरवाजातून राजवाड्यात शिरलो. सरळ पालखीदरवाज्याच्या वरच्या बाजूने मनोऱ्यात आलो. दूर तिकडे, जगदीश्वराचं शिखर अंधाऱ्या आभाळात अस्पष्ट जाणवत होतं. हळूहळू अंधार कमी होऊ लागला. मनोऱ्याच्या कमानीतून दिसणारं आकाश रंग बदलू लागलं आणि एका क्षणी चांगला परातभर मोठा चांदीचा गोळा दूरवरच्या राजगड तोरण्याच्या मधल्या बेचक्यातून वर आला. आम्ही दोघेही मुग्ध होऊन ते रूपडं न्याहाळीत मनोऱ्यात बसून होतो. खाली गंगासागराचं पाणी उचंबळत होतं. चंद्र थोडा वर आल्यावर पुन्हा राजवाड्यात शिरलो. आतल्या सगळ्या भग्न वास्तू त्या रुपेरी उजेडात, काही वेगळ्याच भासत होत्या. हे त्यांचे नेहमीचं रुप नव्हतं. मनाला भूल घालणारे, वेड लावणारे, प्रसंगी चटका लावणारे एक अनामिक, हुरहूर लावणारे असे काहीसे त्यांचे रूप त्याक्षणी भासत होते. तो राणीवसा, ते मधले महाल, तो महाराजांचा राहता वाडा, ती राजसदर सारे त्या रुपेरी चांदण्यात न्हाऊन निघाले होते. तिथेच महाराजांच्या वाड्याच्या ओट्यावर बसून राहिलो. किती आठवणी, किती प्रसंग, अशाच एखाद्या कोजागिरीला या इथे सगळे खासे

खासे जमले असतील. थोडक्या गप्पा वगैरे मारत महाराजांसवे सगळ्यांनी दुग्धपान केले असेल. त्या तिकडे राणीमहालात नाजूक गडबड, धावपळ सुरू असेल, खुद्द आऊसाहेब, युवराज आणि राण्या महाराजांची वाट पाहत असतील. सरदाराबरोबरचा कार्यक्रम आटोपून महाराज खासगीत आल्यावर, पुन्हा चर्चा, हास्यविनोद असे काही दुर्मिळ विश्रांतीचे क्षण या वास्तूंच्या साक्षीने महाराजांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी घालवले असतील. ते सारे या वास्तूंना आठवत असेल का? त्यांच्या हृदयात काय कालवाकालव होत असेल? असे काहीसे कल्पित, त्या शांत वातावरणात बराच वेळ बसून होतो. चंद्र चांगलाच वर आला, तसे राजसभेत आलो. ते प्रचंड आवार, तो नगारखाना, ते सिंहासन, सारे त्या क्षणी संजीवनीचा स्पर्श होऊन जिवंत झाल्यासारखे भासत होते. जणू त्या वास्तू आत्मकथन करण्याच्या पावित्र्यात असाव्यात असे भास मनाला होत होते. नगारखान्यातून बाहेर पडून होळीच्या माळावर आलो. चांदणे नुसते उतू जात होते. शेजारी महाराजांचा सिंहासनाधिष्ठित पुतळा दूर दूर उत्तरेकडे नजर लावून स्तब्ध होता. कसलाच आवाज नाही. तसेच बाजारपेठ

ओलांडून पुढे निघालो. शिबंदीची घरटी,ब्राह्मणवाडे ओलांडून जगदीश्वराकडे निघालो. वाड्यांच्या चौथऱ्यावर उगवलेली निवडुंगाची, रामेठ्याची झुडपं त्या प्रकाशात न्हाऊन निघत होती. शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या शब्दात सांगायचे तर ओल्या खोबऱ्याच्या किसासारखे चांदणे गडभर पसरले होते.

श्री. जगदीश्वराचे दर्शन घेऊन समाधीपाशी येऊन बसलो. समोर डाव्या हातास शिबंदीची घरटी, त्याहीपलीकडे तो लिंगाणा, समोर तोरणा, राजगड, उजव्या हातास भवानी टोक- सारा परिसर लख्ख दिसत होता. जवळजवळ तीन-चार तास आम्ही दोघे एकमेकांशी एकही शब्द बोललो नव्हतो. त्याची गरजही वाटत नव्हती. मनाची कवाडं सताड उघडी होती. भावनेचा वारा पिंगा घालत होता. शिवकाळाच्या आठवणींनी मनाचा तळ ढवळून निघत होता. जे जे दिसेल ते साठवून घ्यायचा, आटोकाट प्रयत्न डोळे करीत होते. असा विचारांत हरवलो असतानाच सहज आठवलं की कोजागिरीच्या मध्यरात्री म्हणे श्रीलक्ष्मी को जागर्ती ? को जागर्ती ? कोण जागं आहे ? असं विचारत फिरते. जो जागा असेल त्याच्याकडे ती वास करते, असा

एक समज सर्वत्र आहे. तीन-साडेतीनशे वर्षांपूर्वी जेव्हा गड नांदता होता, तेव्हाही ती अशीच फिरली असेल पण तिला विचारावं मात्र अजिबात लागलं नसेल. स्वातंत्र्यलक्ष्मीच्या आराधनेत गडावरच्या प्रत्येक घरातलं, प्रत्येक माणूस अहोरात्र जागृत असेलेलं तिनं पाहिलं असेल. या सर्वांचाच जो मुकुटमणी, श्री शिवाजीराजा, यासाठी अहोरात्र कष्ट करताना तिने पाहिला असेल आणि प्रसन्न होऊन तिने त्याच्या कोषागारात कायमचे वास्तव्य केले असेल.

आज मात्र वेळ तशी नाही. आजच्या कोजागिरीला श्रीलक्ष्मीला घसा फुटेस्तोवर, कोण जागं आहे हे विचारण्याची पाळी आली आहे. संस्कृतीच्या, सभ्यतेच्या, देवाधर्माच्या आणि स्वतंत्रतेच्या विनाशाची ऐन मध्यरात्र झाली तरी लोक आपले झोपलेले आहेत. भौतिक सुखांना कवटाळून, लौकिक चारित्र्याला कवटाळून, प्रांत भाषेच्या अलिप्ततावादांना कवटाळून, जातीपातीच्या घोंगड्या ओढून, लोक आपले निवांत झोपले आहेत. श्रीलक्ष्मी बिचारी विचारत विचारत फिरत आहे. तिच्या आणि माझ्या मनातही एक अस्पष्टशी आशा आहे की, कुणीतरी निश्चित जागं असेल.

कुणीतरी हाक मारत होतं म्हणून भानावर आलो. तो वसंता मागे गरम-गरम दूधाचा तांब्या घेऊन उभा होता. दूध घेत असताना समोर समाधीकडे लक्ष गेले. चंद्र अगदी समाधीवर आला होता. वरून जणू दुधाचा अभिषेक समाधीवर होत होता. आजची सामाजिक आणि राजकीय स्थिती पाहून तडफडणाऱ्या त्या देवतुल्य आत्म्याच्या अंतरीची आग, तो आपल्या अमृत वर्षावाने शांत करीत असावा. त्याचं आणि महाराजांचंही एक अतूट नातं आहे. स्वतः सूर्यवंशी असूनही महाराजांनी ज्याला आपला आदर्श मानला, तो भगवान श्रीकृष्ण चंद्रवंशी ! स्वतः मातुश्री जिजाऊसाहेबही चंद्रवंशी जाधवांच्या कुळातल्या आणि महाराजांचे महानिर्वाणही पौर्णिमेचंच, चैत्र शुद्ध पौर्णिमा !

## ८. गढमे गढ रायगढ....

"कि भीषोण सुंदर" कानावर पडलेल्या या उद्गारांनी मी दचकून शेजारी पाहिले. पांढरा शुभ्र कुर्ता, कमरेला लुंगी, कृश अंगकाठी, हातात एक छोटी ब्रीफकेस असे एक वृद्ध व्यक्तिमत्व, शेजारी उभे होते. भान हरपून समोर दिसणाऱ्या दृश्याकडे डोळे भरुन पहात होते. शेजारी एक तरुण उभा, त्याचीही अवस्था थोडीफार तशीच. समोर दिसणारे दृश्य केवळ वर्णनापलीकडचे होते.

ऑगस्टच्या पडत्या पावसात नेहमीप्रमाणे मी, रवी आणि राजू रायगडला आलो होतो. आता गाडीतून उतरलो आणि समोर दिसणारे दृश्य पाहात तसेच थबकलो. समोर गडाची तीनही टोके उंच आभाळात स्थिरावल्यासारखी भासत होती. पायथ्यापासून माथ्यापर्यंत ढगांचा दाट थर पसरला होता. त्यामुळे माथ्याखालचे काही दिसत नव्हते. तीनही टोकावरून कोसळणारे धबधबेही ढगांच्या गर्दीत लुप्त होत होते. तेवढ्यात एखाद्या पडद्यासारखी ती धुकटाची दुलई बाजूला सरकली आणि स्वच्छ धुऊन काढलेल्या एखाद्या शिवलिंगासारखा रायगड दृष्टीस पडला.

त्याच वेळी त्या वृद्धाच्या तोंडून प्रतिक्रिया बाहेर पडली,
" कि भीषोण सुंदर".
किती अर्थपूर्ण प्रतिक्रिया होती! समोर दिसणारे सौंदर्य भीषण होते, तितकेच सुंदरही ! एकूण वेशभूषेवरून दोघेही परप्रांतीय वाटत होते. पुढे होत मी विचारले, " श्रीमानजी, आपका शुभनाम?" " सोमदत्त चटोपाध्याय और ये मेरा भतिजा, सौमित्र चटोपाध्याय." "कहासे पधारे ?" " कलकत्ता से" आम्हा तिघांनाही आश्चर्याचा पहिला धक्का बसला. एवढ्या मरण पावसात हा माणूस कलकत्त्याहून रायगड पाहायला आला होता.
वेळ बराच झाला होता म्हणून आम्ही पायऱ्या चढायला सुरुवात केली. "हमारे साथ चलिये" मी म्हणालो. तसे दोघेही आमच्या पाठीमागून सावकाश वर चढू लागले. आम्ही पाऊण तासात गडावर पोहोचतो, पण आज ही पाहुणे मंडळी बरोबर होती. त्यातून या मुलुखात अपरिचित !
आम्ही सावकाश त्यांच्या चालीने पायऱ्या चढत होतो. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे पायऱ्यांवर कमालीचे शेवाळे झाले होते. एकेक पाऊल जपून ठेवावे लागत होते. वाळसूऱ्याच्या खिंडीत येईपर्यंत पाहुणेमंडळी दोन वेळा विश्रांतीसाठी

बसली. थंडीत त्यांना घाम फुटला होता. खिंडीत आल्यावर त्यांनी विचारले," अभी कितना दूर चलना पडेगा? " मी म्हणालो, "चलिये" मला एकूण लक्षणे अवघड दिसत होती.

एकतर आम्ही आतापर्यंत १/३ चढून आलो होतो. अजून बराच मोठा पल्ला गाठायचा होता आणि ही मंडळी एवढ्यातच गळाठली होती. मला वाटले, जास्तीत जास्त हे महादरवाजापर्यंत येतील आणि तिथून परत फिरतील. आम्ही जसजसे वर चढू लागलो तसतसे धुके जास्तच दाट होऊ लागले अगदी हातावरचेदेखील दिसेना.

मधूनच वारा घोंघावत येत होता व हे धुकट थोडे ऊणावत होते. मधले दोन धबधबे पार करून आम्ही महादरवाजापाशी आलो. मंडळी देवडीवर विसावली. त्यांना वाटले, झाऽऽलं, पण अजून एक पल्ला गाठायचा होता. त्या पुतण्याच्या चेहऱ्यावर थोडा त्रासिक भाव व भीती दिसत होती. मी सहज विचारले, "चाचाजी, आप की उमर ?" "तिहत्तर पूरे हो गये बेटा !" आश्चर्याचा दुसरा धक्का, "इतना ही नही, इन्हे हार्टट्रबल और ब्लडप्रेशर भी है, इसलिये मै यहाँ आने के लिए मना कर रहा था। अब इतने दूर, इतनी ऊँचाई पर कुछ हो गया, तो मैं क्या करूंगा? कहीं डॉक्टर भी नही मिलेगा"

पुतण्या करकुरला." मुझे कुछ नही होगा" हे त्यांचे उत्तर. मी म्हणालो," चिंता ना करें। ये मेरा दोस्त डॉक्टर है और वैसे भी कोई तकलीफ नही होगी, हम आपके साथ है और इस वक्त, आप श्री शिवछत्रपतीजी की छत्रछाया मे है। लेकिन इतनी दूर आप कैसे पधारे ? "

एव्हाना ते बरेच सावरले होते म्हणाले, "बेटा, बहुत सालोंसे कॉलेज में इतिहास पढाता था। मैने इतिहास मे एमए किया है। पढाते वक्त मनमें बार-बार उमंगे उठती थी कि कब मै महाराष्ट्र जाऊंगा और वहाँ के ये शिवपद चिन्होंसे पुनीत किल्ले को देखूँगा ? रिटायर होने के बाद आना चाहा तो हार्टअटॅक की वजह से आ न सका। फिर कुछ साल विश्राम कर लिया और पिछले साल से ग्वालियर, झाँसी, चित्तोड, जयपूर देखते देखते सिंहगढ देखकर आज रायगढ पहूँचा हूँ। जीवन की सारी मुरादे पूरी हो गई।"

पुन्हा वर चालू लागलो. वर येऊन धर्मशाळेत त्यांच्या उतरण्याची व्यवस्था केली. त्यांना विश्रांती घ्यायला सांगून आम्ही राजवाड्याकडे वळलो. धुके प्रचंड होते, त्यामुळे फोटो वगैरे काढता येणे शक्यच नव्हते. सिंहासनाला मुजरे

करुन परत धर्मशाळेत आलो. मंडळी चहा वगैरे घेऊन ताजीतवानी झाली होती.

पाच वाजायला आले होते. अंधार पडायच्या आत समाधीचे दर्शन घ्यावे व वसंताकडे जेवण उरकून परत यावे या अशा हिशोबाने त्यांना घेऊन निघालो. मध्येच धुके गडद होत होते, मधेच उणावत होते. आम्ही सरावाचे असल्यामुळे झपाझप चाललो होतो. मधून मधून बाजूला होणारे धुक्यामुळे जे काही दिसत होते, त्यामुळे या मंडळींची नजर विस्फारली जात होती.

बाजारपेठ, वाड्यांचे चौथरे ओलांडून आम्ही श्री.जगदीश्वराच्या देवळात आलो. आत शांत वातावरणात आवाज चांगलाच घुमत होता. वरचे छत गळत असल्याने साऱ्या सभामंडपात पाणी साचले होते. बसायलाही जागा नव्हती. तसेच दर्शन घेतले. चार-दोन अभंग म्हणून निघणार एवढ्यात चाचाजींनी रवींद्रनाथ टागोरांची शिवाजी महाराजांवरची कविता म्हणायला सुरुवात केली. बाहेर वारा घोंगावत होता. आत त्यांचा किनरा स्वर, मूळचा बंगाली भाषेचा गोडवा या साऱ्यांचा मिळून असा काही परिणाम साधला गेला होता की सांगता पुरवत नाही. बाहेर आलो.

श्रीशिवसमाधीचे दर्शन घेतले. चाचाजींनी तिथेच बैठक मांडली, डोळे मिटून ध्यानस्थ बसले. आम्हीही शेजारी बसलो. बऱ्याच वेळाने पावसाची हलकी सर आली म्हणून मी डोळे उघडले तर चाचाजींच्या मिटल्या डोळ्यातून अखंड अश्रू बाहेर पडत होते. चेहऱ्यावर एक अपूर्व समाधान दिसत होते. त्यांचा पुतण्या एकदा त्यांच्याकडे, एकदा श्रीशिवसमाधीकडे पाहात होता. तो माझ्या कानात कुजबुजला,"चाचाजींका कहना मानकर यहाँ आया, बहोत अच्छा हुवा।" "आज मेरा भी जीवन धन्य हो गया।"

तिथून निघून वसंताकडे आलो. पुन्हा एकदा चहा झाला. जेवणाची तयारी सुरु होती. तिकडे आमच्या गप्पा सुरू होत्या. बाहेर परत पावसाला सुरुवात झाली. गरम गरम तांदूळाची भाकरी, कांदा बटाट्याचा रस्सा, लसूण मिरच्यांचा खर्डा असा शाही बेत, चारी ठाव मिठाईत वावरणारी ही बंगाली मंडळी तो बेत पाहून हरखून गेली. जेवणे उरकून आम्ही बाहेर आलो तोपर्यंत आठ वाजले होते. पाऊस थांबला होता.

वसंताचा निरोप घेतला. कोजागिरीला पुन्हा येतो म्हणून सांगितले आणि निघालो. पण एकूण अवघड दिसत होते.

धुके इतके दाट होते की दिशा समजतच नव्हती. शेवटी वसंताने आम्हाला देवळापर्यंत आणून रस्त्यावर पोहोचते केले. सवयीचे होतो व पायाखालचा रस्ता होता म्हणून ठीक नाहीतर...... चालता चालताच चाचाजींना विचारले," कहिये कैसा लगा?" ते उत्तरले, "आज तक कहावत सुनी थी, गढ में गढ चित्तोडगढ, बाकी सब गढीयाँ। लेकिन मुझे लगता है कि लिखनेवालेने शायद रायगढ देखा नही होगा। अगर देखता तो यहीं कहता गढ मे गढ रायगढ, बाकी सब गढीयाँ।"



**(फोटो- सोशल मिडियावरून साभार)**

# ९. आता सुखाने मरेन

"उत्तर का जो इतिहास है, वह सारा समझौतों का इतिहास है और यहाँ दख्खनमे, जो इतिहास श्री शिवछत्रपतीजीने निर्माण किया, वह सारा संघर्षों का इतिहास है ।" एका वाक्यात दक्षिणेच्या इतिहासाचे मर्मग्राही विवेचन चाचाजींनी केलं होतं. श्रीजगदीश्वर मंदिराकडून धर्मशाळेकडे परतत होतो. बाजारपेठेत येऊन एका दुकानाच्या कट्ट्यावर विसावलो. चाचाजींना धाप लागली होती.

अनायासे विषय निघालाच होता म्हणून मी चाचाजींना विचारले,"चाचाजी, आपने उत्तर के किले देखे और दख्खन के भी, जैसे सिंहगढ, रायगढ । वहाँ तो सारी इमारते सुस्थिती में होगी, यहाँ तो सारा ध्वस्त पडा है । तो उसकी तुलना में यहाँ तो देखने के लिए कुछ है ही नही । प्रश्न जाणून बुजून विचारला होता हे त्यांच्याही लक्षात आले. थोडे हसून ते म्हणाले "बेटा, यहाँ बात देखने की नही, समझने की है। सोचने की है । ये जो ध्वस्त अवशेष है, जिसे ये समाज दूषण देता है, ये इनके सही रुप में आभूषण है । उपर जो किले है, उनकी सारी की सारी इमारते सुस्थिती में

होगी, लेकिन उन्हे वैसा रखने के लिए, उन लोगों को क्या क्या नही करना पडा । उन लोगों का इतिहास सारा समझौतों का इतिहास है और यहाँ श्री शिवछत्रपतींजी ने जो निर्माण किया वो संघर्षों का  इतिहास है। हिंदू धर्म और हिंदू संस्कृती के लिए श्री छत्रपती शिवाजी महाराजने जो किया, उसका ऋण पूरा का पूरा हिंदू समाज कभी नही चुका सकता । तुम्हे वो भूषण का दोहा तो याद होगा।

*काशीजी की कला जाती।

मथुरा मस्जिद होती।

अगर श्रीशिवाजीमहाराज ना होते।

तो सुन्नत होत सबकी।*

इसलिये बेटा, महाराष्ट्रही नही पुरा हिंदुस्तान उनका ऋण कभी नही चुका पायेगा। लेकिन हमारा दुर्भाग्य देखो, जो उन्होने अपनी जान पर खेलकर बचाया,  बनाया, उन्हे हम स्वतंत्र भारत में आज फिर खो रहे है। यह इस देश का दुर्भाग्य है।  इन्ही हालात मे अगर कही से राष्ट्रनिर्माण की प्रेरणा मिल सकती है तो  इन्ही ध्वस्त अवशेषोंसे, इसी मिट्टीसे, जो अनगिनत वीर पुरुषों के खूनसे रंगी है । राष्ट्रनिर्माण की प्रेरणा एअरकंडीशन्ड रूममें कुर्सीपर बैठकर,

सुबह के चाय के साथ अखबार पढकर नही मिलती, उसके लिए अनगिनत विपदाओंका सामना करना पडता है । जैसे वीर सावरकरजीने किया था, लोकमान्य तिलकजीने किया था । उन्हे भी तो प्रेरणा यहींसे प्राप्त हुयी थी ना ? और इसलिये मै ऐसी घनघोर बारिशमें भी यहाँ आया हूँ । कौन जाने कब दुसरा या तिसरा हार्टअटॅक आयेगा और ये यात्रा खत्म होगी ? लेकिन अब कोई चिंता नही ! रायगढ देख लिया, अब मै चैनसे मर सकता हूँ। "

अंधार पडत चालला होता. धुकं आणखीनच गडद होत होतं व त्या धुकटात हरवलेले आम्ही पाच जण बाजारपेठेच्या मध्यावर बसून होतो. ते वातावरण, ते विचार आणि महाराष्ट्राविषयी व श्री छत्रपती महाराजांविषयी भरभरून बोलणारा तो बंगाली तपस्वी, सारंच अलौकिक !

निघता निघता चाचाजी म्हणाले," सुनो आनंद, मेरी एक बात ध्यान में रखना, सही मायनेमे अगर जीवन का अर्थ समझना चाहते हो तो बेचैनीमें जिओ और चैनसे मरो ।"

या वाक्याचा अर्थ लावत आम्ही धर्मशाळेकडे येत होतो. तेवढ्यात त्यांनी पुन्हा विचारले, " महाराष्ट्र के सभी लोगोंने रायगढ देखा होगा ?" आम्ही तिघांनी माना खाली घातल्या,

काय उत्तर देणार? रायगड आणि राजगड हे दोन वेगवेगळे किल्ले आहेत, हेही बहुतांश जनतेला माहित नाही म्हणून सांगणार की काय सांगणार? पण एवढ्यात धर्मशाळा आल्याने त्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे तसेच राहून गेले. सामान आवरून आम्ही झोपायच्या तयारीला लागलो. एवढ्यात पुन्हा पाऊस सुरू झाला. बराच वेळ पत्र्यावर पावसाचा आवाज येत होता. दिवसभराच्या श्रमाने केव्हा झोप लागली कळालेच नाही.

पहाटे जाग आली वाऱ्याच्या आवाजाने. खोलीच्या बाहेर येउन पाहिले, तो पाऊस थांबला होता. बहुधा रात्रभर पडत असावा, कारण समोरच्या पायऱ्यांवरून अजूनही पाणी वाहत होते.  वातावरण बऱ्यापैंकी स्वच्छ होते. खाली उतरायला सुरूवात करण्यापूर्वी चाचाजींना राजवाडा दाखवून आणायचा होता, म्हणून बांधाबांध करून बाहेर पडलो. वाऱ्यामुळे थंडी वाजत होती. गंगासागराच्या कडेने वर येऊन पालखी दरवाज्यातून वर वाड्यात आलो. जमेल तशी माहिती सांगत राजसभेमध्ये आलो. ते प्रचंड आवार, तो भव्य नगारखाना, सगळे पाहून चाचाजी अवाक झाले. वारंवार विचारत होते," एवढ्या उंचीवर हे एवढे देखणे

बांधकाम कसे केले ?" सिंहासनाला मुजरे करून आम्ही नगारखान्यातून बाहेर पडलो व होळीच्या माळाकडे निघालो. माळावरच्या महाराजांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन, पुढे शिर्काईचं दर्शन घ्यायचं व उतरायला सुरुवात करायची या विचारात चाललो होतो.

माळावर पाऊल ठेवतो न ठेवतो तोच खालच्या दरीतून धुक्याचे प्रचंड लोटच्या लोट वर उठले आणि क्षणात आमच्यासकट सर्व त्या धुक्यात गडप झालं. एकमेकांच्या आकृतीशिवाय काही दिसत नव्हतं. अंदाजाने पुतळ्याकडे निघालो. चालता चालता चाचाजी अचानक थांबले, वळून म्हणाले, "देखो बच्चों, इस घने कोहरे मे एक बडा अहसास हो रहा है, अपनी जीवन यात्रा के बारे में न आगे का पता है न पीछे का, बस चल रहे है अतीत से अनंत की ओर !" एव्हाना पुतळ्यापाशी येऊन पोहोचलो होतो. सगळ्यांनी वाकून नमस्कार केला आणि आम्ही तिघेही ज्या गोष्टीची अपेक्षा करत होतो नेमके तेच घडले. पुतळा पाहून चाचाजींनी नेमका प्रश्न विचारला, " ये श्रीशिवप्रतिमा यहाँ क्यू बिठाई? अंदर सुना सिंहासन और बाहर यहाँपर धूप और बारिश में बगैर छत्र की ये प्रतिमा ?" पुन्हा माना खाली घालून आम्ही

गप्प राहिलो. बहुधा कारण त्यांच्या लक्षात आले असावे कारण काही क्षणानंतर तेच म्हणाले, "चलिये, कालाय तस्मै नमः। लेकिन ये गलती शीघ्रातिशीघ्र सुधारनी होगी।"

झपाझप खाली उतरलो. त्यांची गाडी अजून यायची होती. आमची गाडी येऊन उभी राहिली. त्यांचा निरोप घेतला. तिघांनीही खाली वाकून नमस्कार केला. त्यांनी पाठीवरुन हात फिरवीत म्हटले, "खुश रहो, लेकिन इस जगह को कभी मत भूलना, अगर जिंदा रहा तो पुण्यतिथी उत्सव पर जरूर आऊंगा। उस वक्त पुरा रायगढ देखेंगे।" क्षणभर मनात कालवाकालव झाली. गाडीच्या वाजणाऱ्या घंटेने भानावर आलो. आत  जाऊन बसलो. चाचाजी पायरीवर उभे राहून हात हलवीत निरोप घेत होते. गाडी निघाली. वळणावर एकदा रायगड आणि चाचाजी दिसले. मनोमनी म्हणालो,"पुनरागमनायच!" डोळे मिटून विचार करू लागलो. मला कालचा प्रसंग आठवला, सायंकाळी श्रीजगदीश्वर मंदिरातून बाहेर आलो. श्रीशिवछत्रपतींच्या समाधीचं दर्शन घेतलं, चाचाजींनी तिथेच बैठक मारली होती. डोळे मिटून ध्यानस्थ बसले होते. आम्हीही शेजारी बसलो. बऱ्याच वेळाने पावसाची हलकीशी सर आली म्हणून मी डोळे

उघडले तर चाचाजींच्या मिटल्या डोळ्यातून अखंड अश्रू बाहेर पडत होते. चेहऱ्यावर एक अपूर्व समाधान विलसत होते. त्यांचा पुतण्या एकदा त्यांच्याकडे एकदा श्री शिवछत्रपतींच्या समाधीकडे पाहत होता. तो माझ्या कानात कुजबुजला," चाचाजींका कहना मानकर यहाँ आया, बहुत अच्छा हुआ ! आज मेरा भी जीवन धन्य हो गया ।" त्यांच्या या प्रतिक्रियेने मला पुन्हा अंतर्मुख केलं. मनात आले, इतक्या खेपा केल्या रायगडच्या, प्रत्येक खेपेला एक नवीन प्रेरणा, नवा आत्मविश्वास, नवी जिद्द अनुभवली. पण या खेपेस अनुभवलं ते केवळ दैवी देणं होतं, तो एक साक्षात्कार होता. राजकारण्यांनी वापरून वापरून बुळबुळीत केलेल्या 'राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक अखंडता, विविधतेतील एकता, परंपरेतील समानता वगैरे शब्दांचे खरे अर्थ आज समजले. कुठे कलकत्ता, कुठे रायगड ! मनात उमेद नसली तर सोलापूर ते रायगड हे अंतरही फार वाटतं आणि मानसिक ओढ असेल, प्रबळ इच्छा असेल तर ७३ वर्षाचा हृदयरोगी, कलकत्ता ते रायगड हे अंतरही विनासायास पार करतो. श्रीशिवछत्रपतींची पुण्याई एवढीच यामागची खरी आत्मशक्ती.'

## १०. वृक्षायन

'कल्पद्रुम वा पारिजात ।

चंदनही सुगंधे विख्यात ।

परी त्या सर्वही वृक्षात ।

पिंपळ हेच रुप माझे ।।'

(अनुवाद ज्ञानेश्वरी १०/२६९)

श्रीमद् भगवत् गीतेमध्ये भगवंताने अर्जुनाला आपल्या विभूती सांगत असताना 'अश्वत्थं सर्व वृक्षाणां' असं सांगून वृक्षाचं महत्त्व या जगाला सांगून ठेवलं. किल्ल्यावर भटकत असताना, इतरत्र प्रवास करीत असताना या वृक्षांशी आपल्या भावना कुठेतरी निगडीत होतात. या भटकंतीतील काही वृक्ष मनात मानाचं पान पटकावून बसतात, ते आपल्या आकार वैशिष्ट्यांमुळे तर काही त्यांच्या स्थानमहात्म्यांमुळे!

मागच्या डिसेंबरमध्ये रायगडावर गेलो होतो.

बाजारपेठेतून श्री.जगदीश्वराच्या मंदिराकडे जात असताना, देवळासमोर डाव्या हाताला शंभर फुटांवर एक वठलेलं झाड उभ आहे. त्याचं अप्रूप एवढंच की त्या परिसरात ते एकुटवाणं उभं आहे दोन फांद्या उभारून ! पण वैशिष्ट्य असं की रायगडावर आलेल्या प्रत्येक छायाचित्रकाराने त्याचा एकदा तरी फोटो काढलाच कारण असं की त्याची एक दक्षिणोत्तर पसरलेली बाकदार फांदी लांबून पाहिल्यावर श्रीजगदीश्वराच्या कळसाला वळसा घालून नेमकी दरवाजाकडे निर्देश करते.

असंख्य लोकांनी त्या झाडाबरोबर श्री. जगदीश्वराचे फोटो काढले. परवा गेल्यावर त्या उंचवट्यावर त्या झाडाऐवजी नुसता मोकळा पार दिसला. मनात खूप कालवाकालव झाली. एखादा जीवाभावाचा मित्र कायमचा अंतरल्यावर व्हावी तशी. कुणाच्या तरी चुलीत त्याच्या वठल्या फांद्या आहुती म्हणून समर्पित होत असतील. पण अनेक छायाचित्रांमधून त्यानं आपलं अस्तित्व अनेकांच्या मनःपटलावर कायमचं कोरून ठेवलं.

तसेच एक झाड मशीदमोर्चापासलं टेकाड चढून आपण रायगडाच्या वाटेवर ऐन कड्याला भिडलो म्हणजे उजव्या

हातास आहे. त्याची एक सुरेख फांदी असाच वळसा घेऊन टकमक टोकाकडे निर्देश करते. अनेकांनी टकमक टोकाचे फोटो काढताना त्या फ्रेममधलं त्या झाडाच्या फांदीच्या अस्तित्व खुल्या मनाने मान्य केलं.

किल्ल्यांचे फोटो काढत असताना एक भान बाळगावं लागतं. बहुधा सगळ्या वास्तू या भग्न स्वरूपात शिल्लक असतात. तेव्हा त्यांचे फोटो काढत असताना एखादी फांदी, एखादं गवताच झुंबाड, एखादं छोटंसं रोपटं,एखादं रानफूल, एखादं झाड, असं त्या फ्रेममध्ये घेऊन ते छायाचित्र उठावदार करावं लागतं. कधी कधी ही झाडं त्या विषयाशी इतकी एकरूप होतात की नवल वाटते. कधीकधी त्या चित्राचा आशय त्यांच्यामुळे स्पष्ट होतो. रायगडावर छत्रपती श्री. शिवाजीमहाराजांच्या राणीसाहेब, काशीबाईसाहेब यांची समाधी बारटाक्याजवळ लवणात आहे. ती समाधी मी प्रथम एप्रिलच्या महिन्यात पाहिली. एक देखणं नाजूक पण कोरीव तुळशीवृंदावन. कडेला छोटा ओटा. पण आज ते भग्न अवस्थेत आहे. दोन दगडांच्या फटीतून समाधीला चिरफाळत एक झाड उभं आहे. त्याच्या चारी बाजूंस उभी असलेली निष्पर्ण झाडं, त्यांच्या पायतळी माजलेली काटेरी

झुडपं, सभोवार वाळून कोळ झालेलं पिवळसर कुसळी गवत, वर रखरखणारं ऊन, मी आणि माझा मित्र बराच वेळ ते सारं पाहात स्तब्ध उभे होतो. सारं वातावरण, एकूण परिसर आणि काशीबाईसाहेबांचं आयुष्य या सगळ्यात एक विलक्षण साधर्म्य होतं. भानावर आल्यावर माझ्या मित्रानं त्या समाधीचं जे छायाचित्र घेतलं ते पाहिल्यावर वेगळं काही सांगायची गरज पडतच नाही.

कित्येक वेळा छायाचित्रातली एखादी भग्न, उध्वस्त वास्तू आणि शेजारी उभं असलेलं एखादं हिरवंगार झाड हे नव्या जुन्याचं, भूत-वर्तमानाचं एक अनोखं मिश्रण घेऊन साकार होतं. माझ्या माहितीनुसार वृक्षांना 'ऐतिहासिक' स्थान द्यायचं काम केलं ते श्री. गो. नी. दांडेकरांनी! आपण अप्पांनी काढलेली किल्ल्यांची छायाचित्रं जर पाहिली तर प्रत्येक फ्रेममध्ये एखादं झाड, एखादी फांदी, एखाद्या गवताचा पुंजका अथवा गालिच्यासारखी पसरलेली रानफुले ही हमखास आपापलं स्थान पटकावून बसलेली आढळतील. या निसर्गावर अप्पांनी जीवापाड प्रेम केलं. त्यांच्या कादंबऱ्यांमधून, त्यांनी केलेली निसर्गवर्णन ही केवळ अवर्णनीय आहेत. कमालीचं सूक्ष्म अवलोकन, शब्दांचं

नेमकेपण, बोलीभाषेचा रसाळपणा आणि वातावरण निर्मितीतून साकारलेलं भावविश्व ही अप्पांच्या निसर्गवर्णनाची महत्त्वाची स्थानं.  याच निसर्गाच्या अपार ओढीतून त्यांनी निसर्गावर एक कादंबरी लिहिली, 'त्या तिथे रुखातळी' या कादंबरीचा नायक आहे, एक विस्तीर्ण पसरलेलं जुनं आंब्याचं झाड. त्याच्या साक्षीने घडणाऱ्या सभोवतालच्या घटना हा कादंबरीचा विषय, वर उल्लेख केलेल्या निसर्गवर्णनातील साऱ्या खुब्या या कादंबरीत अतिशय परिपूर्ण स्वरुपात आढळतात. या कादंबरीचा शेवटही तसाच चटका लावणारा. प्रत्येकाने अभ्यासावी अशी ही कादंबरी. त्यांच्या साऱ्या कादंबऱ्यांमधून निसर्ग, किल्ले व इतिहास हे समान घटक. मग ती रायगडावर आधारित 'रानभूली' असो, राजगडावर आधारित 'वाघरू', कर्नाळ्यावर आधारित 'जैत रे जैत' असो किंवा राजमाचीवर आधारित 'माचीवरला बुधा' शिवशाहीर श्रीबाबासाहेब पुरंदरे यांनी महाराष्ट्राला किल्ल्यांचा इतिहास सांगून वेडं केलं तर अप्पांनी याच किल्ल्यांचा भूगोल व निसर्ग दाखवून भूल घातली. मागे राजमाचीला गेलो होतो. त्यावेळेस उढेवाडीच्या पठारावर नेऊन मधूनं एक आंब्याचं झाड

दाखवून सांगितलं," हा अप्पांचा आंबा." मी म्हणालो," म्हणजे काय ?" तर मधू म्हणाला," अप्पा यायचे तेव्हा न चुकता या आंब्याकडं एकदा तरी येऊन जायचे, जमल्यास दुपारची वामकुक्षी इथेच व्हायची. म्हणून आम्ही त्याला अप्पांचा आंबा म्हणतो." स्थानिक, अशिक्षित व श्रद्धाळू रहिवाशांकडून अशा प्रतिक्रिया मिळवणं यालासुद्धा भाग्य लागतं.

अशी ही झाडं, हे अनुभव फक्त किल्ल्यावरच येतात असं नाही, रोजच्या प्रवासातसुद्धा हे वृक्षाचं  देखणेपण आपण अनुभवू शकतो. रस्त्याच्या कडेला असणारी निंब, चिंच, वड, बाभूळ, गुलमोहर आता सुबाभूळ, निलगिरी ही झाडसुद्धा असेच वेगवेगळे आकार घेऊन उभी असतात. कुणी वड कुटुंबवत्सल पित्यासारखा पोरांचा म्हणजे पारंब्यांचा गोतावळा घेऊन ऐसपैस पसरलेला असतो. कोणी कडुनिंब ठसठसलेल्या अंगावर, डिंक गाळणाऱ्या गाठी घेऊन चवऱ्या ढाळीत उभा असतो. नव्या नवरीसारखी नटलेली, अनेक आभूषण ल्यालेली चिंच, पानागणिक चिंचांचे आकडे हलवत डुलत असते. कुठे एखादे काळीशार बाभळ, बारीक-बारीक हिरव्या पानांवर फुलवातीसारख्या

पिवळ्याधमक फुलांचा साज घेऊन फिरत असते. पेटलेल्या खदिरांगारासारखा एखादा गुलमोहर वैराग्याचं व्रत सुचवून जातो तर हात उंचावून आभाळाकडे फोफावलेली एखादी देवबाभूळ, एखाद्या योग्याचं दर्शन घडवते. संस्कृती जपणाऱ्या एखाद्या शांत, स्थितप्रज्ञ वृद्धासारखा, एखादा आंबा दाट सावली व मधुर फळं देत उभा असतो, तर सळसळत्या चैतन्याचा आविष्कार घडवणारा, एखादा पिंपळ एखाद्या पारावर सळसळत असतो.

किती प्रकार, किती आकार, किती फळं, किती फुलं, खरोखरच देवाचं हे अलौकिक देणं आणि याच्या विरुद्ध आमचं ओरबाडून घेणं! ते आणि आपण, दोन्हीही त्या परमेश्वराचेच अंश. पण एकाचं कामं विधायक तर एकाचं विघातक. ज्ञानेश्वरीमध्ये माऊली कर्मफलाचा त्याग करायला सांगताना अथवा त्याची अपेक्षा न ठेवायला सांगताना, वृक्षाचेच उदाहरण देतात. तो जसा सारं आयुष्य दुस-यांसाठी जगतो, परिस्थितीशी टक्कर घेत वाढतो, वादळवाऱ्याशी झुंजतो, ऊन-पावसात तळपतो आणि हे सारं सोसून निर्माण केलेलं फळ कसलीही अपेक्षा न बाळगता दुसऱ्याला अर्पण करून रिकामा होतो, तसं सारं आयुष्य

आपल्याला निस्पृहपणे घालवता आलं पाहिजे, त्यात खरा आनंद आहे. प्रेरणा घ्यायची असेल, काही शिकायचेच असेल तर त्यासाठी हाडामासाचा गुरु करावा लागतो असं नाही, जसे 'ग्रंथ हेच गुरु' तसे 'वृक्ष हेच गुरु' असंही असू शकतं. आपली दृष्टी मात्र त्यासाठी तेवढी स्वच्छ आणि मन विशाल हवं तरच हे शक्य होईल.

असा हा वृक्ष महिमा भगवद्गीतेपासून ते 'त्या तिथे रूखातळी' पर्यंतचा. यामधला एक टप्पा मात्र महत्वाचा आहे. त्याचे कर्ते बालकवी; शालेय जीवनापासून त्यांनी त्यांच्या कवितांमधून घातलेली वृक्षमोहिनी केवळ अपूर्व आहे.

'ऐल तटावर, पैल तटावर हिरवाळी घेऊन, निळासावळा झरा वाहतो बेटाबेटांतून' इथून होणारी सुरुवात 'पाय टाकुनी जळात बसला, असला औदुंबर' इथे संपते. तेव्हा नकळत वृक्षांशी एक नातं मनात दृढ झालेलं असतं म्हणूनच कोणी कवी आश्वासक शब्दांत म्हणून जातो. "इथल्या पिंपळपानावरती, अवघे विश्व तरावे, या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे."

# ११. लाकूडतोड्याची गोष्ट

उन्हाळ्याचे दिवस होते. नाटकातल्या दोघा तिघांना घेऊन सहज रायगडला निघालो होतो. स्वारगेटवरून पहाटे साडेपाचची पुणे-विन्हेरे गाडी गाठून दहाच्या सुमारास महाडला आलो. तिथून महाड-रायगड गाडी गाठून ऐन बारा वाजता पायथ्याशी येऊन पोहोचलो. तशाच उन्हाच्या कहारामध्ये गड चढायला सुरुवात केली.

एक तर उन्हाळा, त्यात कोकणातील दमट हवा, घामाने कपडे अगदी गच्च भिजून गेले होते. तासाभराने वर पोहोचलो. देशमुखांच्या उपहारगृहात थोडावेळ टेकून तडक वसंताचे घर गाठले. वसंताची आई सरपण गोळा करायला बाहेर पडतच होती. तेवढ्यात तिने आम्हाला पाहिले. थांबून चहा करून दिला. जेवायचं काय ते विचारलं. आधी काळ्या हौदावर जाऊन आंघोळी उरकून येतो म्हणून सांगितलं आणि निघालो. तीही आमच्याबरोबर निघाली. शिबंदीची घरटी ओलांडून आम्ही सरळ हौदाकडे निघालो.

ती उजवीकडे वळून घळीत उतरली. सारं वातावरण स्तब्ध होतं. झाडाचं पानसुद्धा हलत नव्हतं. उन्हाच्या

रखरखाटामुळे पक्षी आणि चरायला सोडलेली जनावरं जागोजागी सावली धरून निवांत बसली होती. त्या शांत वातावरणात कसलाच आवाज नव्हता. आम्ही डाव्या हाताचे वाड्यांचे चौथरे ओलांडून हौदाकडे वळणार, इतक्यात उजव्या बाजूने ठाक ठाक असा कशावर तरी कुऱ्हाडीचा घाव घातल्याचा आवाज आला. पाठोपाठ कर् कर् करीत एक फांदी मोडल्याचा आवाज आला. त्या शांत वातावरणात तो आवाज केवढ्याने तरी घुमला. कोणीतरी भवानीच्या खळग्यात झाड तोडत होतं. कुठे आणि कोण याचा नेमका अंदाज येत नव्हता. कायद्याने सारा गड पुरातत्व खात्याच्या अखत्यारीत होता व गडावर वृक्षतोड करण्याची सक्त मनाई होती. तरीही कुणी तरी झाड तोडत होतं. एवढ्या उन्हाचं, या असल्या वेळेला, एवढ्या लांबवर कोण पाहायला येणार असा अंदाज मनाशी बांधून कुणीतरी झाड तोडत होतं.

बरोबरच्या मुलांना म्हणालो," चला, बघून येऊ, कोण आहे ते?" सरळ वाट सोडून पुन्हा वर आलो व डाव्या हाताच्या भवानीच्या खळग्यात घुसलो. इकडे झाडे बऱ्यापैकी होती. रामेठ्याची झुडपं, करवंदीच्या जाळ्या, एखादं जांभळाचं झाड, बाकी सारी रानझुडपं, एकात एक गुंतलेली. तसेच

त्यांच्यामधून वाट काढत आवाजाच्या रोखाने निघालो. जसजसे खाली उतरत होतो, तसतशी सावली व गारवा वाढत होता. मोठी झाडं तशी कमीच होती. आवाज जवळ जवळ येत चालला, तसतसे भराभरा त्याच्या रोखाने निघालो. अचानक समोरच्या खडकावर नजर गेली. त्याच्यावर चढून एक जण हातातल्या कुऱ्हाडीने चांगलं हिरवंगार मोठ्या खोडाचं झाड तोडत होता. आमच्याकडे त्याची पाठ होती. आम्ही पुढे सरकलो, तसे चाहूल लागून तो गरकन वळाला. हातात कुऱ्हाड तशीच होती. एकदम तिघा-चौघांना पाहून तो चपापला, पण त्याने चेहऱ्यावर तसे काही दिसू दिले नाही. काहीतरी विचारायचं म्हणून त्याने विचारलं, "पोरं हो, हिकडं कुनीकडं वळलात?" मी म्हणालो, "भवानीला जायचंय" तसा तो म्हणाला, "मग भवानीची वाट राहिली वरच्या अंगाला, तुम्ही वाट चुकलात." गडी गडावर काम करणाऱ्यांपैकीच होता. गडावर त्याला अनेक वेळा पाहिला होता. नक्की कुठे राहत होता एवढं माहीत नव्हतं. तसेच वाट काढत त्याच्याकडे निघालो. "हिकडून वाट न्हाई. तसंच उजव्या हातानं  नीट वर जा." ऐकून न ऐकल्यासारखे करून त्याच्यापाशी जाऊन पोहोचलो. कामात खंड

पडल्यामुळे त्याची चिडचिड झाली होती. पण गप्प राहण्याशिवाय त्याला दुसरा इलाज नव्हता. मी जाणून-बुजून विचारले, "काय लाकडं तोडत होता काय ?" त्याची पंचाईत झाली. हो म्हणावं का नाही म्हणावं? या संभ्रमातच तो उत्तरला, "छ्या, उगीच ह्या वरल्या फांद्या खंडित होतो". मी खडकामागं जाऊन पाहिलं, तर लाकडांचा चांगला एका मोळीएवढा ढीग पडला होता. मी पुन्हा विचारलं,"पण गडावर लाकडं तोडायला बंदी आहे ना ? खात्याचे लोक तुम्हाला अडवत नाहीत का? तसा तो फाटकन उत्तरला, "ते कोन अडिवनार?तेंचा काय संबंध ? आम्ही वाड-वडिलांपून इथे राहतो आणि तेंना खायला आन् लागत न्हाई? त्यें कशावर शिजतयं? सरपणावरच नां? मग ते कशाला आडवं येतील?" मी त्याला समजावणीच्या सुरात म्हणालो, " पण वाळकी, वठलेली लाकडं गोळा करायला तुम्हाला परवानगी आहेच नां? मग ही हिरवी झाडं कशाला तोडता?" " ते आमचं आमी पाहून घेऊ. तुमाला का तेची पंचाईत? झाडं तोडायची न्हाईत तर खायाचं काय अन् कशावर? यवढ्या मोठ्या जागंतली तोडली दोन चार झाडं त् काय बिगडतं? त्याचा नूर बदलत चालंला होता. त्याच्याशी वाद घालण्यातही

काही अर्थ नव्हता. रोज त्याच्यावर पाळत ठेवणेही शक्य नव्हते. आम्ही तसेच आल्या वाटेने परतून काळ्या हौदावर आलो. स्नानं उरकून पुन्हा वसंताकडं पोचलो. थोड्या वेळाने त्याची आई डोक्यावर सरपणाचा भारा घेऊन आली. मी त्यांना विचारलं,"का हो एवढा वेळ?"तशा त्या उत्तरल्या,"वाळलेले फाटे हुडकून, गोळा करायला वेळ लागतो. वलं तोडायचं नाही आता खात्याचा हुकूम हाय. तरी बी कुनी झाडं तोडत्यातंच. आम्हाला ते पटत न्हायं, हिथं राह्यचं तर मंग गडाचं वाळवंट करून कसं भागंल ? मान्साला टेकाया सावलीबी उरली न्हाई तर काय उपेग? मागं एकदा बाबासाब सांगत हुतं का समादी संबूरच्या भिंतीवर लिवलंय म्हनं, की गडावर थोरल्या महाराजांच्या टायमाला बागा हुत्या, फुलझाडं व्हती, आता काय बी राह्यलं नाही. समदी झाडं तुटून चुलीत गेली. सम्दा गड उघडा-बोडका झाला आणि ते बी आमच्याच करनीपायी. म्हून आमी फक्त वाळ्ळं त्येवढं तोडून आन्तो". एवढं बोलून त्या जेवायच्या तयारीसाठी आत वळल्या. एकाच ठिकाणी, एकाच दिवसात, एकाच विषयावर दोन भिन्न प्रवृत्तीच्या माणसांची भिन्न भिन्न मतं ऐकायला मिळाली होती. तो

मघाचा झाडं तोडणारा आणि वसंताची आई दोघेही अशिक्षित, गडावरच राहणारे, पण दोघांच्याही विचारात जमीनअस्मानाचा फरक होता. वृक्षतोडीमुळे निर्माण होणाऱ्या अवर्षणाच्या समस्येमध्ये खरंतर हे दोघेही होरपळले जाणार होते. पण साठ वर्षांच्या त्या माऊलीच्या ठिकाणी दिसणाऱ्या समंजसपणाचं नामोनिशाण त्या तिशीच्या माणसाच्या ठिकाणी दिसत नव्हतं.

एकाच समाजात वावरणाऱ्या ह्या दोन व्यक्ती, ज्यांची सुख-दुःखं व समस्या ह्या एकसारख्या होत्या व आहेत. पण त्यांच्याकडे पाहण्याचा दोघांचाही दृष्टिकोन मात्र निराळा होता. सुशिक्षितांच्यामध्येही यापेक्षा वेगळं काही घडत नाही. या समस्येचं गांभीर्य जाणवणारे काहीजण जीवाचे रान करीत नोकरी व्यवसाय यांची तमा न बाळगता "पश्चिम घाट बचाओ" अशी घोषणा देत मैलोगणती वणवण भटकतात. खेड्यापाड्यांत जाऊन नागरिकांना वृक्षतोडीच्या भयंकर परिणामांची कल्पना देतात तर दुसऱ्या बाजूला ह्याच श्रीमंत सुशिक्षित वर्गातली ठेकेदार मंडळी, जंगलेच्या जंगले कंत्राट पद्धतीने तोडण्याचे ठेके उचलतात, कायदेशीर आणि

बेकायदेशीर दोन्हीही पद्धतीने ! त्यावर मिळणाऱ्या नफ्यातून ही मंडळी चैन करतात, 'संबंधितांचे' खिसे भरतात.

आपणही सर्वसाधारणपणे या प्रश्नाकडे तितक्याच उदास वृत्तीने पाहतो. आपले सारे वृक्षप्रेम गॅलरीतल्या कुंड्यांमधून भरून वाहत असते. त्यातल्या त्यात आमचे प्रेम 'मनी प्लांट' आणि 'कॅक्टस' अशा निरुपयोगी वस्तूंवरच जास्त. तुळस वगैरेसारखी प्रतिगामी झुडपे आम्हाला पटत नाहीत. जीवनातला सारा ओलावा शोषून घेऊन साठवून ठेवणारी व त्याच्या बदल्यात फक्त काटे देणारी कॅक्टससारखी झुडपं हेच आमच्या तथाकथित पुरोगामीपणाचं मानचिन्ह.

हेच दिवसेंदिवस रुक्ष होत जाणाऱ्या फ्लॅट संस्कृतीचं प्रतिक ! ही सारी प्रतिके मात्र आम्ही जीवापाड जपत असतो. स्वतःला मूलं झाल्याचा जेवढा आनंद आम्हाला होणार नाही, तेवढा कॅक्टसला फूल आल्याचा आनंद आम्हाला होतो.  सारंच विचित्र पण कलियुगाला साजेसं !

साध्या साध्या गोष्टीतून आपण राष्ट्रीय वनसंपत्तीचा होणारा विनाश टाळू शकतो. घरातलं फर्निचर करताना लाकडाऐवजी प्लास्टिक फायबरसारख्या टिकाऊ आणि

कमी खर्चाच्या गोष्टींचा उपयोग केला तर लाकडाचा वापर कितीतरी प्रमाणात वाचवता येईल.

प्रत्येकाने हा विचार प्रामाणिकपणे अंमलात आणला तर आपल्या हातूनसुद्धा भरपूर देशकार्य घडेल असे समजायला हरकत नाही. त्यामुळे वाचणारी वृक्षसंपदा, आपल्या पुढच्या पिढीला सुखाची सावली देईल यात शंका नाही.



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

## १२. कसं यांचं जगणं?

एप्रिलचा महिना, रखरखीत ऊन, अंगाची नुसती काहिली होत होती. वसंताकडे जेवण आटोपून मी व रवी श्री.जगदीश्वराच्या देवळाकडे विश्रांतीसाठी निघालो. देवळात पोहोचल्यावर खूप थंड वाटलं. दोघांनी तिथेच फरशीवर अंग टाकलं. झोप लागून अर्धा-पाऊण तास झाला असावा. कोणीतरी पाय धरून हलवत असल्यासारखं वाटलं.

जाग आली, उठून पाहिलं तर सत्तर एक वर्षांची जख्ख म्हातारी माझ्या पायाशी बसून होती. मी उठल्यावर ती पुन्हा माझ्या पाया पडण्यासाठी वाकू लागली, "काय आजी, काय काम आहे?" मी विचारलं. कापऱ्या आवाजात ती म्हणाली, "कायबी करा, पण माझ्या नातवाला वाचवा". मला काहीच उलगडा होईना, तरी मी तिला म्हणालो,"तो पलीकडे झोपलेला माझा मित्र डॉक्टर आहे, मी नाही. त्याला सांगा." ती पुन्हा पाय धरायला गेली. एव्हाना रवीही जागा झाला होता. त्याने तिचे म्हणणे ऐकून घेतले. डोळ्यातून पाणी गाळत तिने नातवाला पोलिओ झाल्याचे सांगितले. वसंताच्या मागच्या झोपडीत राहणाऱ्या राम पाटलांची ती

आई ! रवीने तिला विचारले," जन्मल्यानंतर त्याला काही लस वगैरे टोचली का? किंवा जन्माच्या आधी त्याच्या आईला काही लस वगैरे टोचली का ?" "ते आनी काय असतयं?" तिच्या भाबडा प्रश्न. "माझी एवढी उमर झाली पर म्या डागदर काळा की गोरा बघितला नाय. माझी बाळांतपनं म्या सोताच केली. तिचे, सुनेचे बाळांतपनं  बी म्याच केलं. पावसकाळ होता. अशी अवशीच उठून ती गवत कापायला भवानीवर गेल्ती. भारा घेऊन आली तशी प्वाट दुखतंय म्हून गागायली. म्या काय करनार? रामा बी म्हाडला गेलेला. शेजार पाजारची बी कुटं कुटं जनावरामागं गेलेली. बाहेर मरनाचं धुकाट माजलेलं.  पावसाला कंदी सुरुवात व्हईल त्याचा नेम नव्हता. डागदर बलवायचा तर म्हाडवरून त्याला बलिवनार कोन? बलिवला तर तो एवढा गड चढून येणार कसा? बरं हिला म्हाडला न्यायाचं तर डोलीला गडी भेटंनात. पुन्ना आनि  वाटेतच काय झालं तर काय घ्या? त्यात आनी पावसाला सुरुवात झाली. शेवटी मी सोताच सारं केलं. पर जन्मल्यापासून प्वार अजून काही धड चालतच नाही. त्याला तेव्हढं धड करा साहेब". ती डोळे पुसत बोलायची थांबली.

एव्हाना, तिचा पोरगा राम येऊन बसला होता. त्याने सांगितले,"मागच्या टायमाला मी त्याला घेऊन म्हाडास डागदरकडे गेल्तो, त्यांनी आप्रिशन करावं लागंल असं सांगितलं". "मग करायचं"रवी म्हणाला. "त्येबी केलं असतं, पन....डागदर म्हणाला का रगात द्यावं लागंल. पोरगा कमजोर हायं!" "मग द्यायचं, त्यात काय अवघड आहे?" रवी म्हणाला. " हाँ हाँ, असा कसा देयाचा ? मी एकलाच कर्ता माणूस, म्या त्याला रगात दिलं असतं तर म्या नसतो  का कमजोर झालो? आनी मग असा जन्माचं अधू झाल्यावर घरची कामं कुनी केली असती ? " " अरे पण रक्त दिल्याने जन्माचं अधू होतं हे तुला कोणी सांगितलं? फार फार तर दोन चार दिवसात दिलेलं रक्त भरून येतं ". " असा कसा भरून येईल? एक टाईम रगात दिला का दिला". रक्तदानाविषयी सार्वत्रिक गैरसमज तिथेही होता.

रवीने त्याला मुलाला घेऊन पुण्यास यायला सांगितलं, ती दोघेही रवीच्या पाया पडून निघून गेली. रवी मला म्हणाला, "कसं ह्याचं जगणं ? जवळपास महाडशिवाय दुसरं गांव नाही. काही दुखलं-खुपलं किंवा चावलं तर ही माणसं काय करत असतील ? कोण ह्यांच्यासाठी एवढा गड चढून वर

येणार ? आलाच तर  त्याला बोलावून वर आणेपर्यंत इथल्या माणसाचं काय होत असेल? बरं इथून आजारी माणसाला दवाखान्यापर्यंत न्यायचीसुद्धा काय सोय ? कशा या माणसांनी पिढ्यानपिढ्या गडावर काढल्या कोण जाणे ? कोणत्या बंधनाने त्यांना इथं जखडून ठेवलं?

अन्य जातभाईसारखे हे जगायंसाठी का मुंबई-पुण्याला गेले नाहीत? यांच्यासाठी काहीतरी केलं पाहिजे" रवीच्या डोक्यात नक्की काय योजना होती कुणास ठाऊक, पण पुढच्या खेपेपासून त्याचा एक शिरस्ता सुरू झाला. प्रत्येक वेळी रायगड ला जाताना चांगली दोन-तीनशे रुपयांची औषधे बरोबर घ्यायची. प्रथमोपचाराचं सामान घ्यायचं, त्यांच्या वेगवेगळ्या पिशव्या तयार करायच्या, प्रत्येक पिशवीत त्यातल्या गोळ्या कशावर व किती घ्यायच्या याची चिठ्ठी टाकलेली असायची. असं सारं व्यवस्थित करून वसंताकडे देऊन ठेवायचं व सगळ्यांना गरज पडल्यावर दे म्हणून सांगायचं.

मधे एकदा वसंताच्या वडिलांचं अल्सरचं ऑपरेशन करायची वेळ आली. रवीने त्यांना पुण्यात आणून, आपल्या ओळखीने दवाखान्यात भरती केलं. ऑपरेशन व्यवस्थित

पार पडून ते पूर्ण बरे होईपर्यंत, रोज रवीच्या घरून त्यांचा जेवणाचा डबा जात होता. वरिष्ठांना भेटून, अर्ज वगैरे करून त्यांची फीसुद्धा त्यांने माफ करून दिली. जाताना तो साठीचा माणूस ढसाढसा रडला. आज रायगडावरचं वसंताचं घर म्हणजे रवीचं, रवीच्या मित्रांचं हक्काचं घर आहे. त्यामागे रवीचे एवढे कष्ट आहेत. व्यवसायाने डॉक्टर असून, फोटोग्राफीपायी वेडा झालेला व डोक्यात अफाट कल्पनांची कारंजी बाळगणारा माझा एक गडवेडा,त्यातल्या त्यात रायगडवेडा मित्र ! वरच्या घटनेनंतर अंदाजे एक वर्ष उलटून गेलं असेल. मी पुण्याला त्याच्या घरी गेलो होतो. समोरच्या त्याच्या टेबलावर एक अंतर्देशीय पत्र पडलं होतं. सहज कुतूहल म्हणून मी उघडून वाचू लागलो. पत्र वसंताचं होतं. त्यानं लिहिलं होतं,"तुम्ही सांगितल्याप्रमाणे इथे पाचाडला जागा पाहून ठेवली आहे. स्वस्तात मिळेल. तुम्ही आल्यावर व्यवहार पक्का करू." काय भानगड आहे, मला कळेचना. एवढ्यात तो आलाच. माझ्या हातातलं पत्र पाहून म्हणाला,"अखेर तुला कळलंच". मी विचारले,"काय विचार आहे तुझा? कसली जागा? कसला व्यवहार?" त्यावर त्याने दिलेले उत्तर ऐकून मी सर्दच झालो. रायगडाच्या

परिसरातील लोकांच्या वैद्यकीय गैरसोयी दूर करण्यासाठी पाचाडला, रायगडाच्या पायथ्याशी एक जागा घेऊन छोटासा दवाखाना थाटायचा महाशयांचा विचार होता. भावनिकदृष्ट्या ही कल्पना अत्यंत स्तुत्य व अनुकरणीय असली तरी व्यवहारदृष्ट्या ती उपयोगी ठरणार नाही. हे त्याला पटायला बराच काळ जावा लागला. तोपर्यंत मात्र त्याच्या डोक्यात तो विचार कायम होता.


"पुण्यात राहूनही तुला त्यांना खूप मदत करता येईल" असे थोडेफार मीही त्याला सांगून पाहिले. त्याच्यासारखीच भावना मनाशी बाळगून आपणही थोडेफार या लोकांसाठी करू शकतो, केले पाहिजे. मुंबई रिझर्व्ह बँकेत काम करणाऱ्या काही अधिकाऱ्यांनी, कितीतरी वर्षांपासून महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या मदतीने राजमाचीसारख्या दुर्गम किल्ल्यावर, खूप सुधारणा घडवून आणल्या. आजही त्यांच्या राजमाचीच्या खेपा सुरूच असतात. असंच काहीतरी रायगडासाठी करावं, शिवचरित्राच्या प्रसारासाठी करावं, असं रवीच्या, राजूच्या मनात सारखं घुमत असतं. दोघेही कसलेले फोटोग्राफर. आपले व्यवसाय सांभाळून, दोघेही वेळ मिळाला की रायगड

गाठतात. कुठल्याही मोसमात, कुठल्याही वेळी. एकदा रायगड पायथा गाठला की त्यांना भान राहत नाही. या दोघांनी रायगडाची काढलेली असंख्य सुंदर-सुंदर छायाचित्रं पाहताना मन भरून येतं. दोन वर्षांपूर्वी रवीने सुर्योदयाच्या पार्श्वभूमीवर, महाराजांच्या पुतळ्याचे एक छायाचित्र काढले आहे. त्याची त्याने पोस्टर्स काढली. डॉक्टरकीमधील तीन-चार वर्षांची सारी कमाई त्याने त्यात ओतली. कसलाही पुढचा मागचा विचार न करता ! माझ्या साऱ्या भटकंतीत, हे दोघे मित्र म्हणजे माझे दोन डोळेच आहेत. त्यांच्या डोळ्यांनी मी हे सारे किल्ले पाहिले. त्यांच्या अफाट कल्पना ऐकल्या.  त्या पूर्ण करण्यासाठी त्यांनी केलेली जीवघेणी धडपड पाहिली. किल्ल्यांवर भटकताना कोणत्या भावनेने भटकावे हे मी त्यांच्याकडून शिकलो. आपणासही कधी जर कुठल्या किल्ल्यावर जायचा योग जुळून आला तर त्यांच्यासारखा एखादा मित्र बरोबर न्या. तरच तुमची यात्रा सुफळ संपूर्ण होईल.

## १३. उषःकाल... रायगडावरचा.....

आदल्या रात्री पौर्णिमा असायची बाबासाहेबांच्या शब्दात सांगायचं तर असा चांदीच्या ताटाएवढा चंद्र जगदीश्वराच्या कळसामागून उगवलेला असायचा. ओल्या खोबऱ्याच्या किसासारखं चांदणं गडभर सांडलेलं असायचं आणि मग पायाचे तुकडे पडेपर्यंत टकमकवर किंवा शिवसमाधीच्या पलीकडच्या खडकावर मध्यरात्र उलटून जाईपर्यंत गप्पा रंगलेल्या असायच्या. देवळात पाठ टेकताक्षणीच डोळा लागायचा. भल्या पहाटे दोस्तमंडळी जागी व्हायची, कॅमेरा, स्टँड तयार होऊन जी दिशा ठरेल त्या दिशेने कूच. मी आपला त्यांच्या मागे, मागे. पण देवाशप्पथ सांगतो, उगवतीचे आणि मावळतीचे जे आणि जेवढे रंग मी रायगडावर पाहिले, तेवढे अन्यत्र कदाचितच पाहिले असतील. पूर्वेला लाली पसरू लागली की एक एक डोंगररांग स्पष्ट व्हायला लागायची. तोरणा, राजगड, मग लिंगाणा मग भवानीटोक, असं एक एक ऊजळू लागायचे.  पाखरांची किलबिल, वाऱ्याचा मंद आवाज, वसंताच्या

झोपडीकडून येणारे गाईचे हंबरण्याचे आवाज, कोंबड्यांचे आरवणे असं सारं विश्व जागं होऊ लागायचं आणि मग कानावर पडायचे दोस्तमंडळी काढत असलेल्या फोटोंचे आवाज. एकदा का सूर्य पूर्ण वर आला की मग आवरतं घ्यायचं आणि मग आज काय काय आणि कुठून कुठून कसं मिळवलं याच्या चर्चा रंगायच्या. हा सगळा घटनाक्रम संध्याकाळी टकमकवर, हिरकणीवर, किंवा बाजारपेठेतून पुन्हा रिपिट. निसर्ग नुसता दहा दिशांनी रंगपंचमी खेळत असायचा, सोबत आकाशाच्या कॅनव्हासवर चित्र विचित्र ढगांचे आकार, एखाद्या फोटोग्राफरला आणखीन काय हवं?



**(फोटो- © ॲड. आनंद रा. देशपांडे.)**

# १४. हमे पागल ही रहने दो

१९९१ सालचा ऑगस्ट महिना. १६-१७ तारीख असावी. ऐन पावसाळ्याचे दिवस. त्यातून तो कोकणातला पाऊस. तसाच तो अंगावर घेत, सायंकाळी आम्ही तिघे म्हणजे मी, डॉक्टर रवींद्र लोहोकरे आणि राजेंद्र टिपरे रायगडावर पोहोचलो. धर्मशाळजवळच्या एका खोलीत हॅवरसॅक ठेवल्या. पावसाची रिपरिप चालूच होती. कसेबसे धुक्यातून वाट काढत श्रीशिवसमाधीच्या दर्शनाला जाऊन आलो. रात्रभर धुवांधार पाऊस कोसळत होता. पहाटे-पहाटे पावसाचा ताशा वाजायचा थांबला तर हे दोघे तटकन उठून बसले. कॅमेरा, त्यांच्या लेंसेस अशी सगळी जय्यत तयारी सुरु झाली.

उजाडायला अजून बराच वेळ होता. त्या तशा धुसर प्रकाशात गडभर पसरलेल्या धुक्यातून, आम्हा तिघांची यात्रा निघाली शिवसमाधीकडे. गळ्यात कॅमेरे अडकवलेले पुढे ते दोघे व कॅमेऱ्याची बॅग खांद्यावर अडकवून पाठीमागून चाललेला मी, उजेड वाढत होता. तसे वातावरण स्वच्छ होत होते. रात्रभर पडलेल्या पावसाच्या पाण्याचे वहाळ

ठिकठिकाणी ढळतीकडे वाहत होते. गवताचा हिरवाकंच शेला पांघरलेला रायगड, नुकताच शुचिर्भूत होऊन प्रातःस्मरणाला बसलेल्या एखाद्या वनदेवासारखा वाटत होता. गप्पा मारीत श्री जगदीश्वराचा प्रासाद ओलांडून आम्ही शिवसमाधीच्या समोर आलो. समोर पूर्वेला क्षितिजावर तोरणा आणि राजगडाच्या आकृती स्पष्ट दिसत होत्या. त्यांच्या पाठीमागून सूर्यबिंब पूर्व क्षितिजावर अवतरणार होतं. समोर शिवसमाधी, तिच्या पार्श्वभूमीवर राजगड आणि तोरणा, त्यांच्यामधून उगवणारं सूर्य बिंब असे छायाचित्र या दोघांना घ्यायचे होते. दोघेही छायाचित्र घेण्यासाठी जागांची निश्चिती करून कॅमेरा रोखून उभे राहिले. मी समाधीच्या पायरीवर बसून त्यांची धावपळ पाहत होतो. सूर्योदय व्हायला सुरुवात झाली, तसे ते दोघे स्थिरावले. मीही समाधीला उजवं घालून त्यांच्या फ्रेममध्ये येणार नाही, अशा बेताने सूर्योदय पाहायला गेलो. हळूहळू सुर्यबिंब वर येत होतं. त्या प्रसन्न वातावरणात, तो सुर्योदय पाहात मी रंगून गेलो होतो. तेवढ्यात धाडकन्  कोणीतरी पडल्याचा आवाज आला म्हणून मी वळून मागे धावलो, तो उजव्या हातात कॅमेरा धरून राजू एका दगडावरच्या शेवाळ्यावरून घसरून

पडला होता. उजव्या हातातला कॅमेरा सांभाळण्यासाठी त्याने डावा हात खाली टेकवला होता. तो दगडावर आदळून मनगटापासून कोपरापर्यंत सोलून निघाला होता. रक्ताची धार लागली होती. इकडे सूर्यबिंब हळूहळू वर येतच होते. तो चटकन् उठला आणि तसाच कॅमेरा घेऊन पुन्हा ठरलेल्या ठिकाणाच्या शेजारच्या दगडावर उभा राहून फोटो घेण्याची धडपड करू लागला. मी आणि रवी त्याच्याकडे पाहत होतो. हाताच्या जखमेतून रक्ताची धार लागली होती. चेहऱ्यावर वेदनेचा लवमात्र अंशही नव्हता. सारं लक्ष एकवटून तो शिवसमाधीच्या कमानीतून उगवणारं सूर्यबिंब कॅमेरात बंदिस्त करीत होता. माझ्या मनात विचार आला की, याला कसलं वेड म्हणायचं? शिवचरित्राने झपाटून जाऊन, शिवकालीन किल्ल्यांची छायाचित्रे काढत असताना ही मंडळी कोणकोणत्या गोष्टींना सामोरी जात आहेत ? आपल्या जखमेची, आपल्या कष्टांची पर्वा न करता शिवकालीन वास्तूंची आणि किल्ल्यांची प्रकाशचित्रं काढून त्याआधारे शिवचरित्र लोकांसमोर ठेवण्यासाठी चाललेली ही धडपड हे कोणतं झपाटलेपणं आहे ? मला क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिलचा एक शेर आठवला. तुरूंगातल्या

कोठडीत नरकयातना भोगत, मरणाला सामोरे जात असताना तो म्हणाला होता,

"इन्ही बिगडे दिमागो के धनी,
खुशियों के लच्छे है ।
हमे पागलही रहने दो,
कि हम पागल ही अच्छे है ।।"

राजूचं वेडेपण हे याच जातकुळीतलं आहे. मनासारखे चित्र घेऊन झाल्यावर तो नेहमीसारखा प्रसन्न हसला. मी विचारलं, "पहिल्या ठिकाणाहून तू का हललास?" तो म्हणाला, "उगवणारे सूर्यबिंब, श्रीशिवसमाधीच्या कमानीच्या बरोबर मध्यभागी येत नव्हतं. त्यासाठी कॅमेरा तसा डोळ्यासमोर धरून खाली न पाहता, थोडा डावीकडे सरकायला गेलो तो शेवाळ्यावरून पाय घसरला." एवढं बोलून त्यानं मग हाताच्या जखमेकडे पाहिलं. त्या जखमेच्या वेदनापेक्षाही त्याला मनासारखा फोटो घेता आल्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

एका पौर्णिमेच्या संध्याकाळी सूर्यास्तानंतर, आम्ही दोघेच बाजारपेठेतून जगदीश्वराच्या देवळाकडे निघालो होतो. गप्पांच्या नादात बाजारपेठ ओलांडली आणि अचानक

दोघेही गपकन थांबलो. समोर श्रीजगदीश्वराच्या कळसामागून अक्षरशः चांदीच्या ताटाएवढा चंद्र वर येत होता. मी कमीत कमी आठ-दहा पौर्णिमा तरी रायगडावर काढल्या आहेत पण त्या दिवशी एवढा मोठा चंद्र मला कधीच पाहायला मिळाला नाही. राजू नेहमीप्रमाणे कॅमेरा रोखून श्रीजगदीश्वरामागून उगवणाऱ्या चंद्राचे फोटोग्राफ्स घेण्यात मग्न होता. पुण्यात गेल्या गेल्या तो रोल त्याने डेव्हलप करण्यासाठी दिला. दिवसभर आम्ही फोटो कसे येतील याची चर्चा करीत होतो. संध्याकाळी फोटो आणायला गेल्यानंतर दुकानदाराने सांगितलं, "काय झालं कुणास ठाऊक, संपूर्ण रोलमधला एकही फोटो आलेला नाही". त्या वेळचा राजूचा चेहरा मला विसरता येणे शक्यच नाही. इतक्या परिश्रमपूर्वक काढलेले फोटोग्राफ्स का आले नाहीत याचं कोडं त्याला पडलं होतं.

इथून पुढच्या काळात असं कधी होऊ नये म्हणून त्याने मुंबईला सहा महिने फोटोग्राफीचा कोर्स केला. नामवंत फोटोग्राफरबरोबर माडेल फोटोग्राफी, स्टील फोटोग्राफीसारखी व्यावसायिक स्वरुपाची कामे केली आणि परत आल्यानंतर त्या क्षेत्रातला आपला सारा अनुभव, त्याने किल्ल्यांच्या फोटोग्राफीसाठी वापरला. म्हणूनच परवा

पुण्याला बालगंधर्व कलादालनात झालेल्या प्रदर्शनाच्या वेळेस त्याचे फोटो पाहून एका नामवंत व्यावसायिक फोटोग्राफरने हसून त्याला विचारलं, "काय हो, या किल्ल्यांनी तुम्हाला 'पोझेस' दिल्या आहेत का?" माझ्या एका कलावंत मित्राने त्याला परवा विचारलं, "आता यानंतर दुसऱ्या कोणत्या विषयावर तुम्ही काम करणार ? कशाचे फोटो काढणार ? " राजूने उत्तर दिले, " दुसरा कोणता विषय ? मी पुन्हा किल्ल्यांचे फोटो काढणार. नाना ऋतूतले, नाना वेळचे. मला उमजलेलं, आदरणीय बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या सहवासात राहून समजलेलं शिवचरित्र, मी याच माध्यमातून लोकांसमोर ठेवणार. आपल्या साऱ्या इतिहासाचे,गतवैभवाचे, पराक्रमाचे, हे किल्ले म्हणजेच शिल्लक राहिलेले एकमेव साक्षीदार आहेत. लोकांच्या मनात किल्ले म्हटलं की येतात ते पडके तट, ते ढासळलेले बुरुज, ओहोरलेली टाकी, माना टाकलेल्या दरवाजांच्या कमानी, काही अंशी हे खरंही आहे. पण त्या उद्ध्वस्तपणातही एक स्वाभिमान आहे. एक स्फुल्लिंग आहे. आम्ही कधी कुठल्याच पातशाह्यांपुढे माना झुकवल्या नाहीत. त्यामुळे आमच्या किल्ल्यांची ही अवस्था आहे, पण

हे सारं लोकांच्या समोर मांडले पाहिजे. कुणी लेख लिहून मांडतं, कोणी व्याख्यानं देऊन मांडतं. मी हे फोटोग्राफीच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करतो.”

हे फोटोग्राफ्स पाहून तुम्हाला एकदा तरी या किल्ल्यावर सश्रद्ध मनानं जाऊन यावसं वाटलं, महाराजांच्या समाधीसमोर, सिंहासनासमोर जाऊन नतमस्तक व्हावंसं वाटलं तरी ते मला पुरेस आहे, त्याक्षणी तुम्हाला जे समाधान मिळेल, जी प्रेरणा मिळेल ती तुम्ही तुम्हाला साध्य असलेल्या माध्यमातून इतरांपर्यंत पोहोचवा. याचसाठी ही धडपड आणि अट्टाहास आहे."

किती नेमक्या आणि समर्पक शब्दांत राजूनं त्याची भावना व्यक्त केली. मागच्या पावसाळ्यात तोरण्यावर जाऊन फोटो काढत असताना, अचानक आकाश भरुन आले. माझा एक दुसरा मित्र त्यांच्याबरोबर होता. तो म्हणाला, "आमच्या डोळ्यादेखत विजा चमकू लागल्या. बुधला माचीच्या परिसरात एकाद दुसरी वीज कोसळलीही. त्या घनभारानं आमचे डोक्यावरचे केस ताठ उभे राहिले. वीज आम्हाला माध्यम करून जमिनीत शिरु पाहात होती. अक्षरशः जीव घेऊन पळत सुटलो म्हणून वाचलो. तुम्ही आम्ही याला

वेडेपणाच म्हणणार. एखाद्या फोटो साठी जीव धोक्यात घालायचा काय नडलंय ? असं म्हणणार. यावर राजू मात्र हसून म्हणणार, " हमे पागल ही रहने दो, की हम पागल ही अच्छे है ।"



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

## १५. उदास

१९९६ साल होतं, राज्याभिषेकाची तिथी ३१ मे' ला आली होती. मुंबईचा एक ग्रुप त्यावेळेला राज्याभिषेक दिन साजरा करण्यासाठी येत असे. तीस तारखेला दुपारी ऐन उन्हाचे रायगडावर पोहोचलो. वळीव यंदा बहुतेक पडलाच नसावा अशी अवस्था दिसत होती. सगळीकडे वाळून कोळ झालेलं गवत, तापलेले खडक. पर्यटनखात्याच्या सूटमधे सामान टाकलं, कँटीनला पोटपूजा केली. भयंकर गरम होत होतं. घामाच्या धारा लागल्या होत्या. राजू म्हणाला, "चल मनोऱ्यात जाऊन बसू. तिथं जरा वारं असेल". मेणादरवाजा चढून राणीवशातून मनोऱ्यात आलो. कुठचं काय ? वारं अजिबातच पडलं होतं. उन्हाचे भपकारे जाणवत होते. लांब तिकडे टकमकपर्यंत मृगजळ दिसत होतं. खाली वाकून पाहिलं तर गंगासागराचं पाणी पार तळाला भिडलं होतं. हिरवट, खालचा गाळ फक्त राहिला होता. एक लांबसडक धामीण सळसळ करीत पाण्यावर आली. पाणी पिऊन कडेच्या झाडाखालच्या एका मोठया खडकावर पसरून पडून राहिली. आम्हीही हात उशाशी घेऊन मनोऱ्यात पडून

राहिलो. उन्हं उतरली तसे कँटीनकडे परतलो. दुपारी गडावर आल्यापासून एक उदासी जाणवत होती. नेहमीसारखे प्रसन्न वाटत नव्हते. चहा घेतला आणि कँटीनबाहेर व्हरांडयात खुर्ची टाकून बसून राहिलो. बाबू येऊन विचारून गेला, "रात्री जेवायला काय करु ?" त्याला म्हटलं, "तांदळाच्या भाकरी आणि पिठलं कर". तेव्हढ्यात शिवा आला म्हणाला, "कंदी आलावं ? समादीला गेला का नाही?" त्याला म्हटलं, " जेवण करुन जाऊ ". जेवणं उरकली आणि समाधीकडे निघालो. व्दादशीचा चंद्र होता, उजेडाचा काही प्रश्न नव्हता. मुंबईकर आलेले दिसत होते. सिंहासन, नगारखाना, पुतळा सजवायचं काम सुरू होतं. समाधीपाशी पोहोचलो. कार्यकर्ते फूलांच्या माळा, रांगोळ्या असं सारं सामान घेऊन देवळात आत बाहेर करत होते. दर्शन घेतलं. समाधीला जाऊन डोकं टेकलं आणि पायऱ्यांवर बसून राहिलो. इतके वेळा रायगडला येतो, पण आल्या क्षणापासून असं उदासपण, असं उचलून टाकल्यासारखं वाटणं, पहिल्यांदाच अनुभवत होतो. हा एक वेगळाच अनुभव, पहिल्यांदाच येत होता. राजूला म्हटलं, "चला निघू. पहाटे लवकर उठायचय". तसेच विमनस्क

अवस्थेत परतलो. झोप कधी लागली कुणास ठाऊक ? पहाटे पाचला उठून आवरलं आणि राजसभेत आलो तर शुकशुकाट. मुंबईकर रात्री उशिरापर्यंत सजावट करत होते वाटतं. धर्मशाळेत आलो तर मंडळी झोपेत होती. त्यांना उठवून राजसभेत या म्हणून सांगितलं आणि मी आणि राजू अष्टप्रधानांच्या वाडयात घुसलो. आत्ता कळालं होतं मंडळी निवांत का होती. अकराच्या सुमारास मुख्यमंत्री येणार होते, मग कार्यक्रम सुरू होणार होता. सगळा उत्साहच विरुन गेला. साडेसात आठच्या सुमारास पुन्हा मनोऱ्यात आलो. अचानक मनात आलं, राज्याभिषेकाची वेळ तर निघून गेली. आता उरला समारंभ, त्यात फक्त उपचार उरला होता. राजूला म्हटलं, "काय करायचं ?" तोही संभ्रमातच होता. अचानक दोघेही उठलो, म्हटलं चला परत. काल आल्यापासून काही मन लागत नाहीए. काय बिनसलयं कोण जाणे ? पण मग मनाची समजूत काढली. म्हटलं होत अस कधीकधी, पुन्हा येऊ दोन चार महिन्यांनी. तासाभरात खाली आलो. देशमुखांचा अनंता म्हणाला, " काय झालं ? थांबला नाहीत ?" कसनुसं हसलो, त्याला म्हटलं," जेवायचं बघ, आम्ही जेवण झालं की निघू परत". भटकणाऱ्या

सगळ्यांना वाटतं की किल्ल्यावरची प्रत्येक खेप ही सुंदरच असते, पण काही काही वेळा असं औदासिन्यपण अनुभवाला येतं. कदाचित वातावरण, मनःस्थिती, सीझन अशी अनेक कारणं असतात. त्यानंतर जवळ जवळ चाळीस वेळा, परत परत रायगडला गेलो. पण पुन्हा अस कधी अनुभवाला आलं नाही. त्यावेळेस मात्र  काय झालं कळत नाही, पण हाही एक अनुभव गाठीशी आला. जेवायला बसलो होतो तो, मुख्यमंत्र्यांच हेलिकॉप्टर गडावर जाताना दिसलं. मी आणि राजूने फक्त एकमेकाकडे पाहिलं.



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

## १६. गरज दीपस्तंभाची

काही ठिकाणं, काही गोष्टी जर त्या क्षेत्रातल्या संबंधित माहितगार माणसाबरोबर पाहता आल्या तर, त्या ठिकाणाचा इतिहास हा जिवंत होऊन सामोरा येतो आणि त्या भेटीतून मिळणारी प्रेरणा, ही कितीतरी काळपर्यंत टिकून राहते. शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदऱ्यांबरोबर रायगड आणि राजगड पाहायला मिळावेत, अशी माझी अनेक वर्षांपासूनची इच्छा. तसं मा. बाबासाहेबां बरोबर अनेक ठिकाणी फिरण्याचं भाग्य मला माझ्या सुदैवाने लाभलं. पण ही दोन ठिकाणे मात्र अजूनही राहून गेली होती. त्यातून त्यांनी आता सत्तरी ओलांडलेली. त्यामुळे तर हा योग जुळून येणं आणखीनच अवघड झालेलं.

पण दैवयोगानं ही संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली होती. ' यंदाची अश्व मोहीम पुण्याहून रायगडला जाणार आहे. दिनांक २५ला पूर्ण दिवस मा. बाबासाहेब त्यांच्याबरोबर असणार आहेत. तू २४ तारखेलाच सकाळपर्यंत पुण्यात ये' अशा अर्थाचं मित्राचं अगत्याचं पत्र आलं आणि ताबडतोब सॅक भरून मी २३तारखेलाच सकाळी पुण्यात हजर झालो.

दुपारी एकच्या पुणे-रायगड गाडीने संध्याकाळी सहा वाजता रायगडला पायथ्याशी हजर. आजपर्यंत शिवनेरी, पुरंदर, प्रतापगड, राजगड अशा अश्वमोहिमा सुखरूप पार पडल्या होत्या. पण रायगडावर घोडे वरपर्यंत नेणं केवळ अशक्यप्राय होतं. मिलिटरीवालेदेखील एकदा पाहणी करून तसेच परतले होते. दोन वर्षांपूर्वी राजगडावर गेलेली, महिलांची अश्व मोहीम यशस्वी झाल्यापासून, आमच्या शिलेदारांचाही उत्साह वाढला होता पण महादरवाजा आणि हत्ती तलाव यांच्या जवळचे पायऱ्यांचे दोन पॅच चढून घोडी वर आणणं महाकठीण होतं. त्यातून जर घोडी वर आलीच तर उतरवणं त्यापेक्षाही अवघड. घोडे गडावरच सोडून जायची पाळी यायची. तरीदेखील हे धाडस माझे शिलेदार दोस्त मा. बाबासाहेबांच्या साक्षीनं करणार होते. आम्ही दोघांनी पायऱ्या चढायला सुरुवात केली. घोडे आणि मोहिमेतील मंडळी दुसऱ्या दिवशी सकाळी पायथ्याला येणार होती. वर जाऊन विश्रांती घ्यावी व सकाळी पुन्हा खाली यावे म्हणून दोघेही निघालो. निघताना इतकी गडबड झाली की दोघेही विजेऱ्या घ्यायचे पार विसरून गेलो होतो. मशीद मोर्चापर्यंत येईतो पार अंधारलं. काहीच दिसेना. तशी वाट पायाखालची

होती, तरीही अंधारामुळे अतिशय सावकाश पावले टाकावी लागत होती. तासाभराने वर देशमुखांच्या हॉटेलात पोचलो. चहा घेऊन पुन्हा श्री.जगदीश्वर मंदिर गाठले. सकाळी पुन्हा खाली येऊन घोडेस्वारांच्या स्वागताला हजर झालो. थोड्यावेळाने पाचाडकडून टापांचे आवाज ऐकू आले. सुरवार-झब्बा, फेटे घातलेले तीन जण व नऊवारी साडी नेसून अंबाडा घालून, नाकात नथ घातलेल्या तीन जणी असे सहा जण हातात भगवे झेंडे घेऊन खाली दरवाजापाशी आले होते. सकाळचे दहा वाजले. 'छत्रपती श्री.शिवाजी महाराज की जय ' असा जयघोष झाला, नारळ फुटला. घोडे गड चढू लागले. चिंचोळी वाट, मुरमावरून पाय घसरत होते. काही ठिकाणी उतरून सुमारे दोन-अडीच तासांच्या जीवघेण्या कसरतीनंतर सारेजण सुखरूप गडावर पोहोचलो आणि पुन्हा एकदा जल्लोष झाला. संध्याकाळी बाबासाहेब गडावर आले. दुसऱ्या दिवशी सकाळी सारेजण स्नान वगैरे करून, फेटे बांधून, सिंहासन व समाधीच्या दर्शनाला निघाले. राजवाड्यात शिरलो आणि बाबासाहेबांच्या वाणीचा ओघ सुरू झाला, 'हे इथं घडलं, हे तिथं घडलं, ही सदर, तो महाल, ती न्यायसभा, ती विवेक सभा, आम्ही सारे जीवाचे

कान करून ऐकत होतो. आसपासची बरीच मंडळी यानिमित्ताने गडावर आली होती.  तीही या गर्दीत आमच्या मागे मागे येत होती.


मी बराच वेळ पाहत होतो, एक जख्ख म्हातारा डोईला मुंडासे, अंगात फाटका शर्ट, कमरेला फक्त लंगोटी, कानात भिकबाळी, धारदार नाक, अगदी अस्सल मावळी व्यक्तिमत्वाचा, हातातल्या काठीवर हनुवटी टेकवून, मा. बाबासाहेबांना एकटक पहात होता. बहुधा त्याला बाबासाहेबांना भेटायचं असावं. कितीतरी वेळ तो आमच्या मागे-मागे येत होता. अचानक बाबासाहेबांचे लक्ष गेले. बाबासाहेब हसले. नमस्कार करून म्हणाले, "या राजश्री, कसं काय?" तो सावकाश पुढे आला. गहिवरुन त्यानं बाबासाहेबांना मिठी मारली. मी शेजारी उभा होतो. मला झटकन् आठवलं, हे श्री रावजी अवकीरकर, विठ्ठलचे वडील. अप्पा दांडेकरांच्या, दुर्गभ्रमण गाथेत, यांचा कितीतरी वेळा उल्लेख आलेला, अप्पांनी  रायगडावर आधारित लिहिलेल्या कादंबरीतील, 'रानभुली'तील नायिकेचे, 'मनी'चे हे वडील. अप्पा गडावर आल्यावर त्यांच्याकडेच उतरत. थरथरत्या शब्दात ते बाबासाहेबांना म्हणाले, "मला पुण्याला

घेऊन चला. इथे मला कोणीही विचारत नाही, पोरगं माझं ऐकत नाही" एकूण हे 'शहरी दुखणं' इथंही येऊन पोहोचलं होतं. बाबासाहेबांनी त्यांची समजूत घातली. त्यांच्या डोळ्यातून अश्रु वाहत होते. कडेला गोळा झालेली माणसं हे सारं स्तंभित होऊन पाहात होती. तीस-पस्तीस वर्षांपूर्वी बाबासाहेब कितीतरी वेळा रायगडावर त्यांच्याबरोबर दिवस-रात्र भटकले होते. ज्यांना हे सारं माहीत होतं त्यांना त्या दोघांची भेट पाहून भावना अनावर होत होत्या. या गडबडीत बरोबरची मंडळी पुढे निघून राजसभेत पोहोचली होती. मी आणि बाबासाहेब, दोघेच मागे राहिलो होतो. माझ्या खांद्यावर हात ठेवून बाबासाहेब चालले होते. सकाळपासून चाललेल्या अखंड धावपळीमुळे व बोलण्यामुळे थकल्यासारखे वाटत होते. चालता चालता अचानक थांबले म्हणाले, "आनंदराव, दिव्यातलं तेल संपलं, आता वात जळू लागली". मला ती कल्पना सहन झाली नाही. मी लगेच म्हणालो, "बाबासाहेब, नको ते दिवे इथे, नको तितकी वर्षे जळाले आहेत. हवे ते दिवे, निदान शंभर वर्षे तरी निश्चित जळतील". ते हसले, म्हणाले "चला".

माझ्या डोक्यात मात्र विचारचक्र सुरु झाले. खरंच या राष्ट्राचा इतिहास पाहिला तर सगळी राक्षसी प्रवृत्तीची माणसं, दुर्जन असे सारे इथे दीर्घायुषी ठरले. त्यांचा भार या धरेनं अनेक वर्षे सहन केला. सगळी चांगली माणसे मात्र अल्पायुषी ! काय न्याय आहे !! आपापल्या घरात जळून आपल्या घरापुरता प्रकाश देणाऱ्या दिव्यांची इथे कमतरता नाही. असे अप्पलपोटे दिवे इथे घरोघरी आहेत. गरज आहे ती दीपस्तंभाची ! वादळवाऱ्यात, ऊन पावसात राहून जो तुफानात सापडलेल्या, गर्तेत जाणाऱ्या या राष्ट्रनौकेला मार्ग दाखवील, दिशा दाखवील, उद्धाराची, संपन्नतेची; तिला किनाऱ्याला लावील, इथल्या इतिहासाचं, संस्कृतीचं, परंपरांचं, धर्माचं जो रक्षण करील, विनाशाचा, अधर्माचा, अनैतिकतेचा, भ्रष्टाचाराचा अंधःकार जो दूर करील; गरज आहे अशा दीपस्तंभाची !

दुर्दैवाने आज त्यांची संख्या खूप थोडी आहे. तरीही आपले कर्तव्य आहे की असे जे थोडेफार शिल्लक आहेत, त्यांना जपण्याचं, त्यांचं रक्षण करण्याचं दायित्व आपलं आहे. प्रसंगी आपल्या स्वतःच्या दिव्यातलं तेल, त्यांच्या दिव्यात ओतावं लागलं तरी बेहत्तर, पण असे हे दीपस्तंभ जपले

पाहिजेत कारण तेच उद्याच्या अखंड हिंदुस्थानचे आधारस्तंभ आहेत !



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

# १७. राग न धरावा लेकुराचा

'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी,

करी डळमळ भूमंडळ सिंधुजळ गगनी'

आरती झाली, गुलाल उधळला. प्रसाद आणि तीर्थ घेऊन कुलोपाध्याय तसेच लगबगीने देवळाबाहेर आले. आज हनुमान जयंती, चैत्र शुद्ध पौर्णिमा पण गडावर नेहमीसारखी धावपळ नव्हती. जो तो आपली कामे निमूटपणे करीत होता. कुणाचे चित्त थाऱ्यावर नव्हते. साऱ्या साऱ्यांची अंतःकरणे राजवाड्याभोवती घोटाळत होती. काल संध्याकाळपासून महाराजांचा ज्वर जास्तच विकोपाला गेला होता. राजवैद्य सारखे आत-बाहेर फेऱ्या घालीत होते. महाराजांना सारखी ग्लानी येत होती. सावधपणा असे, त्यावेळेस ते शेजारी उभ्या सरदार व अष्टप्रधानांकडे पाहून मंदसे हसत व पुन्हा डोळे मिटून घेत. त्या मिटल्या डोळ्यांसमोर गेल्या चाळीस पन्नास वर्षांचा सारा भूतकाळ तरळत होता. कशी कशी स्वप्ने पाहिली, कसे त्या स्वप्नांना पंख फुटले, कुठून-कुठून आणि कसं कसं त्या पंखांना बळ लाभलं आणि अवघ्या

सोळाव्या वर्षी त्या पाखराने जी झेप घेतली ती थेट तोरण्यावर !

या झेपेची तुलना होऊ शकत होती फक्त महाबली हनुमंताने जन्मतःच घेतलेल्या झेपेशी! त्याने जन्मतःच सूर्यबिंब भक्षिण्यासाठी उड्डाण केलं.  ही झेपही तशीच होती. दिल्ली, विजापूर, नगर, गोवळकोंडा, चारही बाजूंनी वणवा धडाडून पेटला होता आणि हे पाखरू या ऐन वणव्याच्या केंद्रस्थानी जाऊन पोहोचलं. तिथून सुरू झाला विस्तवाशी जीवघेणा खेळ. पुढे पस्तीस वर्षे तो खेळ अखंड सुरू होता. अशीच उड्डाणे सुरू होती. कधी राजगड, कधी पुरंदर तर कधी थेट आग्रा. कधी रणरणत्या उन्हात तर कधी कोसळत्या पावसात. कधी रात्री अपरात्री कड्यांवरून तर कधी खोल दऱ्यांमधून. अशा भराऱ्या मारत, हे पाखरू अहोरात्र एका वेडापायी झटत होतं. थकल्या भागल्यावर विसाव्यासाठी  रायगडाकडे धाव घेत होतं. तिथे त्याची म्हातारी आई आपले पंख पसरून त्याला आपल्या छत्राखाली घेत होती. खिनभर विसावून ते पुन्हा भुर्रकन उडून जाई, नव्या विजयासाठी. सहाच वर्षांपूर्वी त्या माऊलीची सारी स्वप्नं त्या पाखरानं साकार केली. तिच्या

आयुष्याच्या व्रताचं उद्यापन त्यानं मोठ्या थाटामाटात केलं. तिची कूस धन्य झाली. पुढे अकराच दिवसांनी तिने समाधानाने डोळे मिटले, कायमचे. याच्या काळजाचा टवकाच उडाला. पंखातलं सारं बळ सरलं. आता कुणासाठी भराऱ्या मारायच्या? दमल्यावर कुणाच्या पंखाखाली शिरायचं? डोक्यावरचं छत्रच उडालं त्याच्या. उघड्या आकाशाखाली ते पाखरू पंखात चोच खुपसून बसून राहिलं. पण तसं बसून भागणार नव्हतं. मांडलेला सारा खेळ तडीस न्यावयाचा होता. कुडीत प्राण असेतो भराऱ्या घेणं भाग होतं. आईची भूमिका आता त्यालाच वठवायची होती. सारी बारा मावळं त्यांच्या पंखाखाली यायला आसुसली होती. काळ पुढे सरकत होता. पंखातलं  एकेक पीस अचानक गळून पडत होतं. कधी बाजीप्रभूच्या रूपाने, कधी मुरारबाजीच्या रूपाने तर कधी प्रतापराव गुजरांच्या रूपानं. प्रत्येक वेळी मरणप्राय वेदना होत होत्या. पण डोळ्यावाटे अश्रूंचा थेंबही नाही काढता येत नव्हता.

सतत सहा वर्ष हा खेळ नेटाने सुरू होता. पण संपलं, आता मात्र पंखातलं बळ संपलं. मोजकीच पीसं शिल्लक राहिली होती. त्यांच्यातही त्राण उरलं नव्हतं. कुडीतला प्राण त्या

माऊलीबरोबरच निघून गेला होता. उरलं-सुरलं चैतन्य बाहेर पडायची वाट पाहत होतं. अंतःचक्षू पन्हाळ्याकडे डोळे लावून बसले होते. स्वराज्याचा युवराज तिथे होता. त्याच्या हातात एकदा सूत्रं दिली की सारे पाश संपणार होते. बराच काळ झाला, पण कोणाची चाहूल लागेना. मृत्यू बिचारा केव्हाचा वाट पाहत राजवाड्याच्या महादरवाजाशी ताटकळत उभा होता. महाराजांच्या परवानगीशिवाय त्यालाही आत पाऊल टाकता येत नव्हते. घाईघाईने उपरणे सावरीत कुलोपाध्याय तीर्थाचा कलश घेऊन मंचकापाशी आले.  मंद आवाजात त्यांनी महाराजांना हाक मारली, "महाराज,   .......तीर्थ आणलं आहे." महाराजांनी सावकाश डोळे उघडले. कुलोपाध्यायांनी सावकाश त्यांच्या मुखात तीर्थ घातलं. पडल्या पडल्याच जड हातांनी त्यांनी हनुमंताला नमस्कार केला. आज्ञा मागितली. त्यालाही नाही म्हणवेना. जमलेल्या सर्वांना उद्देशून महाराज बोलले, "कैलासास 'श्रीं'च्या दर्शनास जाणार ! आता अवघे बाहेर बैसा ! आम्ही श्रींचे स्मरण करतो !"  हुंदका दाबत मंडळी बाहेर पडली. जगन्मातेचे स्मरण करीत महाराजांनी डोळे मिटले, खांद्यावर झालेल्या हस्तस्पर्शाने मृत्यूला जाग आली.

दरवाजापाशी आज्ञेची वाट पाहत पाहत तोही पेंगुळला होता. त्याने डोळे उघडले तो महाराज सुहास्यवदनाने त्याच्याकडे पाहत म्हणाले, "चलावे." त्याचे बोट धरून महाराज शांतपणे स्वर्गाची वाट चालू लागले. काही अंतरावर गेल्यावर महाराजांनी थबकून रायगडाकडे वळून पाहिले. रायगड दुःखाने काळवंडून गेला होता. महाराजांनी शांतपणे रायगडाला हात जोडले, उद्गारले, " दिंडी गेली पुढे, येतो आम्ही देवा ! राग न धरावा लेकुराचा" वाड्यात आकांत उसळला. ऐन माध्यान्ही, भर बारा वाजता सुर्य अस्तास गेला. रायगडच्या चिऱ्याचिऱ्यातून दुःखाचे लोट वाहू लागले. त्यांना बांध घालणं कुणालाही शक्य नव्हतं.

वेळ तीच होती, दिवसही तो होता.

मी, रवी, राजू, अनिलराव बडवे आणि पंढरपूरची पाच-सहा मंडळी राजवाड्याच्या कट्ट्यावर सुन्नपणे बसून होतो. आत प्रचंड कालवाकालव होत होती. तीन एकशे वर्षांपूर्वी याच वेळेला, इथेच हे सारे, असंच घडलं होतं, जसं मनाच्या खोल गाभाऱ्यात मगाशी उसळ्या मारीत होतं. रायगडाला साधारणपणे पाच-सहा महिन्यातून एकदा तरी जाणे घडतेच.

पण श्रीशिवपुण्यतिथिला मात्र पहिल्यांदाच आलो होतो. काल संध्याकाळी पंढरपूरच्या मंडळींबरोबर जेव्हा पायथ्याशी पोहोचलो, तेव्हा बरीच गर्दी गड चढत होती. इचलकरंजीवरून दोन गाड्या भरून वारकरी मंडळी आली होती. वर पोहोचलो तेव्हा बरीच वर्दळ जाणवत होती. रात्री श्रीजगदीश्वराच्या ओवरीत कीर्तन सुरु झाले. वरून चतुर्दशीचा चंद्र चांदणं ओतीत होता. खाली टाळ मृदुंगाचे ध्वनी श्रीजगदीश्वराच्या गाभाऱ्यात भरून राहिलेले होते. आसपासच्या खेड्यातील बरीच मंडळी कीर्तनासाठी जमली होती. कीर्तन रंगात आलं होतं. ती सारी मंडळी जीवाचे कान करून ऐकत होती. थोडावेळ देवळात थांबून, आम्ही भटकायला बाहेर पडलो. बऱ्याच दूरवर टाळ मृदुंगाचे आवाज ऐकू येत होते. मला वाटलं, अशाच एखाद्या रात्री स्वतः महाराज कीर्तन ऐकण्यासाठी आले असतील. उत्सवाच्या निमित्ताने वर्दळ जाणवत होती. गड नांदता असल्याचा भास होत होता. बराच वेळ भटकून झाल्यावर वसंताच्या झोपडीसमोरच्या अंगणात झोपण्यासाठी गेलो. दुसऱ्या दिवशी हनुमान जयंती होती. पहाटे पाचला उठून सारे काळ्या हौदावर स्नानासाठी गेलो. स्नान वगैरे आटोपून

परत येईतो, देवळात मारुतीजन्माचे कीर्तन सुरु झाले होते. सर्वांनी सुरवार, झब्बे घातले, फेटे बांधून मंडळी तयार झाली. शिवस्मारक मंडळाच्या पूजेआधी पंढरपूरची मंडळी समाधीची पूजा करतात. हार,फुले, कुंकू,बुक्का सगळं-सगळं साग्रसंगीत या मंडळींनी बरोबर आणलेलं असतं. यथासांग पूजा होते. असं गेली बरीच वर्षे चालू आहे. पूजेचं साहित्य घेऊन समाधीकडे निघालो. त्या मंडळींची आपापसात काहीतरी कुजबूज झाली. मी काही लक्ष दिलं नाही. आधी देवळात जाऊन श्री जगदीश्वराची पूजा केली. बाहेर गाभाऱ्यात असलेल्या मारुतीची पूजा करून समाधीपाशी आलो. अनिलराव म्हणाले,"आनंदराव, पूजेला बसा." मी नम्रपणे नकार दिला. म्हणालो,"आपली एवढ्या वर्षांची प्रथा आहे. आपणच पूजा करा. त्यातून तुम्ही यंदा अयोध्येला कारसेवेला जाऊन आला आहात. एवढ्या कष्टाने शरयू ,गंगा, भीमा इत्यादींचं पाणी येथपर्यंत आणलंत. श्रीशिवसमाधीच्या पूजेचा मान तुमचा आहे." त्यांनी पुन्हा सांगितलं, "माझीच इच्छा आहे की, पूजा तुमच्या हातूनच व्हावी. सगळ्यांचा तोच आग्रह आहे." आता मला त्यांच्या मागच्या कुजबूजीचं रहस्य उलगडलं. त्यांचा आग्रह

मोडवेना. सगळी मंडळी साठीच्या पुढची होती. शेवटी त्या सर्वांच्या पाया पडून पूजेला बसलो. प्रसन्न वेळ होती. समोर क्षितिजावर पसरलेल्या भगव्या रंगातून, सूर्यबिंब हळूहळू राजगडाच्या मागून वर येत होतं. दर्शनाला आलेली मंडळी समाधीभोवती गर्दी करून पूजेचा सोहळा पाहात होती. अनिलरावांनी संकल्प सांगितला, "म्हणा, अखंड हिंदुस्थान निर्माणार्थ, श्रीशिवपूजनं करिष्ये". माझ्या अंगावर सरसरून काटा आला.

साऱ्या अंगातून एक वीज खेळून गेली. अनिलराव मंत्र म्हणत होते, मी त्याबरहुकूम कृती करत होतो. ते म्हणाले, "आता तो कलश घ्या". शरयू गंगा भीमा यांचं जल एकत्रित असलेला तो कलश मी उचलला. लख्ख  घासलेल्या त्या तांब्याच्या कलशावर सूर्याचे किरण पडतात ते पात्र चकाकलं. कानावर पडणाऱ्या मंत्राबरोबर माझ्या हातातील कलश समाधीवर रिकामा होत होता. काय नव्हतं त्या कलशामध्ये? त्यामध्ये सूरसरिता गंगा होती, पुण्यपावन चंद्रभागा होती आणि त्यापेक्षाही अयोध्येच्या कारसेवकांच्या रक्ताने पावन झालेली शरयू होती. अभिषेक पूर्ण झाला. हार वगैरे घालून नमस्कारासाठी खाली वाकलो. अनिलराव

म्हणाले, "आनंदराव, तीन वेळा म्हणा, "हिंदूराष्ट्र निर्माणार्थ पुनरागमनायचं" डोळे मिटून म्हणालो. पाया पडून उतरलो. जवळच उभ्या असलेल्या सर्व वयोवृद्धांना वाकून नमस्कार करून एका कोपऱ्यात जाऊन उभा राहिलो. समाधीच्या दर्शनासाठी झुंबड उडाली. अंतःकरण भरून आलं होतं. जन्माला आल्याचं सार्थक झालं. ऐन पुण्यतिथीच्या दिवशी माझ्या हातून समाधीला अभिषेक झाला होता. तिथून हलावसंच वाटत नव्हतं. कुणा कुणाची पुण्याई आणि आशीर्वाद आज माझ्या पाठीमागे उभे राहिले कुणास ठाऊक ! पण माझ्या आयुष्यातला एक अत्युच्च क्षण आज रायगडाच्या साक्षीने घडून आला होता. पण या क्षणाने खांद्यावर दिलेली जबाबदारीही तितकीच महत्त्वाची होती. जीवात जीव असे तोपर्यंत श्रीशिवचरित्राच्या प्रसारासाठी जे शक्य ते सर्व करण्याची प्रतिज्ञा तिथे घ्यावी लागली, ती मी आनंदाने घेतली. पंढरपूरकर मंडळींच्या कृपेमुळे आज हा दिवस मी अनुभवू शकलो होतो. त्यांचा आणि माझा निश्चित काहीतरी ऋणानुबंध होता. आमचे दैवत एकच होते 'श्रीशिवछत्रपती.'

## १८. मेरा साया साथ होगा

पंचवीस वर्षांपूर्वीची गोष्ट. एक अशीच वोळून आलेली संध्याकाळ. दिवेलागणीला मी आणि राजू रायगडाच्या पायथ्याला पोहोचलो. पश्चिमेच्या दिशेत आभाळातली रंगपंचमी पहात वाळसूऱ्याच्या खिंडीत कितीतरी वेळ बसून होतो. रायगडवाडीतली गुरं घरी परतत होती, त्यांच्या गळ्यातल्या घाटरांचे आवाज लख्खं ऐकू येत होते. झोपडीतून घरातून स्वयंपाकाला सुरुवात झाली होती. झोपड्यांच्या कुडातून उठणारे धुराचे फटकारे याची साक्ष देत होते. गाईच्या पावलांनी उसळणारी धूळ त्या धुरात मिसळून जात होती. अतिशय शांतपणे संध्याकाळ वाडीवर उतरत होती. त्या सगळ्या चित्राकडे पहात आम्ही दोघे निशब्द बसून होतो. एकदम भानावर आलो, अजून गड चढून जायचा होता. अंधार दाटून येत असला तरी वाट पायाखालची होती. दोघांनीही वाटेवर पाऊल घातले. वाडीत कुणीतरी रेडिओ लावला होता, मधूनच वाऱ्याच्या झुळुकीबरोबर गाण्यांचे शब्द कानावर पडत होते. अचानक दोघांनाही साक्षात्कार झाला की दोघांकडेही बॅटरी नाही.

चमकून दोघांनी एकमेकांकडे पाहिले, आता तासा दीडतासाची ही चढाई अंधारात कशी करायची? चटचट पाय उचलत मशीद मोर्चापाशी आलो. पुढं गच्च झाडी आणि वाडीतून वाऱ्याबरोबर आलेल्या गाण्याचे शब्द कानावर पडले.

"तू जहाँ जहाँ चलेगा, मेरा साया साथ होगा"

अंगावर सरसरून काटा आला. एखाद्या वेळी एखादे शब्द परतत्त्वाचा स्पर्श झाल्यासारखे मनाच्या अंगणात अवतरतात. बुद्धी त्या शब्दांची दासी होऊन जाते. मी एखाद्या खांबासारखा जागेवर खिळून त्या शब्दांचा माग काढत होतो तर ऐकू आला एकतारीचा झंकार. सोबतीला चिपळ्यांचा नाद, मधाळ वाणीतून उतरणारं ते शब्दशिल्प माझ्याभोवती भोवती फेर धरू लागलं... 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती, चालविशी हाती धरुनिया'.....

'तू जहाँ जहाँ चलेगा,

मेरा साया साथ होगा'....

'जेथे जातो तेथे....

मेरा साया साथ होगा'....

काही कळेनासं झालं...डोळ्यांपुढचा अंधार डोक्यात दाटून येऊ लागला आणि अचानक डोळ्यांपुढे एक वात पेटली. त्या पेटत्या वातीच्या उजेडात दिसला एक चेहरा, निरागस, हसरा, तुकोबांच्या मुलासारखा..... अरे हा तर हिरकणीच्या खालच्या झापावरचा बाळू. इथे कसा काय ? हसून म्हणाला "मी मंगाशी तुमाला वाळसूऱ्याच्या खिंडीत बघितलाव. मला आचीर वाटलं, का सांजच्या या वक्ताला, बिगर ब्येटरीकचे तुमी गड कसे येंगनार? म्हणून मग घासलेटचा दिवा आणला तुमच्यासाठी...." मी फक्त राजुकडे पाहिलं. काही वेळा काही गाणी आपल्या आकलनापलीकडचा अर्थ सांगून जातात, क्षणात त्यांचे संदर्भ बदलतात, त्यांना परतत्त्वाचा स्पर्श लाभतो आणि आपलं अंतःकरण उजळून निघतं... आणि खात्री पटते की होय कुणीतरी नक्की पाठीशी आहे....

## १९. सदा सर्वदा देव सन्निध आहे ....

२०१४ चा नोव्हेंबर महिना. गच्च अंधार, हवेत चांगलाच गारठा होता. रायगडावरच्या हत्ती टाक्याच्या भिंतीवर बसून होतो. सकाळी सहा वाजता सुयश विद्यालयाचे शंभर विद्यार्थी घेऊन सोलापूर सोडलं होतं. संध्याकाळी पार अंधार पडल्यावर पाचाडला पोहोचलो. पोरं सावकाश चढत चढत येत होती. मी पुढ येऊन हत्ती टाक्याच्या भिंतीवर पोरांची वाट पहात बसलो होतो.

अंधारात काही दिसत न्हवतं. आजपर्यंतच्या एकेक रायगडच्या वाऱ्या आठवत होत्या. कधी एकटा, कधी गोतावळा. प्रत्येक वेळी नवीन अनुभव, नवीन कथा. या वेळेस काय अनुभव येणार कोण जाणे, असा विचार करीत असतानाच महादरवाजाच्या घळीतून पोरांच्या घोषणा, बॅटऱ्यांचे प्रकाश दिसू लागले. वाकून पाहिलं तर मशालींची रांगच्या रांग दिसावी तशा बॅटऱ्या दिसत होत्या. पोर जशी वर आली तसा दंगा ऐकू येऊ लागला.

थोडं पुढं जाऊन पाहिलं तर दोन शिक्षक एका पोराला पाठीवर घालून घेऊन येत होते. पोरगं अक्षरशः ठो ऽ ऽ ठो

बोंबलत होतं. विचारलं, "काय झालं?" तर म्हणाले, "वाटेत कुठतरी विंचू चावला". माझी अवस्था काय वर्णावी? कसंबसं त्या पोराला एमटीडीसीपर्यंत आणलं. मग सुरु झाली डॉक्टरांबरोबर फोनाफोनी. तोवर दोन चार पोरं रोपवेकडे पाठवली. डॉक्टर फोनवरून विचारत होते, विंचू कोणत्या रंगाचा होता? माझ कप्पाळ ! त्या मिट्ट अंधारात पोरांना काय कळणार होतं? एक डॉक्टर म्हणाले, "त्याच्या प्लेटलेट कमी होतील, ताबडतोब महाडला घेऊन जा". पाचाडला फोन करून जीपची व्यवस्था केली.

पोरगं ओरडतच होतं. मोरे नावाचा एमटीडीसीचा मॅनेजर हा सगळा गोंधळ पहात होता. त्याने कँटीनमधल्या पोराला सांगितलं, "जा रे, बाजारपेठेमागच्या म्हाताऱ्याला घेऊन ये". पंधरा मिनीटांत म्हातारा हजर. त्यानं आधी घोळका केलेली पोरं बाजूला केली. एका शिक्षकाला पोराला धरायला सांगितलं. हाफ पॅंट्च्या खिशातून दोन पूड्या काढल्या, पोरावरून ओवाळून लांब टाकून दिल्या आणि ज्या पायाला विंचू चावला होता त्या पायाच्या वरुन चार बोटं अंतरावरून आपला तळहात मांडीपासून बोटापर्यंत खाली आणला, पोरगं खच्चून आरडायला लागलं, त्यान हात बोटांवरून


खाली घेऊन झटकला आणि पोरगं टुणकन उडी मारून उभं राहिलं. वेदनेचा लवलेशही चेहऱ्यावर नव्हता. माझ्यासकट हजर असलेले पन्नास साठ जण अवाक ! नेमकं काय झालं तेच कळेना. सावरेपर्यंत म्हातारा आला तसा अंधारात गडप झाला होता.

केवढया मोठया संकटातून वाचलो होतो. काय काय धावपळ करावी लागली असती. जिथ उभा होतो तिथूनच शिवसमाधीकडे बघून हात जोडले. पोरांची जेवणं ऊरकून घेतली आणि दोन शिक्षक बरोबर घेऊन तडातडा रात्रीच समाधी गाठली. हात जोडून समोर उभा राहिलो. मनात म्हणालो, इतके वेळेला, इतक्या जणांना घेऊन तूमच्या दर्शनाला आलो. कधीच कसलं संकट येऊ दिलं नाहीत. सगळ्यांना सुखरूप घेऊन यायचात आणि सुखरूप पोहोचते करायचात, तुमचाच आधार असायचा आणि असतो ही.

आज परीक्षेची वेळ होती, पण तुम्हीच त्या म्हाताऱ्याच्या रुपात येऊन सोडवलत. काय बोलू ? अशीच कृपेची सावली आयुष्यभर शिरावर राहू दे. चंद्राचा मंद प्रकाश पडला होता. बराच वेळ तसाच बसून होतो. थंडी वाढली तसे मग

एमटीडीसीला परतलो. समर्थ वचनाचा सार्थ अनुभव आला होता,

सदा सर्वदा देव सन्निध आहे |
कृपाळूपणे अल्प धारिष्टय पाहे ||



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

# २०. पुनःप्रत्यय

सरता ऑगस्ट, पाऊस ऐन भरात होता. पहाटे साडेपाचच्या पुणे विन्हेरे गाडीने दहा-साडेदहाला महाडला उतरलो आणि पहिले संकट दत्त म्हणून उभे राहिले. महाडच्या एस. टी. डेपोचा आज संप होता. आता...... महाड-रायगड अंतर चोवीस किलोमीटर. काय करायचं?

कसंबसं एका रिक्षावाल्याला पटवलं. मी, रवी आणि राजू तिघांची शरीरं, सॅकसकट रिक्षात कोंबली आणि निघालो. रिक्षा जशी कोंझरच्या चढाला लागली तशी मनस्वी धूर ओकू लागली. रिक्षावाला इंच इंच लढवू या आवेशात होता खरा, पण मग त्यानेही हार पत्करली. मागे वळून म्हणाला," तूमी चालत येताव का? मी तुमचं सामान घेऊन फुडं होतो." तिघांनी एकमेकांकडं पाहिलं. त्या दोघांनी चटकन कॅमेरे हातात घेतले. मी कॅमेऱ्यांवर छत्री धरण्यासाठी छत्री घेऊन बाहेर पडलो. सॅक घेऊन रिक्षावाला सर्रकन निघून गेला.

आमच्यासाठी निसर्गाने खजिनाच उघडा केला होता. वाटेतले झरे, ओहोळ, नाले तुडुंब भरून वाहत होते. छोट्या-मोठ्या धबधब्यांची तर माळच लागली होती. चांगले

तासा-दोन तासांनी पाचाडला पोहोचलो. रिक्षावाला कावला होता. त्याचे पैसे चुकते केले. देशमुखांकडे व्यवस्थित पोटपूजा केली आणि तुकशेट शेडग्याच्या घराशेजारच्या वहाळातून, मधल्या वाटेने चितदरवाजासमोर पावते झालो.


समोर धुक्याची खोळ पसरलेला, आम्हा शिवभक्तांचा कैलास, दुर्ग दुर्गेश्वर, श्रीशिवतीर्थ रायगड ! भान हरपून तिघेही पाहातच राहिलो. त्या धुक्याच्या खोळीतून, तीन मोठे जलप्रपात खालच्या दरीत कोसळत होते. वर ढगांची जाड दुलई. पृथ्वीवर गंगावतरण कसं झालं असेल ते याची देही याची डोळा अनुभवलं. पायरीला स्पर्श करून चढणीला लागलो अन मग रायगडाच्या कुशीत शिरलो. सूर्यास्ताच्या आत श्रीजगदीश्वर मंदिर गाठायचं होतं. अर्थात सूर्याचा पत्ताच नव्हता, उजेड तेवढा जाणवत होता. वाटेतल्या दोन्ही धबधब्यात मनसोक्त भिजत, तासाभराने होळीच्या माळावर पोहोचलो अन थबकलो. काहीच दिसत नव्हतं. अक्षरशः ढगात होतो.

शिरकाईपासून बाजारपेठेची भिंत गाठायला वीस मिनिटं लागली. तिघांनी हात पसरून, बाजारपेठेच्या दोन्ही भिंतींचा

अंदाज घेतला आणि मधोमध नाकासमोर रस्त्यावरून चालू लागलो. काही म्हणजे काही दिसत नव्हतं. अचानक या धुक्याच्या भिंतीतून दोन शिंग आमच्यासमोर प्रकट झाली. बाजारपेठेमागच्या झोपड्यांतली कुणाची तरी चरायला सोडलेली गाय अचानक शिंगांसह दर्शन देती झाली. तिला टाळून, तसेच अंदाजा-अंदाजाने श्रीजगदीश्वराच्या देवळात पोहोचलो. तो देवळात घोटाभर पाणी. आता.......रहायचं कुठं? तसेच सॅक उचलून उजव्या हाताच्या पायवाटेने, वसंताच्या झोपडीसमोर दत्त म्हणून उभे राहिलो. आमच्या असल्या साक्षात्काराची त्याला सवय होती. त्याच्या झोपडीत घुसलो. आतल्या उबेने अंग सुखावलं. रात्रं झोपडीतच काढली अन् सूर्योदयाला श्रीशिवसमाधीसमोर येऊन, हात जोडून डोळे मिटून उभे राहिलो.

आज सकाळी डोळे उघडल्यावर, मोबाईलचा डोळा उघडला अन् अशाच एका गडवेड्याने परवा दिवशी काढलेले, हे रायगडाचे फोटो समोर आले. वेडाच झालो. आठवणीत हरवलो, दिवसभर बेचैन, आत्ता तुमच्यासमोर त्या आठवणींची उजळणी केली आणि पुनःप्रत्ययाचा आनंद घेतला. एक इंग्रजी म्हण थोडी बदलतो, थ्री इज कंपनी अँड

फोर इज क्राऊड ! त्या काळात बऱ्याच वेळा, आम्ही तिघंच एकत्र असायचो हाही एक मणिकांचन योगच .......



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

## २१. जाणता राजा - रायगड

१९८५ ते २०२०, जाणता राजा या महानाटयाला आज पस्तीस वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्त या नाटकाची एक अभूतपूर्व आठवण …

असाध्य ते साध्य, करिता सायास ..

१९९५सालचा डिसेंबर महिना, तीस तारीख, महाडला जाणता राजाचे प्रयोग सुरू होते. शेवटचा प्रयोग. मी सकाळीच धावत पळत रायगडवरून परतलो होतो.

या प्रयोगादरम्यान, मी एक कल्पना बाबासाहेबांसमोर मांडली होती. तीस तारखेचा प्रयोग संपला की सगळ्या कलाकारांना घेऊन रायगडावर जाऊ आणि प्रत्यक्ष ज्याठिकाणी राज्याभिषेक झाला त्याठिकाणी राजसभेत सर्व साहित्यासह फक्त राज्याभिषेक सादर करू. बाबासाहेब काही तयार होत नव्हते. त्यासाठी लागणाऱ्या परवानग्या, साहित्य वर न्यायची व्यवस्था, कलाकारांची व्यवस्था, अनेक अडचणी होत्या. पण मी इरेला पेटलो होतो. मी म्हणालो, "ते सर्व माझ्यावर सोपवा".  मी आणि माझा मित्र श्रीनिवास वीरकर आम्ही दोघांनी ती जबाबदारी घेतली.

कामाला लागलो. महाडचे प्रयोग सुरु असतानाच, मी एकदोन वेळा रायगडावर जाऊन व्यवस्था करुन आलो. श्री. वीरकरांनी मुंबईचा किल्ला सांभाळला. शिवसेनेचे मा. गजाननराव किर्तीकर त्यावेळेस पर्यटन आणि सांस्कृतिक खात्याचे मंत्री होते. त्यांनी परवानगी तर मिळवून दिलीच, पण स्वतः सहकुटुंब रायगडावर येणार म्हणून आवर्जुन सांगितलं.

तीस तारखेचा महाडचा शो सुरु झाला. तोबा गर्दी !! मी शाहीर करत होतो आणि एका क्षणी समोरची प्रेक्षकांनी खचाखच भरलेली गॅलरी अकस्मात कोसळली. आरडाओरड, किंकाळ्या, प्रयोग थांबवला. सगळे कलाकार स्टेजवरून अपघातस्थळी धावलो. सगळ्या कोसळलेल्या नागरिकांना बाहेर ओढून काढलं. चाळीसएक जण गंभीर जखमी होते. त्या सगळ्यांना हॉस्पिटलला पाठवलं. आश्चर्य म्हणजे प्रयोग पुन्हा सुरू केला. प्रयोग व्यवस्थित पार पाडून मी आणि श्री रात्री अडीच वाजता रायगडला पोहोचलो. तिथच पायऱ्यांवर एक डुलकी काढून अंधारातच तडक गडावर आलो. सकाळी सहाला सगळे कलाकार पायथ्याशी पोहोचणार होते. सगळयांची कमीतकमी वेळात रायगड

चढण्याची स्पर्धा साडेसहाला सुरु होणार होती. मी निरीक्षक म्हणून हत्तीटाक्यापाशी येऊन बसलो. आमचा विद्याधर रायरीकर अवघ्या बावीस मिनीटांत गड चढून पहिला आला. दिवसभर सगळे बाबासाहेबांबरोबर गडभर फिरत होते. सगळ्या व्यवस्था, जेवणखाणं, प्रयोगाची पूर्वतयारी करताकरता माझी आणि श्रीची अवस्था बाजीप्रभू आणि मुरारबाजीसारखी झाली होती.

त्यातच एक संकट दत्त म्हणून उभे राहिले. तब्येत बिघडली म्हणून गागाभट्टांचे काम करणारे कलाकार गडावर आलेच नव्हते. एव्हाना प्रयोग होणार हा विश्वास बाबासाहेबांना आला होता. मला म्हणाले, "काळजी करू नको. मी करतो गागाभट्टांचे काम !"

संध्याकाळचे सात वाजले. कुणालाही न कळवता, किंबहुना कळणार नाही, याची खबरदारी घेऊनही, राजसभेत मा. गजानन किर्तीकरांसह दोन-अडीच हजार माणसं जमली होती. माझ्यामागं शाहीरी फडात, तब्बल अठराजणं ऊभे होते. डोळ्याचं पारणं फेडणारा क्षण सगळेजण अनुभवत होते. तक्रार एकच होती, वारंवार डोळे भरुन येत असल्यान स्पष्ट दिसत नव्हतं. दाढी वाढलेले बाबासाहेब गागाभट्टांच्या

भूमिकेत एखाद्या ऋषीसारखे भासत होते आणि तो राज्यारोहणाचा क्षण, ज्या ठिकाणी तीन-साडेतीनशे वर्षांपूर्वी घडला त्याच ठिकाणी, तेवढ्याच उत्साहात, तेव्हढ्याच जोषात, त्या वैभवाची चुणुक दाखवणाऱ्या साहित्यासह घडून आला. सारा जीव पायात गोळा करून नाचलो त्यादिवशी !

आत्ता लिहीतानाही, डोळ्यातलं पाणी आवरत नाहीए आणि मग त्याच दिमाखात शिवछत्रपतींची मिरवणूक निघाली जगदीश्वरमंदिराकडे! असंख्य मशाली पेटल्या होत्या. शिंगे वाजत होती, ड्फ कडाडत होते. अष्टप्रधान आणि छत्राखाली असलेले महाराज सारेजण त्याच वैभवात मंदिराकडे निघाले. पोवाडे, गाणी, पदय नुसता कल्लोळ उठला होता. तब्बल दोन तासांनी ही मिरवणूक जगदीश्वराच्या मंदिरात पोहोचली. महाराजांनी आणि इतर सर्वांनी जगदीश्वराचे आणि शिवसमाधीचे दर्शन घेतले आणि मग समाधीच्या चौथऱ्यावर तो शिवयोगी, गागाभट्टांच्या वेषात बोलायला ऊभा राहिला.

तब्बल तासभर नुस्ती शिवगंगा ओसंडून वहात होती. शेवटी एक वाक्य म्हणाले, "आज एकतीस डिसेंबर१९९५, सार

जग वर्षाअखेर साजरं करीत असताना आपण एक इतिहास इथ घडवला आहे. साऱ्या जगापेक्षा वेगळ्या, जगावेगळ्या पद्धतीने". परतताना माझ्या पाठीवर हात ठेऊन म्हणाले, "करुन दाखवलतं तुम्ही!"  बास ! आणखी काय हवं होतं? ती संध्याकाळ, राजसभेत साकारायला मिळालेला तो शाहीर, तो राज्याभिषेक, रायगडाला जायला लागल्यापासूनच माझं आयुष्यभराचं स्वप्न होतं ते, ते आज साकार झालं होतं. मन भरून आलं होतं.



## २२. सांज ये गोकुळी ......

गेल्या तीस वर्षात रायगड हा आयुष्याचा अविभाज्य भाग झालाय.एखाद्या वर्षाचा जरी गॅप पडला तरी जीव कासावीस होतो. पंचवीसेक इतिहास संस्करण शिबीरे झाली गेल्या तीस वर्षात रायगडावर. सगळ्या आखीव कार्यक्रमात दुसऱ्या दिवशीचा संध्याकाळचा कार्यक्रम म्हणजे टकमक टोकावर किंवा हिरकणी टोकावर बसून बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या आवाजात, प्रतापरावांच्या बलिदानाची गाथा ऐकवणे. नीरव शांततेत कथेतली शेवटची भैरवी पूर्ण व्हायची. बरोबरीचे पंचवीस, पन्नास, शंभरजण भारावलेले, डोळ्यांच्या कडा ओलावलेल्या. कुणाच्या पापण्यांना तोही भार सहन व्हायचा नाही. नजर समोर सूर्यावर खिळलेली.

कोकण दिव्याच्या उजव्या हाताच्या डोंगररांगेला चिकटलेला अस्ताला जाणारा सूर्य. सगळे स्तब्ध असायचे. आकाश सगळं विरागी भगव्या रंगानं माखलेलं. कुणाचीच काहीच बोलायची इच्छा नसे. सांजवेळ अशीच कातरवेळेत परिवर्तित झालेली आणि अचानक आशाताईंची आलाप कानावर यायची सोबतीला सुधीर मोघ्यांचे दैवी शब्द अन्

श्रीधर फडक्यांच स्वर्गीय संगीत ... सांज ये गोकूळी .. सावळी सावळी. त्या तिकडे पार क्षितीजापासून निघालेला भाला खच्चकन हृदयात घुसायचा. आत्ता या क्षणापर्यंत पापण्यांआड दडवलेला आसवांचा पूर बांध फोडून बाहेर वाहू लागायचा. समोर पसरलेला अफाट सहयाद्रि. पाचाडवर उतरणारी शेवटची सूर्यकिरणे, गळ्यातली घाटरं वाजवीत हिरकणीवाडीकडे परतणारी गुरं. आता या वेळेला या गाण्याच्या पार्श्वभूमीला आणखी काय हवं? गाण्यातली ओळ न् ओळ समोर साकारत असायची.

`पर्वतांची दिसे, दूर रांग
काजळाची जणू, दाट रेघ`

या रेघेवरच तो सूर्यनारायण टेकलेला असायचा.

`धूळ उडवीत, गाई निघाल्या
शाम रंगात, वाटा बुडाल्या `

हिरकणीवाडीत किंवा रायगडवाडीत परतणाऱ्या गायींचे कळपही दृष्टीस पडायचे.

`माऊली सांज, अंधार पान्हा
विश्व सारे, जणू होई कान्हा`

सभोवतालचा दाटून येणारा अंधार सोबतीला त्याच सावळ्या चाहूली घेऊन येत असे. वाटायचं आता इथून ऊठूच नये, असच त्या अंधाराच्या पांघरूणात गुडूप व्हाव. काही काही गाणी एखाद्या ठिकाणासाठीच लिहीली आहेत किंवा त्या गाण्यांचा पारलौकिक अर्थ त्या ठिकाणीच उलगडतो अस काहीसं असावं. त्यामुळे आजं कुठही हे गाणं ऐकलं की मी हिरकणीवर मनाने कधीचं पोहोचलेला असतो. डोळे अंतरात वळतात. तीच ती चिरपरिचीत दृश्य मालिका सुरू होते. शरीर कुठेही असलं तरी मन रायगडाच्या कातळावर विसावत.



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

## २३. वाळल्या फुलांत व्यर्थ, गंध शोधितो जुना !

दोन वर्ष ....... तब्बल दोन वर्ष होऊन गेली रायगडला जाऊन. दोन वर्षांपूर्वी एका महिन्यात तीन वेळा गेलो होतो. आज पुन्हा निघालो आहे. अलीकडे गडावर फिरताना, पूर्वीचा माहोल जाणवत नाही. सगळीकडे गर्दी, कचरा, मोबाईलवर लावलेली गाणी, आरडाओरडा, घोषणा हे सगळं पाहून मनावर ओरखडे उठतात.

१९८० ते ९० च्या दशकात काय वातावरण असायचं. मुळात अशा स्फूर्तीस्थळी कसं वागावं याच्या आचारसंहिताच नाहीत. हिंडणाऱ्यांपाशी सारासार विवेक नाही. अशा पवित्र ठिकाणी वावरताना, तिथल्या वातावरणात असलेली ऊर्जा आपल्या अंतरंगात भरून घेता आली पाहिजे. तो भारलेला काळ मनाने का होईना समजून घेता आला पाहिजे.

श्री. शिवछत्रपतींच्या पावन पदस्पर्शाचे भाग्य लाभलेले ते चौथरे, ते दरवाजे, यांच्यावर हात फिरवून त्या चैतन्याचा मागोवा घेता आला पाहिजे. सश्रद्ध मनानं सगळीकडे हिंडून आपली गडयात्रा सुफळ करून घेतली पाहिजे. दिसणारं

आणि जाणवणारं चित्र नेमकं याच्या विपरीत आहे म्हणून अलीकडे गर्दीच्या वेळी जायलाच नको वाटतं.
दोन-तीन जिवलगांसमवेत रात्र-रात्र केलेल्या भटकंतीच्या आठवणी, पौर्णिमेच्या रात्री टकमकवर बसून रहाळभर पसरलेल्या चांदिण्याचा अनुभव घेणं, रात्रीची सिंहासन ते समाधी अशी केलेली मूकयात्रा, हे सारं आता मनाच्या खोल आठवणीत साठवलं गेलंय.
वाळल्या फुलात व्यर्थ, गंध शोधतो जुना ..... अशी मनाची अवस्था झालीयं. तरीही ओढ काही सुटत नाही. जुनी माणसे आठवतात, बाबूरावच्या आईने गालावर हात फिरवून, कानशिलावर कडाकडा बोटे मोडत काढलेली दृष्ट आठवते, लग्न झाल्यावर पहिल्यांदा बायकोला गडावर घेऊन गेलो होतो तेव्हा बाबूच्या बायकोने हिची साडी, खणा-नारळाने भरलेली ओटी आठवते, कुणी प्रेमाने खाऊ घातलेली दहीसाखर, कुणाचं मधुर ताक, कुणाची गरम गरम पिठलं भाकरी आणि कोजागिरीच्या ऐन मध्यरात्री समाधीपाशी गरम-गरम दुधाचा तांब्या घेऊन उभा असलेला वसंता .... काय काय आणि किती सांगू ?

चला,  यातलं या खेपेस काय अनुभवायला मिळतंय बघू ! अगदीच काही नाही मिळालं तरी त्या युगपुरुषाच्या समाधीचं दर्शन आणि आशीर्वाद आहेच. तो मात्र कधीही नाहीसा होणार नाही याची खात्री आहे म्हणूनच ही एकसष्टावी वारी.....



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

# २४. दुर्ग प्रकाशचित्रे

सूर्योदयापूर्वीची प्रसन्न पहाट, कधी होळीच्या माळावर, कधी नगारखान्यासमोर, कधी बाजारपेठेत, तर कधी शिवसमाधीपाशी कॅमेरे रोखून मित्र बसलेले असत. कधी आणि कुठून तो तेजाचा गोळा गपकन बाहेर येतो याचा अंदाज घेत मी शेजारी उभा असे.

वातावरणात पसरलेलं धुकं, कधी उजव्या आणि डाव्या डोंगररांगांमधून उतरलेले ढग असं सगळं भान हरपून टाकणारं वातावरण असे. या माझ्या दुर्गमित्र फोटोग्राफर्सवर गो नी दांडेकरांनी म्हणजेच स्व. अप्पांनी काढलेल्या असंख्य दुर्ग चित्रांची मोहिनी पसरलेली असे, म्हणून मग प्रत्येक फ्रेममध्ये एखादं झाड, एखादं झुडुप, अगदीच काही नाही तर एखादी झाडाची फांदीतरी घेण्याची धडपड सुरू असे.

स्व. अप्पांनी त्यांच्या काढलेल्या असंख्य दुर्गप्रकाशचित्रांमधून हे असंच जड आणि चेतनाचं बेमालूम मिश्रण केलेल असे. एखादा पडका बुरुज, भेगाळलेली तटबंदी, वाड्याचे चौथरे, समाध्या, यांची प्रकाशचित्रं घेताना अशी एखादी चैतन्याची खूण सोबत जोडली की, ते

प्रकाशचित्र बोलकं होई, त्याला चेतनेचा स्पर्श लाभे. त्यातही काही विशिष्ट ठिकाणांची प्रकाशचित्र विशिष्ट कोनांतून, विशिष्ट झाडाच्या अंगाने घेत त्या ठिकाणांसह स्व. अप्पा त्या झाडाच्या फांदीलाही कायमचं स्मृतीत लिहून ठेवीत. सोबतच्या कोलाजमध्ये स्व. अप्पांचं असंच एक रायगडाच्या महादरवाज्याचं प्रकाशचित्र जोडलं आहे. त्या फांदीचा वळणदार बाक स्व. अप्पांच्या निरीक्षणशक्तीची कमाल दाखवतो. अशी ही असंख्य दुर्गम चित्रे जड-चेतनांची लगट दर्शवणारी, पार्थिवाला चैतन्याचा स्पर्श बहाल करणारी, इतिहासातल्या शिवस्पर्शाला वर्तमानातला हृदयस्थ भाव प्रकट करणारी. यासाठीसुद्धा आपण स्व. अप्पांचे ऋणी आहोत.



**(फोटो - स्व. गो. नी. दांडेकर)**

## २५. दिव्याखाली अंधार....

दुर्गमहर्षी अप्पासाहेब दांडेकरांनी लिहून ठेवलंय, कुठल्याही किल्ल्यावरून एक सूर्योदय, एक सूर्यास्त पाहिल्याशिवाय गडावर एक मुक्काम केल्याशिवाय खऱ्या अर्थाने किल्ला समजत नाही.

रायगड, राजगड, पन्हाळा यासारखे किल्ले पुर्णपणे पाहायचे म्हटले तर तीन-चार दिवस तरी लागतातच. सन एकोणीसशे ऐंशी साली जेव्हा किल्ले हिंडायला सुरुवात केली, तेव्हापासून कधीच गडाला भोज्जासारखे शिवून परतलो नाही. कधी दोन दिवस, कधी तीन दिवस, तर कधी सलग आठवडाभर गडावर राहिलो. या तीस-पस्तीस वर्षात जवळ जवळ पासष्ठ वेळा रायगडावर गेलो, राहिलो. त्याकाळात रायगडावर मुक्कामासाठी असलेले पर्यटक निवास, त्यांची व्यवस्था पाहणारे श्री. हिवळे नावाचे व्यवस्थापक, उपाहारगृहाची व्यवस्था पाहणारा श्री. बाबू शेडगे ही जणू घरची माणसं होती.

हिरकणीच्या टोकाकडे जातांना डाव्या हाताला असलेल्या कड्याच्या टोकावरचे पर्यटक निवास हे एक अत्यंत रमणीय

ठिकाण होतं. कड्याच्या टोकावरचा सहा नंबरचा सूट हे माझं नेहमीचं राहण्याचे ठिकाण. संध्याकाळी त्याच्या पायऱ्यांवर बसलं की, समोर सूर्यास्त दिसायचा. हळूहळू खालचं पाचाड अंधारात गुडूप व्हायचे. उपहारगृहाच्या समोरचा व्हरांडा ही माझी दुसरी आवडीची जागा. जेवण झाल्यावर तिथे खुर्ची टाकून बसलो की तासनतास कसे निघून जायचे कळायचंच नाही.

ऐन पावसाळ्यात तर पावसाची झड लागलेली असायची, धुकटाचे लोटच्या लोट चालून यायचे. राणीवशाकडून डाव्या हाताने खळाळत येणारा ओढा पुढे कड्यावरून खाली उडी मारायचा. त्यावर पूर्वी लाकडी फळ्यांचा पूल होता. मला तर शोले या हिंदी पिक्चरमधल्या शेवटच्या सीनमधल्या लाकडी पुलाचीच आठवण यायची. किती मान्यवरांबरोबर त्या व्हरांड्यात गप्पा रंगल्या. डाव्या हाताचं मेणा दरवाजाच्या समोरचं छोटंसं पठार दसऱ्याच्या सुमारास सोनकी आणि तेरड्यानं भरून जायचं. नुसता फुलांचा गालिचा पसरलेला असायचा. एक छोटा चौथरा व त्यावर एक छोटीशी महादेवाची पिंड आणि समोरचा सुबक लहानसा नंदी त्या परिसराला पावित्र्य बहाल करीत असे.

कितीतरी वेळा पहाटे थंडीत कुडकुडत मी तिथे उभा राहून सूर्योदयाची रंगपंचमी पाहिली आहे.

कितीतरी वेळा कोजागिरी पौर्णिमेला त्या खडकावर बसून, बाबूनं पाठवलेले गरम गरम दूध घेत गप्पांचे फड रंगले आहेत. अगदी अलीकडे मोबाईलफोन आल्यानंतरची एक आठवण आहे. कै. अप्पांची कन्या सौ. वीणाताई आणि जावई श्री. विजयराव, काही स्नेह्यांना घेऊन रायगडावर गेले होते. पर्यटक निवासात मुक्कामाला होते.  हिवाळ्याचे दिवस होते, गप्पा मारता मारता राजवाड्यात अंधार झाला. मेणा दरवाज्यातून बाहेर आले तर गच्च धुकं.   जेवायला बाबूकडं उपहारगृहात जायचं होतं. पण रस्ताच सापडेना.

सौ. वीणाताईंनी मला फोन केला, मी सोलापूरला घरात ! त्यांना म्हटलं, "असंच उजव्या हाताला जाऊन पिंडीच्या चौथऱ्यापाशी थांबा. मी बाबूला फोन करतो, त्याचा पोरगा येईल तुम्हाला घ्यायला." बाबूला फोन केला तर त्यांनी धावत जावून, त्यांना हाताला धरून उपहारगृहात जेवायला नेलं. अशा कितीतरी आठवणी.

पण या सगळ्या सुखाला कोणाची दृष्ट झाली कुणास ठाऊक? इ. स. २००६-०७ च्या सुमारास, पर्यटन खात्याने

हे पर्यटक निवास एका अमराठी बिल्डरला चालवायला दिलं. त्यांनी त्याचं रूपचं बदलून टाकलं. ते आता कमर्शियल झालं. कधीही जाऊन हक्कानं श्री. हिवळेंना सांगून पथारी पसरायची सोय संपली. श्री. बाबूलासुद्धा नूतनीकरणाच्या नावाखाली अक्षरशः गडाखाली हाकलून दिलं. एक रम्य स्वप्न भंगलं. नव्हे.... रायगडावरचं आमचं घरच उध्वस्त झालं. त्यानंतर तिथला ठाव सुटला.

पुढं मग 'फाहियान' वादळ आलं, त्यानं दोन-चार सूटवरचे, डॉर्मिटरीवरचे पत्रे उडवून पार टकमकच्या पलीकडच्या दरीत फेकून दिले. रोपवे सुरु झालाच होता. लोकं सकाळी गडावर येऊन संध्याकाळी खाली परतू लागली.

असाच मागच्या वर्षी, एका शाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन गेलो होतो. कशीबशी तग धरून असलेली एक डॉर्मिटरी, त्यात राहिलो. नुकतीच पर्यटन खात्याने किल्ल्यांवर हेरिटेज हॉटेल काढण्याची योजना जाहीर केली आहे. ती चूक का बरोबर, हा या लेखाचा विषय नाही, पण रायगडासारख्या अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी असलेलं एक देखणं पर्यटक निवास, ज्यांना गेल्या दहा-पंधरा वर्षात सांभाळता आलं नाही, त्यांनी इतर किल्ल्यांवर पंचतारांकित हॉटेल

काढण्याच्या वल्गना कराव्यात हाही एकापरीने विनोदच आहे. या संकल्पनेला शिवभक्तांचा कडाडून विरोध होतो आहे, पण समजा, झालचं एखादं हेरिटेज हॉटेल तर मात्र ही रायगडावरची पर्यटक निवासाची भग्न वास्तू आणि माझ्यासारखे त्या वास्तूचे वास्तुपूजक म्हणतील......दिव्याखाली अंधार.



**(फोटो- © ॲड. आनंद रा. देशपांडे.)**

## २६. साकडं ....

या वर्षी पाऊस जरा लवकरच आला. जेष्ठाच्या शेवटचे शेवटचे वळवाचे एक दोन तडाखे संपताहेत, तोवरच पश्चिमेला मेघांनी फळी धरली. वाऱ्याचं भूत अंगात आल्यासारखं इकडून तिकडून पळू लागलं. त्यानं त्या ढगांच्या फळीतले चार दोन चुकार अतिउत्साही ढग पकडले आणि त्यांना पुढं घालून पळवत आणलं आणि रायगड थोडा शिंपडून घेतला. खरपूस भाजलेल्या मातीचा आणि मुरुमाचा वास सुटला. सोनकी, तेरडा आणि इतर गवतफुलांनी पटापटा आपापल्या जागा धरल्या आणि अजून मृग उजाडतो न उजाडतो तोच काडकन विजेचा चाबूक ओढीत पाऊस येऊन दाखल झाला.

गेला आठवडाभर संततधार सुरू होती. अजिबात खळ नव्हता. एव्हाना सांदी सापटीतले छोटे झरे, मोठे खळाळ, धबधबे सुरू झाले होते. एकाच गोष्टीची कमी होती. कुठल्याच शिवभक्ताचा पायरव येत नव्हता, चाहूल लागत नव्हती. जेष्ठातला राज्याभिषेकाचा उत्सवसुद्धा जेव्हा सुना सुना गेला, पाच पन्नास जणच येऊन अभिषेक करून गेले

तेव्हा मात्र शिवसमाधीच्या मनात शंका आली. “काय बरं झालं असेल ?” तिनं थोडं वाकून आतल्या श्री. जगदीश्वराच्या नंदीला हाक मारली. पण तो ढिम्म काही हलेना. तेव्हा मग नगारखाना हसून तिला म्हणाला, "अगं, त्याचं लक्ष बाहेर असतं कधी ? कायम मान, नजर आणि कान आंत गाभाऱ्याकडे टवकारलेले ! थांब, मीच थोरल्याला विचारतो" म्हणून त्यानं मान जराशी वर केली आणि राजसभेच्या नगारखान्याकडं बघून हात हलवला. थोरलाही त्याच चिंतेत पडला होता. त्यानंही धाकटयाला बघून हात हलवला. तेवढयात एक वाऱ्याची झुळूक खालच्या दरवाज्यातून चालली होती, तिला थांबवीत त्यानं धाकटयाला निरोप दिला "संध्याकाळी दिवस मावळायच्या वेळेला शिवसमाधीला घेऊन होळीच्या माळावर ये. तिथं निवांत भेटू. मी सदरेला, मेघडंबरीला आणि राणीवशाला निरोप देतो".

संध्याकाळी दिवस बुडायला घटकाभर शिल्लक असताना शिवसमाधी अन्  श्री. जगदीश्वराचा नगारखाना होळीच्या माळावर आले. चटकन जाऊन त्यांनी शिरकाईला डोकं टेकवलं, वळाले तो, पुतळ्याच्या उजवीकडून राणीवसा,

राजसदर आणि नगारखाना येताना दिसले. मग तिथच पुतळ्यासमोर ऐसपैस बैठक बसली. राजसदर शिवसमाधीला म्हणाली, "आपण एवढया लांबून इथं येऊन बसलो, जरा त्या बाजारपेठेला हाक मार की." शिवसमाधी म्हणाली, "मी बाई तुमच्यात वयानी सगळ्यांत लहान, माझा जन्मच मुळी १९२५चा ! तुम्ही सगळे एका वयाचे, पार थोरल्या राजांपासूनचे, तुम्हीच हाक मारा." त्यात काय एवढं म्हणून राणीवशाने बाजारपेठेला हाक मारली. तो बाजारपेठ उत्तरली, "तुम्हाला काय वाटलं, मला ऐकू आलं नाही ? येतच होते मी, हे बघा" म्हणून तिनं नुस्त इकडं तोंड वळवलं. पुतळ्यातले राजे या गप्पा ऐकून गालातल्या गालात हसले.

इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर थोरल्या नगारखान्यानं विषयाला हात घातला, " यावर्षी अजून शिवभक्तांची गर्दी कशी नाही ?" "मी सांगू ? मी सांगू ?" म्हणत शिवसमाधी पुढं सरकली. "सांग बाई, तू सांग, वयानं लहान असलीस तरी तुझा मान मोठा." राजसदर म्हणाली. "अगं, तसं नाही ग, परवा अभिषेकाला आलेली मंडळी जेव्हा माझ्या पायावर डोकं ठेवीत होती ना, त्यावेळी सगळे मनातल्या मनात

प्रार्थना करत होते की हे महामारीचं संकट लवकर नाहीस करा महाराज." "अस्सयं होय, तरीच परवा अभिषेकाच्या वेळेस सगळे तोंडाला शेले गुंडाळून आले होते" मेघडंबरी पुटपुटली. तेव्हढयात, श्रीगोंदयाच्या टोकाकडून आलेला वाऱ्याचा सोसाटा होळीच्या माळावर पोहोचला. ही सगळी बडी मंडळी तिथं एकत्र झालेली पाहून, तो तिथचं त्यांच्याभोवती घोटाळू लागला. त्यांच्या चर्चेवरून उडत उडत विषय त्याच्या कानावर पोहोचला.

त्यालाही आश्चर्य वाटलं. मग त्यानं मनाशी एक निश्चय केला, या सगळ्यांकडे वळून तो म्हणाला, "मंडळी, तुम्ही सगळे एकत्र आलेले पाहिल्यावरच, माझ्या लक्षात आलं होतं का विषय गंभीर आहे. ह्याच्या त्याच्या हातून सुटणारा नाही. ह्या महाराजांच्या पुतळ्याच्या साक्षीनं सांगतो, हा असाच तडक प्रतापगडावर जातो, आई भवानीला साकडं घालतो का या लेकरांवर आलेल्या संकटातून त्यांची सुटका कर, त्यांना पोटाशी घे आणि त्या आदिमायेचा उजवा कौल घेऊन तुम्हाला सांगायला येतो का दिवाळीला तुमची लेकरं तुमच्या दर्शनाला येत्याल. गड पुन्हा नांदता होईल. पुन्हा चौघडा वाजल, पुन्हा घंटा घणाणतील, पुन्हा झेंडे

फडफडतील, थोडी कळ सोसा ! " त्या वाऱ्याच्या झोतानं या सगळ्यांच्याभोवती एक गिरकी घेतली आणि पुतळ्याच्या पायांना स्पर्श करून तो पहाता पहाता पोटल्याच्या डोंगरावरून प्रतापगडाकडे निघून गेला.



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

## २७. चुकलिया माये ......

नऊ मार्च २०१९ ला फत्ते शिकस्तच्या संहितेच पूजन करून आणि संहिता शिवसमाधीसमोर आशीर्वादासाठी ठेवून रायगडावरून परतलो. त्यानंतर मागच्या वर्षभरात रायगडला जाता आलं नाही. नंतर हे वादळ ! राहून राहून सारखी माहेराची आठवण यायची. मग या तीन चार महिन्यात नवीन पुस्तकाचं लेखन झालं. त्यातले साताठ लेख रायगडावर लिहीले. त्यानिमित्ताने मग मनाने साताठ वेळा रायगडावर जाऊन आलो.

अलीकडचा गर्दीत हरवलेला, घोषणा, जयघोषांनी दुमदुमून गेलेला, रोपवे झाल्यानंतरचा रायगड ज्यांनी पाहिला, त्यांना आम्ही पाहिलेल्या, आम्ही अनुभवलेल्या, आम्ही जगलेल्या रायगडाची कल्पनाही करता येणार नाही. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा तीनही ऋतुत आम्ही रायगडाची लेकरे त्याच्या अंगाखांद्यावर बागडलो आहे. दिवस म्हणू नये, रात्र म्हणू नये, ऊन म्हणू नये, पाऊस म्हणू नये, मनात आलं की उठावं आणि समाधीकडे चालू लागावं. रात्री अपरात्री वारा झुडुपातून शीळ घालत असायचा, लख्ख चांदिणं पडलेलं असायचं.

जे काय दो-चौजण बरोबर असतील, त्यांना घेऊन समाधीला जायचं आणि दर्शन घेऊन समाधीच्या आसपास फतकल मारून बसायचं. काळाचं भान नाही, वेळेची चिंता नाही.  संपूर्ण घरात आई ज्या खोलीत असेल, तिच्या भोवती भोवती पोरं, जशी खेळत रहातात तस समाधीच्या आसपास बसून असायचं. हे झालं अलिकडच्या दहा पंधरा वर्षातलं.

त्याच्या आधी म्हणजे साधारण दोन हजार सालापर्यंत आमचा मुक्कामच श्री. जगदीश्वराच्या देवळात असे. जे काही तीन चार दिवस गडावर रहात असू, तितके दिवस आमच्या सॅक देवळाच्या एका कोपऱ्यात ठेवून आम्ही गडभर भटकत असू. सकाळी उठून तोंड धुवायला बारा टाक्यावर, मग वसंताकडे चहा नाष्टा, मग बादल्या हातात घेऊन शाही स्नानासाठी काळा हौद, दुपारी जेवायला बाबुरावकडे एमटीडीसीला, रात्री वसंताच्या झोपडीसमोर कुडाच्या छपरात गरम गरम भाकरी अन पिठलं. थंडी असेल तर मुक्काम देवळात कोपरा पकडून, नाहीतर श्री. जगदीश्वराच्या नगारखान्यात. अफाट तारकांचं नक्षत्रमंडळ अंगावर पांघरून

झोपून जायचं. सकाळी धनगरवाड्यातले कोंबडे आरवू लागले की जाग यायची.

किती प्रसंग, किती आठवणी ?

सिंहासनासमोर मशाली लावून दिलेली व्याख्यानं, नीरव शांततेत मध्यरात्री श्री. जगदीश्वराच्या रंगशिळेवर बसून म्हटलेले अभंग, कधी एकटे दुकटे तर कधी शे-शंभर विद्यार्थी बरोबर घेऊन, रात्री सिंहासन ते समाधी काढलेल्या मूकयात्रा, पौर्णिमेच्या चांदण्यात टकमकीच्या टोकावर पालथं पडून निरखलेला रहाळ, सूर्यास्ताच्या वेळेस हिरकणीच्या टोकावर बसून अनुभवलेली आभाळातली रंगपंचमी, हाताच्या अंतरावर आभाळात स्थिरावलेला ससाणा आणि मग त्याचं बाणासारखं जमिनीकडे झेप घेणं.

रोपवे सुरु झाला तशी आमच्या माहेरची गर्दी वाढली. भारलेपण हरवलं. ऐकू येऊ लागल्या त्या तारस्वरात दिलेल्या घोषणा, मोबाईलवरची कर्कश्श गाणी. जाणवत होतं या बदलाला सामोरं जाव लागणार, आपल्या सवयी बदलाव्या लागणार. बुध्दिला पटत होतं पण मनाची तयारी होत नव्हती. पूर्वी गड उतरून निघताना शेवटी समाधीच दर्शन घ्यायची वेळ यायची तेव्हा हृदयात कालवाकालव

व्हायची, गळ्यात आवंढा दाटून यायचा, वाटायचं आता पुन्हा कधी माहेरी आईकडे यायला मिळणार ? पायाला मणामणाची ओझी बांधल्यासारखे जड पायांनी एकेक पायरी उतरत असू. महादरवाजाचा उंबरा ओलांडून वळून उंबऱ्यावर डोकं टेकवलं की डोळ्यातून दोन तरी टिपं उंबऱ्यावर गळल्याशिवाय रहायची नाहीत. खाली चितदरवाजापाशी एसटी उभी असे. मुद्दाम खिडकी पकडून बसायचो. कोंझर येईपर्यंत रायगड वेगवेगळ्या कोनातून दिसत रहायचा. तुकोबांनी वर्णन केलेल्या अभंगासारखी अवस्था व्हायची,

`कन्या सासुऱ्यासी जाये,

मागे परतोनि पाहे ..

तैसे झाले माझ्या जीवा

केव्हा भेटसी केशवा ....?`

वर लिहीलं तस या सहा महिन्यात आठवून आठवून या माहेरच्या आठवणी लिहील्या. आता मात्र धीर धरवेना झालाय. त्याच अभंगात म्हटल्याप्रमाणे,

`चुकलिया माये बाळ हुरहुरू पाहे,

जीवनावेगळी मासोळी  तैसा तुका तळमळे`  .....अस झालयं. शक्य असतं तर ती भवानी तलवार हातात घेऊन त्या चीनचा कोथळा बाहेर काढला असतां .. पण ........



(फोटो- सोशल मिडियावरून साभार)

## लेखकाचा परिचय


### ॲड. आनंद रा. देशपांडे.

- **शिक्षण** :- बी. कॉम. एल.एल.बी. एम. ए. (इतिहास)
- **माजी सदस्य** :- गडसंवर्धन समिती महाराष्ट्र शासन
- **माजी सदस्य** :- महाराष्ट्र राज्य नाट्य परिनिरीक्षण मंडळ
- महाराजा शिव-छत्रपती प्रतिष्ठाननिर्मित व श्रीमंत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे दिग्दर्शित "**जाणता राजा**" या महानाट्यात १९८८ पासून सहभाग.
- आत्तापर्यंत २७५ प्रयोगातून मध्यमवयीन शिवाजीमहाराज, सूत्रधार, शाहीर या भूमिका सादर.
- या प्रयोगांच्या निमित्ताने १९९७ साली अमेरिका व २०१५ साली इंग्लंडचा दौरा.

- पुण्यातील आंबेगाव येथे महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने साकारल्या जाणाऱ्या "**शिवसृष्टी**" या भव्य प्रकल्पाचा सल्लागार म्हणून जबाबदारी.
- दुर्गमहर्षी गोपाल नीलकंठ दांडेकर यांच्या साहित्यावर आधारित "**पुनर्भेट-गोनीदांच्या साहित्यकृतींची**" हे पुस्तक प्रकाशित.
- दुर्गभ्रमंतीतील अनुभवांवर आधारित "**कातळ मनीचा ठाव**" हे ललित लेखांचे पुस्तक प्रकाशित.
- गेल्यावर्षी विविध विषयांवरील स्फुट लेखांचा संग्रह असलेला "**काही जनातलं काही मनातलं**" हा लेखसंग्रह पुस्तकरुपाने प्रकाशित.
- गोनीदा दुर्गप्रेमी मंडळाच्यावतीने आयोजित केल्या जाणाऱ्या दुर्ग साहित्य संमेलनांचा संस्थापक सदस्य.

- विनय धुमाळे निर्मित व दिग्दर्शित लोकमान्य टिळकांच्या जीवनावर आधारित **"लोकमान्य"** या हिंदी दूरदर्शन मालिकेत आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांची भूमिका सादर केली
- मृणाल कुलकर्णी दिग्दर्शित **"रमा माधव"** व दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित **"फर्जंद"** आणि **"फत्तेशिकस्त"** या ऐतिहासिक मराठी चित्रपटातून भूमिका.
- इसवी सन १९९० पासून गेली तीस वर्षे, तीन राष्ट्रीयकृत बँका, सात सहकारी बँका, तीन खासगी वित्त कंपन्या आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन या राष्ट्रीय संस्थांचा कायदेशीर सल्लागार (विधी सल्लागार) म्हणून कार्यरत.

**ॲड. आनंद रा. देशपांडे यांचे हे ई साहित्यवरचे पहिले पुस्तक आनंदाचे डोही. खालील कव्हरवर क्लिक/प्रेस करताच उघडेल**



**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**

**ॲड. आनंद रा. देशपांडे यांचे हे ई साहित्यवरचे हे दुसरे पुस्तक.**

ॲड. आनंद रा. देशपांडे हे एक ज्येष्ठ लेखक व रंगकर्मी म्हणून महाराष्ट्राला माहित आहेत. साहित्यिक वर्तुळांत त्यांचे वजन आहेच, पण नवीन सोशल मिडियावरही त्यांचे साहित्य फ़ार मोठ्या प्रमाणावर वाचले जाते. त्यांनी लिहीलेल्या पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते व त्यातून त्यांना मानधनही मिळू शकते. परंतू मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी प्रकाशक म्हणून केली आहे.

ॲड. आनंद रा. देशपांडे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही भौतिक अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (८ पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२६ पुस्तके), अनील वाकणकर (९), अनंत पावसकर(४ पुस्तके),

मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(४), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(५), आनंद देशपांडे(२), निलीमा कुलकर्णी, अनामिका बोरकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।


BHASKAR
SAGAR